# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०८/ २०१८** **दिनांक २६.०७.२०१८**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.३० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा गुरुवार दि.२६.०७.२०१८ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये दुपारी १२.३० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/१९१०/२०१८, दि.१८.०७.२०१८ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार गुरुवार दि.२६.०७.२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर, सदस्य ०४. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य
०५. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य ०६. मा.सौ.योगिता अभय शेळके पाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले व मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग यांनी दूरध्वनीद्वारे कळविले होते, याची समितीने नोंद घेऊन, त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर, सदस्य यांनी ई-मेलव्दारे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीच्या दि.२६ जुलै,२०१८ रोजी होणाऱ्या बैठकीचे पत्र मिळाले. या बैठकीस माझ्यासकट शिवसेनेचे तीनही सदस्य हजर राहणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी. धन्यवाद.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी ०१.०० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.२** **दिनांक ३०.०६.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४६१** दिनांक ३०.०६.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

**१. निर्णय क्र.४१७**

यावर सविस्तर चर्चा होऊन, आयकर कायदा १९६१ च्या तरतुदीनुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे अखर्चित उत्पन्न रु.३४३.९१ कोटी रकमेचा दि.३१.०३.२०१९ अखेर विनियोग करणेसाठी उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे संस्थानची उद्दिष्टे व विकासकामे यासाठी विनियोग करणेस मान्यता देण्यात येऊन, यामध्ये उपरोक्त नमुद प्रकल्पाव्यतीरिक्त अन्य प्रकल्पावर संस्थानमार्फत करण्यात येणाऱ्या खर्चाचा समावेश करण्यात यावा. तसेच प्रस्तावात नमुद केलेल्या बाबींवर प्रत्येक महिन्यात होणाऱ्या खर्चाचा तपशिल मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

**या ऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, आयकर कायदा १९६१ च्या तरतुदीनुसार सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाचे अखर्चित उत्पन्न रु.३४३.९१ कोटी रकमेचा दि.३१.०३.२०१९ अखेर विनियोग करणेसाठी उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे संस्थानची उद्दिष्टे व विकासकामे यासाठी तसेच संस्थानचे विविध प्रयोजनासाठी आरक्षीत असलेल्या जमीनी खरेदी करणेस सदर रकमेचा विनियोग करणेस मान्यता देण्यात येऊन, यामध्ये उपरोक्त नमुद प्रकल्पाव्यतीरिक्त अन्य प्रकल्पावर संस्थानमार्फत करण्यात येणाऱ्या खर्चाचा समावेश करण्यात यावा. तसेच प्रस्तावात नमुद केलेल्या बाबींवर प्रत्येक महिन्यात होणाऱ्या खर्चाचा तपशिल मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी, लेखाशाखा विभाग)**

---

२. निर्णय क्र.४२३

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरात साईभक्तांना श्रींचे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता प्रथम LED Wall Screen, size 4.80m x 2.88m ०५ नग LED Wall Screen ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.७ कोटी ९० लाख+GST मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

तसचे संस्थान परिसरात साईभक्तांना श्रींचे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता सदरचे LED Wall Screen नगर-मनमाड हायवे वरील संस्थानचे मिळकतीमध्ये, लेंडी बाग, १६ गुंठे परिसर, या ठिकाणी बसविण्यात यावेत, असे ठरले.

तसेच सभेच्या वेळी LED पॅनेलचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. LED पॅनेलची उपयुक्तता असुन त्याचे अंदाजे खर्च प्रति पॅनेल २५ ते ३५ लाख असुन प्रथमत: १० LED पॅनेल देखील ई-टेंडर पध्दतीने खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२.५ कोटी चे खर्चास मान्यता देण्यात आली.

**या ऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरात साईभक्तांना श्रींचे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता प्रथम LED Wall Screen, size 4.80m x 2.88m ०५ नग LED Wall Screen ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.७ कोटी ९० लाख+GST मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**संस्थान परिसरात साईभक्तांना श्रींचे दर्शनाचा लाभ सुलभतेने होणेकरीता सदरचे LED Wall Screen बसविणेकामी प्रथम स्थानिक उपसमितीमध्ये जागेची निश्चीती करणेत यावी.**

**तसेच सभेच्या वेळी LED पॅनेलचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. संस्थानचे सर्व निवासस्थाने, श्री साईनाथ रुग्णालय, श्री साईबाबा रुग्णालय, देगणी कार्यालय इत्यादी ठिकाणी LED पॅनेलची उपयुक्तता असुन त्याचे अंदाजे खर्च प्रति पॅनेल २५ ते ३५ लाख असुन प्रथमत: १० LED पॅनेल देखील ई-टेंडर पध्दतीने खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२.५ कोटी चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेल प्रमुख)**

---

३. निर्णय क्र.४३२

यावर सविस्तर चर्चा होऊन, साठा संपुष्टात आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रण करणेकामी ई-निविदा मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,५५,३७,९९०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. यावेळी अशीही चर्चा झाली की, पुर्वीची संस्थान प्रकाशीत बंद झालेली प्रकाशने पुन्हा छपाई करणेबाबत कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.

**या ऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साठा संपुष्टात आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रण करणेकामी ई-निविदा मागणी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१,५५,३७,९९०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. यावेळी अशीही चर्चा झाली की, पुर्वीची संस्थान प्रकाशीत बंद झालेली प्रकाशने यांची तपशीलवार माहिती मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही-प्र.अधिक्षक,प्रकाशने विभाग)**

---

४. निर्णय क्र.४५०

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे शासनाचे स्तरावर आजपावेतो करण्यात आलेल्या हमीपत्र दाखल करण्याच्या व दि.२०.०६.२०१८ पासून प्रवेश प्रक्रिया सुरु करण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली. तसेच कला,वाणिज्य व विज्ञान शाखासाठी पुढीलप्रमाणे विषय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.

अ) कला शाखा –

१) इंग्रजी, २) भुगोल, ३) हिंदी, ४) इतिहास, ५) मराठी, ६) राज्यशास्त्र, ७) अर्थशास्त्र,

८) समाजशास्त् / मानसशास्त्र / तत्वज्ञान.

ब) वाणिज्य शाखा-

1) English, 2) Accountancy, 3) Economics, 4) Auditing & Taxation,
5) Financial Accounting, 6) Marketing & Salesmanship /Marketing,
7) Cost & Works Accounting.

क) विज्ञान शाखा-

1) English, 2) Chemistry, 3) Electronics, 4) Maths, 5) Physics,
6) Zoology, 7) Micro Biology/Environmental

प्राचार्य पद पुर्णवेळ तसेच ग्रंथपाल व प्रयोगशाळा साहय्यक ही पदे तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित रु.१२,०००/- एवढया मानधनावर नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आली.

प्राचार्य पदाच्या भरतीसाठी निवडसमितीमध्ये मा.श्री.चंद्रशेखर कदम,उपाध्यक्ष व मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, सदस्य यांना नामनिर्देशित करण्यात आले.

तसेच पहिल्यावर्षी प्राध्यापकांची सर्व पदे तासिका तत्वावर भरण्यात यावीत. त्यासाठी शिक्षकांना एकत्रित मासिक मानधन रु.१५,०००/- मात्र देण्यात यावे, असे ठरले. तसेच तासिका तत्वावर प्राध्यापक उपलब्ध न झाल्यास व्हिजीटींग पध्दतीने प्राध्यापक नेमावेत. व्हिजीटींग प्राध्यापकांना रु.५००/- प्रति सेशन+बस भाडे या दराने किंवा सहा महिन्याचे संपूर्ण सत्राचे रु.३०,०००/- + बस भाडे या दराने मानधन द्यावे, असे ठरले.

तसेच मा.श्री.चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष यांचे सुचनेनुसार नवीन महाविद्यालयाच्या दैनंदिन बाबीसाठी, तसेच शैक्षणिक कामात सल्ला देण्यासाठी व पुणे विद्यापीठाशी निगडीत कामामध्ये सहकार्य करण्यासाठी सेवा निवृत्त प्राचार्य डॉ.अरुण कुंभारे निशुल्क सेवा देणार असल्याने यांचे मागदर्शन घ्यावे असे ठरले. त्यासाठी त्यांना ते ज्यावेळी शिर्डी येथे येतील तेव्हा प्रवास खर्चासाठी प्रवासभत्ता किंवा जाणे-येणेसाठी संस्थानचे वाहन उपलब्ध करुन द्यावे. तसेच शिर्डी येथे येतील तेव्हा श्री साईनिवास येथे निवासव्यवस्था व भोजनव्यवस्था मोफत देण्याचे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग/ श्री साईबाबा महाविद्यालय/प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे शासनाचे स्तरावर आजपावेतो करण्यात आलेल्या हमीपत्र दाखल करण्याच्या व दि.२०.०६.२०१८ पासून प्रवेश प्रक्रिया सुरु करण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली. तसेच कला,वाणिज्य व विज्ञान शाखासाठी पुढीलप्रमाणे विषय सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.**

**अ) कला शाखा –**

**१) इंग्रजी, २) भुगोल, ३) हिंदी, ४) इतिहास, ५) मराठी, ६) राज्यशास्त्र, ७) अर्थशास्त्र,**
**८) समाजशास्त्र / मानसशास्त्र / तत्वज्ञान.**

**ब) वाणिज्य शाखा-**

**1) English, 2) Accountancy, 3) Economics, 4) Auditing & Taxation, 5) Financial Accounting, 6) Marketing & Salesmanship / Marketing, 7) Cost & Works Accounting.**

**क) विज्ञान शाखा-**

**1) English, 2) Chemistry, 3) Electronics, 4) Maths, 5) Physics, 6) Zoology, 7) Micro Biology / Environmental, 8) Botany**

**प्राचार्य पद पुर्णवेळ तसेच ग्रंथपाल व प्रयोगशाळा साहय्यक ही पदे तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित रु.१२,०००/- एवढया मानधनावर नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आली.**

**सर्व पदांच्या भरतीसाठी निवडसमितीमध्ये मा.श्री.चंद्रशेखर कदम,उपाध्यक्ष व मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, सदस्य यांना नामनिर्देशित करण्यात आले.**

तसेच पहिल्यावर्षी प्राध्यापकांची सर्व पदे तासिका तत्वावर भरण्यात यावीत. त्यासाठी शिक्षकांना एकत्रित मासिक मानधन रु.१५,०००/- मात्र देण्यात यावे, असे ठरले. तसेच तासिका तत्वावर प्राध्यापक उपलब्ध न झाल्यास व्हिजीटींग पध्दतीने प्राध्यापक नेमावेत. व्हिजीटींग प्राध्यापकांना रु.५००/- प्रति सेशन+बस भाडे या दराने किंवा सहा महिन्याचे संपूर्ण सत्राचे रु.३०,०००/- + बस भाडे या दराने मानधन द्यावे, असे ठरले.

तसेच नवीन महाविद्यालयाच्या दैनंदिन बाबीसाठी, तसेच शैक्षणिक कामात सल्ला देण्यासाठी व पुणे विद्यापीठाशी निगडीत कामामध्ये सहकार्य करण्यासाठी सेवा निवृत्त प्राचार्य डॉ.अरुण कुंभारे निशुल्क सेवा देणार असल्याने यांचे मागदर्शन घ्यावे, ते महिन्यातून किमान सहा वेळा स्वखर्चाने शिर्डी येथे येणार आहेत. त्यासाठी फक्त सहा महिन्याकरीता त्यांना मानधन व प्रवास भत्ता एकत्रितपणे दरमहा रु.४०,०००/- मात्र देण्याचे ठरले, तसेच ते शिर्डी येथे येतील तेव्हा श्री साईनिवास अथवा व्दारावती येथे उपलब्धतेनुसार निवासव्यवस्था व भोजनव्यवस्था मोफत देण्याचे ठरले. (कार्यवाही-प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन विभाग/ श्री साईबाबा महाविद्यालय/ प्र.अधिक्षक, साईप्रसादनिवासस्थान/ प्र.अधिक्षक,व्दारावती निवासस्थान/ प्र.अधिक्षक,प्रसादालय विभाग)

---

५. निर्णय क्र.४५१

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पाअंतर्गत संगणकीय प्रणालीबाबतची कार्यवाही करणेसाठी Oracle Licenses नुतनीकरण करणे व आवश्यक नविन Oracle Licenses खरेदी करणे आवश्यक असल्याने, याकामी ई-निविदा प्रक्रिया त्वरीत राबविणेत यावी, असे ठरले. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, यापुर्वी ऑरेकल कंपनीकडून जे लायन्सेस खरेदी केले आहे त्यांचे नुतनीकरण कंपनीकडूनच करणे आवश्यक आहे. त्यामुळे पुढील लायन्ससचे नुतनीकरण ऑरेकल कंपनीकडूनच करुन घेण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

| Sr.No | Item | List Price | Quotation Offer (20% Discount) | Quote offered during meeting held on 23.05.2018 | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Initial 52% Disc. On Sr.No. 1 & 2 | Revised 67% Disc. On Sr.No. 1 & 2 | Final 70% Disc. On Sr.No. 1 & 2 | Invoice Amount (Including Tax) |
| 01 | Oracle Database licenses renewal | 30,50,997.26 | 30,50,997 | 22,25,485 | 22,25,485 | 22,25,485 | 26,26,072.16 |
| 02 | Oracle application licenses renewal | 16,42,752 | 16,42,752 | 11,93,696 | 11,93,696 | 11,93,696 | 14,08,560.53 |
| | Total | 46,93,749.26 | 46,93,749.26 | 34,19,181 | 34,19,181 | 34,19,181 | 40,34,632.69 |

तसेच जे लायन्सस नव्याने घ्यावयाचे आहे ते खरेदी करणेस विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

६. निर्णय क्र.४५४

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांचे समाधीचे शताब्दी महोत्सव ०१ ऑक्टोबर २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत Video Documentry चे चित्रीकरण तयार करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१,२५,००,०००/-+GST मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे शताब्दी कालावधीतील सर्व उत्सव सोहळे, सांस्कृतीक कार्यक्रम, तसेच संस्थानतर्फे राबविणेत आलेले विविध उपक्रम यांची माहिती पुस्तक स्वरुपात प्रसिध्द करावी, असे ठरले. त्यासाठी विहीत पध्दतीने निविदा प्रक्रिया राबविण्यास व त्यासाठी येणाऱ्या आवश्यक खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेलप्रमुख/प्र.अधिक्षक,प्रकाशने विभाग)

याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांचे चिरंजीव श्री.सिध्दार्थ जयकर हे समाधीचे शताब्दी महोत्सव दि.१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीत संस्थानतर्फे राबविण्यात आलेल्या विविध कार्यक्रमाची व उपक्रमाची Video Documentry मोफत करुन देणार

आहेत. त्यासाठी काही उपकरणे व साहित्य भाडयाने घ्यावे लागल्यास त्याचे भाडे भरण्याची जबाबदारी मा.समिती सदस्य ॲड मोहन जयकर यांनी स्विकारली. तसेच Video चित्रीकरणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांची येण्या-जाण्याची व्यवस्था, निवासाची व भोजनाची व्यवस्था मोफत करावी, असे ठरले.

शताब्दी कालावधीचे १०० ते १२० पानांचे कॉफी टेबल बुक समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर हे देणगी स्वरुपात करुन घेणार आहेत, त्यास मान्यता देण्यात आली,तसेच सदर कॉफी टेबल बुकच्या आवश्यक तेवढया प्रती विहीत पध्दतीने छपाई करण्यास व त्यासाठी येणाऱ्या आवश्यक खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- सीसीटीव्ही कंन्ट्रोल सेलप्रमुख/प्र.अधिक्षक,प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.२** **द्वारावती भक्तनिवास इमारतीचे तळमजल्यावरील प्रसाद भोजन व्यवस्था स्थलांतरीत करणेसाठी इमारतीचे पश्चिमेकडील भागातील पाण्याचे भूमिगत टाकीलगतचे जागेत शेड उभारणी करणेबाबत.**

**प्रसताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः- अधिनियमाचे कलम २१ पोट कलम (१) अन्वये समितीकडून विश्वस्त व्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

प्रस्तावना:- श्री साईनाथ रुग्णालय परिसरात रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक तसेच साईभक्तांचे सोयीसाठी श्री साई प्रसादालयामार्फत द्वारावती भक्तनिवास इमारतीचे तळमज्यामध्ये (पार्किंग) पश्चिमेकडील जिन्यालगत तात्पुरत्या स्वरुपाचे प्रसाद भोजन व्यवथा करणेत आलेली आहे. सदरची जागा स्वच्छता व साफ-सफाईचे दृष्टीने गैरसोयीची असल्याने तसेच पार्किंगमध्ये द्वारावती भक्तनिवास इमारतीमध्ये येणारे साईभक्तांची वाहने पार्किंसाठी पुरेशी जागा उपलब्ध होत नसलेने, सध्याची प्रसाद भोजन व्यवस्था द्वारावती भक्तनिवास इमारतीचे पश्चिमेकडील भागातील पाण्याचे भूमिगत टाकीलगतचे मोकळ्या जागेत कायमस्वरुपी शेडची उभारणीचे खालील पर्यांयानुसार करुन घेता येईल.

पर्याय क्र.०१. Tensile fabric Shed.

| Sr.No. | Description | Amount |
|---|---|---|
| 01 | Providing & Erecting Tensile fabric shed with all necessary Design, structural calculations, RCC work for foundation, Column, Lintels, Reinforcement Steel, Structural steel, Colour Coated Sheet for roof and on walls, 9” Brick work upto 3’ hight, Kota, Vitified Flooring, Ceramic tills dado, M. S. Window grills with Shuters, Doors etc. Completed. (Size : 30’x60’ = 1800 sq. ft.) | 14,04,177/- |

**पर्याय क्र.०२. M. S. Stucture with Colour Coated Sheet Shed.**

| Sr.No. | Description | Amount |
|---|---|---|
| 01 | Providing & Erecting Colour Coated Sheet shed with all necessary Design, structural calculations, RCC work for foundation, Column, Lintels, Reinforcement Steel, Structural steel, Colour Coated Sheet for roof and on walls, 9” Brick work upto 3’ hight, Kota, Vitified Flooring, Ceramic tills dado, M. S. Window grills with Shuters, Doors etc. Completed. (Size : 30’x60’ = 1800 sq. ft.) | 10,88,941/- |

उपरोक्त पर्याय क्र.०१ नुसार Tensile fabric Shed उभारणेकामी रु.१४,०४,१७७/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच पर्याय क्र.०२ नुसार एम. एस. स्ट्रक्चर तयार करुन त्यास कलर कोटेड शिट बसवून शेड तयार करुन घेणेकामी रु.१०,८८,९४१/-मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय**:- वरील पर्यायांपैकी पर्याय क्र.०२ नुसार एम. एस. स्ट्रक्चर तयार करुन त्यावर कलर कोटेड शिटस् बसवून शेड व इतर अनुषंगीक कामे करुन घेणेसाठी पर्याय क्र.०१ पेक्षा कमी खर्च येणार असलेने, सदरचे शेडची उभारणी पर्याय क्र.०२ नुसार करुन घेणे उचित राहील असे मत आहे.

**प्रस्ताव**:- तरी द्वारावती भक्तनिवास इमारतीचे तळमजल्यावरील प्रसाद भोजन व्यवस्था स्थलांतरीत करणेसाठी इमारतीचे पश्चिमेकडील भागातील पाण्याचे भूमिगत टाकीलगतचे जागेत पर्याय क्र.०२ नुसार एम. एस. स्ट्क्चरमध्ये शेड तयार करुन, त्यावर कलर कोटेड शिट टाकुण शेडमध्ये आवश्यक कामे करुन घेणेकामी येणारे अंदाजे रु.१०,८८,९४१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४६२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, द्वारावती भक्तनिवास इमारतीचे तळमजल्यावरील प्रसाद भोजन व्यवस्था स्थलांतरीत करणेसाठी इमारतीचे पश्चिमेकडील भागातील पाण्याचे भूमिगत टाकीलगतचे जागेत शेड उभारणी करणेकामी एम.**

**एस. स्ट्क्चरमध्ये शेड तयार करणेस, त्यावर कलर कोटेड शिट टाकुण शेडमध्ये आवश्यक कामे करुन घेणेस मान्यता देण्यात आली. तसेच त्यालगत वाढीव ७०० चौ.फुट जागेवर देखील एम.एस.स्टक्चर शेड तयार करणेस व त्यावर कलर कोटेड शिट टाकण्यास मान्यता देण्यात आली. त्यास येणाऱ्या अंदाजित रुपये ६ लक्षचे खर्चास मान्यता देण्यात आली. अशा प्रकारे वाढीव क्षेत्रासह एकुण क्षेत्र २७०० चौ.फुट साठी येणाऱ्या अंदाजीत खर्च रक्कम रु.१५,७९,४८७/-मात्रचे रकमेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

विषय नं.३- **श्री साईबाबा मंदिर व परिसराचे थ्री डी मॉडेल (२ नग) तयार करणे कामाचे ठेकेदार कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांना मुदत वाढ देणेस तसेच या कामाचे रक्कम रु.८,९४,०००/- मात्रचे पहीले व अंतिम देयक आदा करणेस मान्यता देणे**

श्री साईबाबा समाधी मंदिर परिसराचे थ्री डी मॉडेल तयार करण्याचे काम ठेकेदार कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांनी पूर्ण केले असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या पहिले व अंतिम बिलाची सविस्तर तपासणी करणेत आली आहे. ठेकेदार यांना अंतीम बिल अदा करणेकामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | श्री साईबाबा मंदिर व परिसराचे थ्री डी मॉडेल (२ नग) तयार करणे. |
| ठेकेदाराचे नांव | कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली. |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/६७७२/२०१८<br>दि.१७/०३/२०१८ |
| मंजूर निविदा रक्कम | रु. ८,९४,०००/- |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र ७६(०९) दि. ०२/०२/२०१८ व<br>नि.क्र १६० दि. ०७/०३/२०१८ |
| पहीले व अंतिम बिलाची रक्कम | रु. ८,९४,०००/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम | -- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | -- |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | दि. १७/०४/२०१८ |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि. १०/०५/२०१८ |

श्री साईबाबा समाधी मंदिर परिसराचे थ्री डी मॉडेल तयार करण्याचे काम करणेसाठी ठेकेदार कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांना दि.१७/०४/२०१८ अखेर ०१ महीन्याची मूदत देण्यात आली होती. तथापी, मॉडेल तयार करणेसाठी इमारतीचे Detailed Elevation Drawing ची आवश्यकता होती. श्री सामधी मंदिर व दिक्षितवाडा या इमारती १०० वर्षे जुन्या असल्याने त्यांचे Detailed Elevation Drawing उपलब्ध नव्हते. तसेच मंदिर परिसर व लेंडीबागेतील फ्लोरींग नूतनीकरण, गेट नं.०१ जवळील चप्पल स्टॅण्ड शेड ही नवीन कामे व इतर काही किरकोळ सुधारणा करण्यात आल्या आहेत. या सर्व बाबी मॉडेलमध्ये दर्शविण्यासाठी ठेकेदार यांनी साईटवर समक्ष पाहणी, सर्व्हे करुन व छायाचित्रे घेऊन बारिकसारिक तपशिल संकलीत केला. त्यामुळे त्यांना काम पुर्ण करण्यास विहीत मुदतीपेक्षा २३ दिवसांचा विलंब झालेला असून याबाबत ठेकेदार यांनी दि.१६/०४/२०१८ रोजीचे पत्रान्वये काम पूर्ण करण्यासाठी दि.१०/०५/२०१८ अखेर मूदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे. निविदा शर्तीनुसार प्रती दिवस रु.३००/- प्रमाणे झालेल्या २३ दिवसांच्या विलंबापोटी रु.६,९००/- दंडाची रक्कम होत आहे. ठेकेदार यांनी काम पूर्ण केलेले असून दि.१०/०५/२०१८ रोजी 3 D मॉडेल (०२नग) ची डिलेव्हरी शिर्डी येथे बांधकाम विभागाचे कार्यालयात दिली आहे. वरील पार्श्वभूमीचा विचार करता ठेकेदार यांना दि.१०/०५/२०१८ अखेर मूदतवाढ मंजूर होऊन दंडाची रक्कम माफ करणेस हरकत नाही, असे मत आहे.

ठेकेदार यांनी दि.१०/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये रु.८,९४,०००/- मात्र इतक्या रकमेचे पहिले व अंतीम बील सादर केले आहे. त्यानुसार त्यांना अंतिम बिलापोटी एकूण रु.८,९४,०००/- मात्र इतकी रक्कम देय होते.

**प्रस्ताव:** तरी श्री साईबाबा मंदिर व परिसराचे थ्री डी मॉडेल (०२ नग) तयार करणे कामाचे ठेकेदार कमल मॉडेल्स प्रा.लि., नवी दिल्ली यांना दि.१०/०५/२०१८ अखेर मूदतवाढ मंजूर होणेस तसेच या कामाचे पहीले व अंतिम देयक रक्कम रु.८,९४,०००/- मात्र ठेकेदार यांना आदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४६३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर व परिसराचे थ्री डी मॉडेल (२ नग) तयार करणे कामाचे ठेकेदार कमल मॉडेल्स प्रा.लि.,नवी दिल्ली यांना दि.१०/०५/२०१८ अखेर मूदतवाढ देण्यात येऊन सदरहु कामाचे पहीले व अंतिम देयक रक्कम रु.८,९४,०००/- मात्र कमल मॉडेल्स प्रा.लि.,नवी दिल्ली यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच समाधी मंदिराचे थ्री डी मॉडेल तयार करुन घेण्याचे ठरले व त्यासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच यावेळी समाधी मंदिर परिसराचे Video Walk through करुन घेण्याचे ठरले. त्यासाठी सविस्तर प्रस्ताव समितीसमोर सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)

---

विषय नं.४ **मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं. १६९ मध्ये वर्ग- ०४ कर्मचारी निवासस्थान बांधकाम ठेकेदार मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांचे लवाद (Arbiration) फी बाबत...**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :**

१. अधिनियम १७ (२) (च) विश्वस्तव्यवस्थेशी संबंधित असे कोणतेही दावे, खटले व इतर कायदेशीर कार्यवाही, न्यायालयात किंवा न्यायाधिकरणापुढे किंवा इतर प्राधिकरणामुळे दाखल करील व त्या संबंधात बचाव करील; अशी तरतुद आहे.

२. अधिनियम कलम २१ (१) (छ) कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकाकरणाचा किंवा कोणत्याही प्राधीकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा निवाडा याची पूर्ती करण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही रकमांचे प्रदान; अशी तरतुद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :**

१. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९/०७/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७.
२. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २७/०२/२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१८६.
३. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०८/१०/२०१३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८१०.
४. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २३/०५/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२९९.
५. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६१५.

**प्रस्तावना:**- संस्थानचे मौजे निमगांव कोऱ्हाळे येथील गट नं. १६९ मधील जागेत संस्थानचे वर्ग ०४ कर्मचारी यांचे करीता निवासस्थानचे बांधकाम करण्यात आले आहे. ठेकेदार मे. अस्मिता इंडीया लि. व संस्थान यांचेमध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय येथे Arbitration application no 142/ 2010 वरील सुनावणी नुसार प्रस्तुत प्रकरणी Arbitration दि.०१ मार्च, २०१२ पासुन सुरु होते. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/०२/२०११ रोजीचे सभेत निर्णय क्र.१८६ अन्वये उपरोक्त कायदेशीर कारवाई करणेकामी अॅड. सचिन शानबाग व अॅड. अमृत वेरनेकर, मुंबई यांची नियुक्ती करणेस तसेच त्यांचे सल्ल्याने Arbiration ची नेमणूक करणेस व त्यांची फी अदा करणेस मान्यता देण्यात आली. त्सानुसार प्रस्तुत प्रकरणी संस्थानचे वतीने अॅड. सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ट विधीज्ञ अॅड अमृत वेर्नेकर, मुंबई यांनी काम पाहीले आहे. याकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे ऑर्डर नुसार Presiding Arbitrator म्हणून एफ. आय. रिबेलो, अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधिश व संस्थानचे वतीने Arbitrator डॉ. कृष्णभुषण एकनाथ महाशब्दे व वादी (Claimant) यांचेवतीने श्री. एन. ए. बढेका यांची नेमणूक करणेत आलेली आहे.

अस्मिता इंडीया लि., मुंबई यांनी रु.२,०७,५०,४४१/- मात्र इतक्या रकमेचा क्लेम लवादाकडे दाखल केला आहे. संस्थानमार्फत रुपये १,३५,००,०००/- मात्र रकमेचा काऊंटर क्लेम करणेत आला असून प्रस्तुत प्रकरणी खालील तारखांना Arbiration च्या मिटींग झालेल्या आहेत.

| अ.नं. | तारीख | अ.नं. | तारीख |
|---|---|---|---|
| ०१. | दि.०१ मार्च, २०१२ | १६. | दि.०३ ऑक्टोबर, २०१३ |
| ०२. | दि.१८ जून, २०१२ | १७. | दि.२८ नोव्हेंबर, २०१३ |
| ०३. | दि.२६ जुलै, २०१२ | १८. | दि.१२ फेब्रुवारी, २०१४ |
| ०४. | दि.२१ ऑगस्ट, २०१२ | १९. | दि.१७ जून, २०१४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०५. | दि.२२ ऑक्टोबर, २०१२ | २०. | दि.१६ सप्टेंबर, २०१४ |
| ०६. | दि.२३ ऑक्टोबर, २०१२ | २१. | दि.०९ ऑक्टोबर, २०१४ |
| ०७. | दि.०८ जानेवारी, २०१३ | २२. | दि.१६ फेब्रुवारी, २०१५ |
| ०८. | दि.०९ जानेवारी, २०१३ | २३. | दि.१७ फेब्रुवारी, २०१५ |
| ०९. | दि.१० जानेवारी, २०१३ | २४. | दि.२७ जून, २०१५ |
| १०. | दि.२१ मार्च, २०१३ | २५. | दि.१० ऑगस्ट, २०१५ |
| ११. | दि.१७ जुलै, २०१३ | २६. | दि.११ ऑगस्ट, २०१५ |
| १२. | दि.१८ जुलै, २०१३ | २७. | दि.१२ ऑगस्ट, २०१५ |
| १३. | दि.०७ ऑगस्ट, २०१३ | २८. | दि.१३ ऑगस्ट, २०१५ |
| १४. | दि.०८ ऑगस्ट, २०१३ | २९. | दि.३० सप्टेंबर, २०१५ |
| १५. | दि.०१ ऑक्टोबर, २०१३ | | |

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३ ऑगस्ट, २०१४ रोजीचे सभेत ॲड. सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ ॲड. अमृत वेर्नेकर यांचे फी बाबत त्यांचेशी चर्चा करुन निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदरचे सभेत निर्णय क्र. ६१५ खालील प्रमाणे झालेला आहे.

“.. यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं. १६९ मध्ये वर्ग ०४ कर्मचारी निवास्थान बांधकामाचे ठेकेदार मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा. लि., मुंबई यांचे लवादाबाबत चर्चा करणेसाठी ॲड. शानबाग आजचे सभेत उपस्थित होते, समितीने त्यांचेबरोबर वकील फी व लवाद प्रकरण याबाबत चर्चा झाली. वकील फीचे दर पूर्वी ठरलेले आहेत असे दिसते. परंतू प्रकरणाची अद्याप निर्गती (Decision) झालेला नाही. तेंव्हा श्री. शानबाग यांचेकडे विचारणा करता ८-९ सिटींगमध्ये पुर्ण होईल असे त्यांनी सांगीतले. त्यावरुन समितीने असा निर्णय घेतला की, श्री. शानबाग यांना यापुढे जास्तीत जास्त १० सिटींगची फी पूर्वीचे दराने द्यावी, तो पर्यंतही प्रकरणाची निर्गती (Decision) झाली नाही तर फीचे बाबतीत त्यांना वाटाघाटीसाठी बोलविणेत यावे.

तसेच ॲड. शानबाग यांचेकडून पुढील कालावधीच्या फीचे दराबाबत मागणीपत्रक घेण्यात यावे व सध्या त्यांनी मागणी केलेल्या रु.८,८५,०००/- मात्र वकील फी पैकी ५०% रक्कम रु.४,४२,५००/- मात्र त्यांना आदा करणेत यावी असे ठरले.”

उपरोक्त प्रमाणे झालेले निर्णयानुसार ॲड. शानबाग यांना रु.४,४२,५००/- मात्र वकिल फी अदा करणेत आली आहे. तसेच वरील निर्णयानुसार याप्रकरणी ०८ सिटींगचे व इतर अनुषंगीक खर्चाचे एकुण रु.६,४०,०००/- बिले त्यांना आदा करणेत आली आहे. प्रस्तुत प्रकरणी ॲड. सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ, अमृत वेर्नेकर, मुंबई यांना आजपावेतो रु.२४,७५,९५०/- मात्र इतकी फी अदा करणेत आली आहे.

आता, प्रस्तुत प्रकरणी ॲड. सचिन शानबाग, मुंबई यांनी त्यांचेकडील दि.०९/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये, वरीलप्रमाणे यापूर्वी सादर केलेले रु.८,८५,०००/- मात्र फी पैकी शिल्लक असलेले रु.४,४२,५००/- मात्र फी मिळणेबाबत विनंती केली आहे.

विभागाचा अभिप्राय:- प्रस्तुत लवाद प्रकरणी ॲड. सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ अमृत वेर्नेकर, मुंबई यांना मा. व्यवस्थापन समितीचे वेळोवेळी झालेले निर्णयानुसार आजपावेतो रु.२४,७५,९५०/- इतकी फी अदा करणेत आलेली असल्याने, त्यांनी मागणी केलेली रु.४,४२,५००/- फी देय होत नाही असे मत आहे.

प्रस्ताव:- प्रस्तुत प्रकरणाच्या लवादाच्या बैठका पूर्ण झाल्या असून, सदर प्रकरणाची निर्गती (Decision) होणे बाकी आहे. तरी याप्रकरणी ॲड.सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ, अमृत वेर्नेकर, मुंबई यांना तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दि.०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६१५ अन्वये त्यांचे वकील फीचे रु.८,८५,०००/- पैकी ५०% रक्कम रु.४,४२,५००/- मात्र अदा करणेबाबत ठरले आहे. त्यानुसार त्यांना फी अदा करणेत आलेली आहे. याप्रकरणी त्यांना आजपावेतो रु.२४,७५,९५०/- फी अदा करणेत आलेली आहे. त्यामुळे त्यांनी मागणी केलेली रु.४,४२,५००/- फी देय होत नाही माहितीस्तव तथा मार्गदर्शनासाठी सादर.

निर्णय क्र.४६४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं. १६९ मध्ये वर्ग- ०४ कर्मचारी निवासस्थान बांधकाम ठेकेदार मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांचे लवाद (Arbiration) फी प्रकरणी ॲड. सचिन शानबाग व त्यांचे वरिष्ठ विधीज्ञ अमृत वेर्नेकर, मुंबई यांना मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने वेळोवेळी आजपावेतो रु.२४,७५,९५०/- इतकी फी अदा करणेत आलेली आहे.**

**समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांनी सदर केसची माहिती घेऊन अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, तो पर्यंत बांधकाम ठेकेदार मे. अस्मिता कन्स्ट्रक्शन प्रा.लि., मुंबई यांचे लवाद (Arbiration) फी आदा करणेत येऊ नये, असे ठरले. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.५** **साईभक्त कै.तात्याजी कोते पाटील यांच्या मंदिर परिसरातील समाधीचे नूतनीकरण, टाईल्स लावणे व दुरुस्तीचे काम स्वखर्चाने करण्यास परवानगीसाठी श्री.मुकूंदराव बाजीराव कोते यांनी केलेल्या विनंतीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतूद कलम २१– पोटकलम (१) (क)–"मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे."

प्रस्तावना– श्री.मुकूंदराव बाजीराव कोते पा. यांनी दि.२४/०४/२०१८ रोजीचे विनंती अर्जाने, ते व त्यांचे ०९ बंधू मंदिर परिसरातील साईभक्त कै. तात्याजी कोते पाटील यांच्या समाधीचे नूतनीकरण करण्याचे काम स्वखर्चाने करणार असल्याचे कळविले आहे. तथापी ते नूतनीकरण कशा प्रकारे करणार आहेत याबाबतचा तपशिल पत्रात नसल्याने, इकडील जा.न.एसएसएसटी/बांधकाम/ ६६३/२०१८ दि.०९/०५/२०१८ चे पत्रान्वये त्यांना कळविणेत आले होते. याबाबत दि.३१/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये श्री.मुकूंदराव बाजीराव कोते पा. यांनी नूतनीकरण कामामध्ये खालील कामे करणार असल्याचे कळविले आहे.

१. कै.तात्यांच्या पादुका असलेल्या गटाची ऊंची वाढविणे.
२. समाधीच्या आजुबाजूस नविन टाईल्स बसविणे.
३. पाण्याचा निचरा होणेसाठी व्यवस्था करणे.
४. समाधीच्या ठिकाणी लाईटची व्यवस्था करणे.
५. आवश्यक रंगकाम करणे.

समाधी मंदिर परीसरामध्ये गेट नं.०४ समोर श्रींचे समकालीन असलेले साईभक्त कै.तात्याजी कोते पाटील, कै.भाऊ महाराज कुंभार, कै. व्ही. पी. अय्यर, कै.नानावली व पै.अब्दुलबाबा यांच्या समाध्या आहेत. पूर्वीपासून सदरहू समाध्यांची देखभाल व पुजाअर्चा ही संस्थानमार्फत करणेत असून त्या ठिकाणी संस्थानमार्फत दक्षिणापेटया बसविणेत आलेल्या आहेत. सन १९९८-९९ मध्ये मंदिर व परिसराच्या नुतनीकरणाच्या कामाच्या वेळी सदरहू समाध्यांचे एकत्रितपणे नूतनीकरण करण्यात आलेले आहे. सध्या मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने संपूर्ण मंदिर परिसरात नविन फरशी बसविण्याचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे.

विभागाचा अभिप्राय–साईभक्त कै. तात्याजी कोते पाटील यांच्या समाधीचे नूतनीकरणासाठी वर नमूद कामे श्री. मुकुंदराव कोते पा. व त्यांचे बंधू स्वखर्चाने करण्यास तयार आहेत. त्यासाठी परवानगी देणेकरीता मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल. सदरचे काम संस्थानचे देखरेखीखाली व सूचनांप्रमाणे करण्याचे अटीवर मान्यता देता येईल अथवा वर नमूद सर्व समाध्यांचे नूतनीकरण संस्थानमार्फत करुन घेता येईल. याकामी अंदाजे रक्कम रु.२.४७ लक्ष मात्र खर्च अपेक्षीत आहे. त्यापैकी अंदाजे रु.७०,०००/- मात्र अपेक्षित खर्चाचे रंगकामाचा समावेश सध्या चालू असलेल्यां मंदिर परिसर रंगकामाचे निविदेमध्ये आहे. त्याच्याव्यतिरिक्त फ्लोअरींग व समाध्यांना ग्रॅनाईट बसविणे, मोल्डींग करणे या उर्वरित कामांसाठी अंदाजे रु.१.७७ लक्ष इतका खर्च अपेक्षीत आहे.

प्रस्ताव– तरी कै.तात्याजी कोते पाटील यांच्या मंदिर परिसरातील समाधीचे नूतनीकरण व टाईल्स लावणे ही कामे स्वखर्चाने करण्यासाठी श्री. मुकुंदराव कोते पा. यांना परवानगी देणे अथवा वर नमूद सर्व समाध्यांचे नूतनीकरण संस्थानमार्फत करणेस व त्यासाठी येणारे रक्कम रु.१.७७ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देणे यापैकी एका पर्यायावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४६५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईभक्त कै.तात्याजी कोते पाटील यांच्या मंदिर परिसरातील समाधीचे नूतनीकरण, टाईल्स लावणे व दुरुस्तीचे काम स्वखर्चाने करण्यास परवानगीसाठीचा श्री.मुकूंदराव बाजीराव कोते यांचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला. त्याऐवजी साईभक्त कै.तात्याजी कोते पाटील यांच्या मंदिर परिसरातील समाधी व त्यालगतच्या इतर साईभक्तांच्या समाधीचे नुतनीकरण व दुरुस्तीचे काम संस्थानमार्फत करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.६** **श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे आयोजनासाठी जागेची निश्चिती करणेबाबत...**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे,भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) अधिनियमाचे कलम १७.(२) ठ - श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

शासन निर्णयः-महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३/ प्र.क्र.०१/का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता रु.३,०२३.१७ कोटी इतक्या रकमेच्या कृती आराखड्यास दि.३१/०३/२०१७ रोजी मान्यता दिली आहे. सदर आराखडयात संस्थानचे प्रथम व व्दितीय प्राधान्य गटात असे एकुण रु.१,८२८.३१ कोटी इतक्या रकमेचे प्रकल्प प्रस्तावीत असून वरीलपैकी व्दितीय प्राधान्य गटातील रु.१,२५२.८५ कोटी निधीची मागणी करणारा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. तसेच प्रथम प्राधान्य गटातील अ.नं. १२ मध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनासाठी रु.२५ कोटी मात्र अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली असून, पारायण तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनानिमित्त ७० दिवसांकरीता मंडप टाकून त्यात अनुषंगिक व्यवस्था पुरविणे तसेच श्री साईचरित्र महापारायणाकरीता एकाचवेळी ५० हजार साईभक्त सामावू शकतील असे नियोजन करणे, असे नमुद केले आहे.

मा. व्यवस्थापन समिती सभा निर्णयः-

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१.

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे",

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४४१/९.

श्री साईचरित्र पारायण सोहळा दि.१६/०८/२०१८ ते दि. २३/०८/२०१८ या कालावधीत आयोजित करणेत यावा. श्री साईचरित्र पारायण सोहळा श्री साई प्रसादालयासमोरील श्री शिवाजी गोंदकर यांचे जागेत करणेत यावा.

प्रस्तावनाः- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी हे नाट्यरसिक संचाचे सहकार्याने गेली २३ वर्षे श्री साई सच्चरित पारायण सोहळा साजरा करीत आलेले आहे. श्री साईबाबा समाधी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने यावर्षी महापारायण सोहळा साजरा करण्याचा मानस असल्याने श्री.आप्पासाहेब खंडू कोते, अध्यक्ष, नाटयरसिक संच ,शिर्डी यांनी यापुर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांना अग्रेषित केलेल्या दि.०९/०४/२०१८ रोजीचे पत्रांमध्ये दरवर्षी श्री साईचरीत्र पारायण सोहळयासाठी पुरुष व महिला मिळून अंदाजे ६००० पारायणार्थी बसतात. यंदा महापारायण सोहळा आयोजित करावयाचा असल्याने यावर्षीचे पारायणाचे नियोजन श्री शिवाजी गोंदकर, शिर्डी यांचे श्री साई प्रसादालयासमोरील सर्व्हे नं. १६४/०९ मधील जागेत करावे. सदर जागेचे एकूण क्षेत्रफळ ५५ गुंठे असून त्याची लांबी ९०० फुट तर रुंदी ३०० फुट आहे. याशिवाय आवश्यकता वाटल्यास श्री गोंदकर यांचे शेजारील जागा – प्लॅाट रिकामा करुन देण्यास तयार आहेत. तरी यावर्षीचे श्री साई सतचरित्र पारायण सोहळयाचे नियोजन दि.१६/०८/२०१८ ते दि.२३/०८/२०१८ या कालावधीत श्री शिवाजी गोंदकर, शिर्डी यांचे जागेत करुन तेथे मंडप व इतर अनुषंगिक सर्व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात हि विनंती, असे कळविले होते.

त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला त्यावर निर्णय क्रं.४४१/९ अन्वये श्री साईचरित्र पारायण सोहळा श्री साई प्रसादालयासमोरील श्री शिवाजी गोंदकर यांचे जागेत करणेत यावा असे ठरलेले आहे.

आता श्री तुकाराम शंकरराव गोंदकर, अध्यक्ष, योगीराज श्री गंगागिरिजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह समिती शिर्डी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना अग्रेषित केलेल्या दि.१३/०७/२०१८ रोजीच्या पत्राव्दारे,"आम्ही यापुर्वी आपणास श्री साईचरित्र पारायण सोहळयासाठी प्रसादालयासमोरील श्री शिवाजी अमृतराव गोंदकर व शेळके कुटूंबियांची जागा निश्चित केली होती. परंतु प्रसादालयासमोर होणारी गर्दी लक्षात घेता सदर पारायण त्या जागेवर न करता श्री रमेश भाऊसाहेब गोंदकर व इतर यांची प्रसादालयासमोरील पश्चिम बाजूला असलेली जागा निश्चित करीत आहोत असे नमूद करुन गोंदकर बंधूनी हि जागा या वर्षी श्री साईचरित्र पारायणाकरीता विनामोबदला दिली आहे, असे कळविलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व नाटय रसिक संच तसेच शिर्डी गामस्थ यांचे संयुक्त विद्यमाने सन १९९५ पासून म्हणजेच गेल्या २३ वर्षापासून दरवर्षी श्रावण शु.१ ते श्रावण शु.८/९ या तिथीत सामुदायिक श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे मंदिर परिसरात व आता १६ गुंठे जागेत (आताचा श्री साईबाबा समाधीशताब्दीमंडप) आयोजन करण्यात येत होते. यावर्षी शताब्दी महोत्सवी वर्षाचे निमित्ताने पारायणार्थींची संख्या सुमारे २० हजार पर्यंत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सन २०१७ मधील साईचरित्र पारायण सोहळयासाठी सुमारे ६००० पारायणार्थी पारायणासाठी बसले होते व या सोहळयाचे आयोजन श्री साईबाबा समाधी शताब्दी मंडपात आयोजित केले होते आणि यासाठी सुमारे रु.१२,७२,२९८.०० मात्र इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. तथापि या वर्षी समाधी शताब्दी वर्ष असल्याने पारायणार्थींची संख्या वाढण्याची शक्यता असल्याने पारायणाची जागा निश्चित करणे आवश्यक असल्याने श्री साईचरित्र पारायण सोहळयाचे आयोजनाबाबतच्या सर्वसमावेशक बाबींवर निर्णय होणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०२/०५/२०१८ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला होता.

त्यावर निर्णय क्रं. २९१ अन्वये, "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात दरवर्षी प्रमाणे माहे ऑगष्ट मध्ये श्री साईचरीत्र पारायण सोहळयाचे आयोजन करणे व त्याबाबतच्या अनुषंगिक सुविधा उभारणेकामी मा.श्री.चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष, मा. श्री. भाऊसाहेब वाकचौरे, सदस्य व मा.श्री. बिपीनदादा कोल्हे, सदस्य यांनी ग्रामस्थांशी चर्चा करुन पारायणाच्या तारखा व स्थळ याबाबत अंतिम निर्णय घ्यावा, असे ठरले आहे."

तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी श्री साई चरित्र पारायण सोहळयाचे आयोजनासाठी जूने प्रसादालय परिसराची जागा योग्य असलेबाबत निर्देश दिले आहेत.

आता अखंड हरिनाम सप्ताह समितीने प्रसादालयासमोर होणारी गर्दी लक्षात घेता सदर पारायण त्या जागेवर न करता श्री रमेश भाऊसाहेब गोंदकर व इतर यांची प्रसादालयासमोरील पश्चिम बाजूला असलेली जागा सूचविलेली आहे.

याबाबत बांधकाम विभागास सदर जागेची पाहणी करुन सदर ठिकाणी पारायण सोहळयाचे आयोजन करता येईल किंवा कसे याबाबतचा अहवाल सादर करणेबाबत दि.१३/०७/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

बांधकाम विभागाने दि.१६/०७/२०१८ रोजीचे पत्रान्वये श्री रमेश गोंदकर, शिर्डी व इतर यांचे जागेत पारायण सोहळयाचे आयोजन करावयाचे झाल्यास

१) दि. १६/०८/२०१८ ते दि. २३/०८/२०१८ या कालावधीत योगिराज गंगागिरी महाराज यांचे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन श्री साई प्रसादालयाजवळील मौजे निमगांव को-हाळे शिवारातील शेती महामंडळाचे जागेत करणेत येणार आहे. सदर कालावधीतच श्री साईचरित्र पारायण सोहळा असल्याने श्री साई प्रसादालय समोरील श्री रमेश गोंदकर व इतर यांचे जागेमध्ये आयोजन केल्यास दोन्ही कार्यक्रमासाठी भाविक मोठया प्रमाणात येणार असल्याने त्यांची एकाच ठिकाणी गर्दी होईल व ते नियोजनाचे दृष्टीने जिकरीचे होईल,

२) श्री साईप्रसादालय समोरील श्री गोंदकर यांची जागा शिर्डी शहराच्या नाल्या नजिकची आहे. जादा प्रमाणात पाऊस झाल्यास या क्षेत्रात पावसाचे पाणी साचण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३) सदरहू क्षेत्रामध्ये पारायण करावयाचे झाल्यास तेथिल शेतामध्ये कडूनिंबाचे एकूण १३ मोठे उंच झाडे आहेत. त्यामुळे सदरहू ठिकाणी मंडप उभारणीस अडचण होणार आहे. त्याबाबत उपाययोजना करावी लागणार आहे.

४) सदरहू क्षेत्रामध्ये जवळपास अर्ध्या भागात मुरुम टाकून जागेच्या सपाटीकरणासह रोलींग करावी लागेल.

५) सदरहू क्षेत्राच्या दक्षिणेस असलेल्या शिर्डी शहराच्या नाल्यावर भाविकांना येण्या-जाण्यासाठी कच्चा पुल तयार केलेला आहे. सदरहु पुलाची आरसीसी पाईप टाकून रुंदी वाढवावी लागेल.

६) ११ ते १२ हजार पारायणार्थी यांची पार्कींग व्यवस्था तसेच टॉयलेट –बाथरुमची व्यवस्था स्वतंत्र करावी लागेल. असे नमूद केले आहे.

विभागाचा अभिप्रायः- श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षात दरवर्षीप्रमाणे आयोजित करावयाच्या पारायण सोहळयासाठी पारायणार्थींची संख्या लक्षात घेता अखंड हरिनाम सप्ताह समितीने सूचविलेल्या खाजगी जागेची निश्चिती करणेपुर्वी बांधकाम विभागाने सदरहू क्षेत्रामध्ये पारायण करावयाचे झाल्यास तेथील शेतामध्ये असलेल्या १३ मोठया कडूनिंबाच्या झाडामुळे मंडप उभारणीस अडचण होणार आहे. तसेच सदरहू क्षेत्रातील जवळपास अर्ध्या भागात मुरुम टाकून जागेच्या सपाटीकरणासह रोलींग करावे लागेल. त्यामुळे संस्थानला अशा खाजगी जागेचा विकास करणेसाठी शासनाची पुर्वपरवानगी घ्यावी लागेल. तरी सप्ताह समितीने आता सूचविलेल्या जागेत पारायण आयोजन करणे उचित ठरणार नाही, असे मत आहे.

प्रस्तावः- श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे आयोजन अखंड हरिनाम सप्ताह समितीने सूचविलेल्या श्री रमेश भाऊसाहेब गोंदकर व इतर यांचे श्री साई प्रसादालयासमोरील जागेत करावे किंवा संस्थानचे जूने प्रसादालय परिसरात आयोजित करावे किंवा संस्थानचे साईनगर पाठीमागील नव्याने अतिक्रमण काढलेल्या जागेवर करावे.

निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.४६६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईसच्चरित पारायण सोहळयाचे आयोजनासाठी जागेची निश्चिती करणेबाबत ग्रामस्थ व नाटय रसिक संच यांचेशी चर्चा करुन स्थानिक उपसमितीने निर्णय घ्यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

विषय नं.७ **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त योगीराज सदगुरु गंगागिरीजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताहासाठी सप्ताह समितीस रु. ७५/- लक्ष मात्र इतके अर्थसहाय्य करणेबाबत शासनाकडील प्राप्त पत्राबाबत.**

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय** –

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २२८.

"योगीराज सदगुरु गंगागिरीजी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहासाठी राज्यभरातून मोठ-मोठया देणग्या प्राप्त होत असतात, याकरीता अध्यक्ष, योगीराज श्री गंगागिरिजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह समिती शिर्डी यांचे उपरोक्त पत्रातील व यानंतरही प्राप्त होणाऱ्या पत्रामधील मागण्या अमान्य करणेत आल्या. तसेच सदरहू सप्ताहासाठी संस्थानमार्फत रु.७५/- लाख मात्र खर्चाची रक्कम छाननी समिती व शासन मान्यतेने सप्ताह समितीस देण्यात यावी. संस्थानचा सहभाग केवळ सदर निधी देणेपुरताच मर्यादित राहील. तसेच योगीराज सदगुरु गंगागिरीजी महाराज यांच्या अखंड हरिनाम सप्ताहासाठी येणाऱ्या भाविकांच्या दर्शनासाठी सदरहू ठिकाणी श्रींच्या मुळ पादुका उपलब्ध करुन द्यावयाच्या असल्याने, श्रींच्या पादुकांसाठी स्वतंत्र वेगळे स्टेज तयार करणेत यावे व पादुकांजवळ संस्थानच्या दक्षिणा पेटया ठेवण्यात याव्यात. त्याचप्रमाणे सप्ताह समितीमध्ये सर्व व्यवस्थापन समिती सदस्यांचा समावेश करणेबाबत अध्यक्ष, सप्ताह समिती यांना कळविणेत यावे"

**मा. छाननी समिती निर्णय-**

मा. छाननी समितीचे दि.२२/०५/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३२.

१. योगिराज सदगुरु श्री गंगागिरीजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह समितीने मा. सहा. धर्मदाय उपायुक्त यांचे दि. ०९/०४/२०१८ रोजी स्वाक्षांकित पत्राची पुर्तता करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना देणे.

२. सप्ताह समितीचा मा. सहाय्यक धर्मादाय उपायुक्त यांचेकडे अंतिम झालेला नोंदणी क्रमांक, कालमर्यादा, शर्ती व समिती सदस्यांचे नाव व पद याची अधिकृत प्रत संस्थानला देण्यात यावी.

३. सप्ताह समितीमध्ये शिर्डी संस्थानचे व्यवस्थापन समितीचे सर्व पदाधिकारी, पदसिध्द सभासद/सदस्य राहतील.

४. व्यासपीठावर दर्शनी भागात श्री साईबाबा यांचे पुर्णाकृती अंदाजे ५X५ फुट साईजचे फ्लेक्सचे फोटो लावण्यात यावेत आणि त्याखाली श्री साई शताब्दी वर्षाचा उल्लेख करणे.

५. ज्याठिकाणी सप्ताह समितीच्या सदस्यांचे नावाचे बोर्ड/फरक लावले जाईल त्याच ठिकाणी बाजूला व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्यांचे नावाचा बोर्ड लावावा लागेल.

६. मुख्य पाहुण्यांचे व इतर महनीय व्यक्तींचे स्वागत करतेवेळी स्वागताचा एक मान शिर्डी संस्थानचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापन समितीचे इतर सदस्य यांना राहील.

७. सप्ताह समाप्तीनंतर तीन महिन्याचे कालावधीत लेखापरिक्षणाचा अहवाल शिर्डी संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देणे आवश्यक राहील.

८. शासनाला मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविण्यास मान्यता आहे. शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर अनुदान वितरणापुर्वी समितीने वरील बाबींची पुर्तता करुन द्यावी व तदनंतरच अनुदान वितरीत करावे.

९. शासनाला छाननी समितीचे जे निकष आहे त्यात हा प्रस्ताव बसत नाही, याचीही माहिती देऊन सोबत निकषाची यादी जोडावी. परंतु साई समाधी शताब्दी वर्ष असल्याने सप्ताहासाठी विशेष बाब म्हणून मंजुरी देण्यात येत आहे.

१०. सप्ताह निमित्त शिर्डी संस्थानतर्फे एक रकमी रक्कम रु. ७५ लाख (अक्षरी रक्कम रुपये पंच्याहत्तर लाख) मात्र शासनाचे परवानगी नंतर वरील अटींचे अधिन राहून छाननी समिती मंजूर करीत आहे.

**प्रस्तावना-** श्री तुकाराम शंकरराव गोंदकर, अध्यक्ष, योगीराज श्री गंगागिरिजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह समिती शिर्डी यांनी योगिराज सदगुरु श्री गंगागिरीजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह आयोजनाकामी उपलब्ध करावयाच्या सोयी-सुविधांबाबत संस्थानकडे विविध मागण्या केलेल्या आहेत.

या मागण्यास अनुसरुन धोरणात्मक निर्णय घेणेबाबत दि.०४/०४/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावावार निर्णय क्र. २२८ उपरोक्त प्रमाणे पारीत झालेला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार अखंड हरिनाम सप्ताहासाठी योगिराज सदगुरु श्री गंगागिरीजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह समितीस रु. ७५/-लक्ष (अक्षरी रक्कम रुपये पंच्याहत्तर लक्ष) मात्र देणेबाबतचा प्रस्ताव मा. छाननी समितीचे दि. २२/०५/२०१८ रोजीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेत आला असता सदर सभेत निर्णय क्रं. ३२ उपरोक्त प्रमाणे पारीत झालेला आहे.

मा. छाननी समितीचे उपरोक्त निर्णयानुसार श्री तुकाराम शंकरराव गोंदकर पा. अध्यक्ष, अखंड हरिनाम सप्ताह समिती यांना दि.०९/०६/२०१८ रोजीचे पत्रान्वये छाननी समितीने निर्देशित केलेल्या बाबींचा पुर्तता अहवाल सादर करणेबाबत कळविले होते.

तसेच मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे अखंड हरिनाम सप्ताहासाठी सप्ताह समितीस रु.७५/- लक्ष मात्र इतके अर्थसहाय्य करणेबाबत दि.०१/०६/२०१८ रोजीचे पत्रान्वये विनंती केली आहे.

त्यांनतर मा.व्यवस्थापन समिती व मा. छाननी समितीने दिलेल्या निर्देशाप्रमाणे सप्ताह समितीने केलेली पूर्तता, खुलासा व सप्ताह समितीचे बॅंक आकाऊन्ट पासबुकची छायांकित प्रत मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे दि. ०३/०७/२०१८ रोजीचे पत्रासोबत सादर केली आहेत.

आता महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रेषित केलेल्या दि.०६/०७/२०१८ रोजीचे पत्रात

मुद्दा क्रं.(१)- शिर्डी ग्रामस्थांच्या वतीने योगिराज श्री गंगागिरीजी महाराज यांच्या १७१ व्या हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यासाठी रुपये ७५/- लाख इतक्या निधीच्या मागणीचा सकारात्मक विचार केल्यास भविष्यात या विषयाशी समरुप अनेक मागण्या शिर्डी संस्थानकडे प्राप्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मुद्दा क्रं.(२)- सदर पार्श्वभूमीवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन समिती मार्फतच योगिराज श्री गंगागिरीजी महाराज यांच्या १७१ व्या हरिनाम सप्ताहाचे आयोजन करणे संयुक्तिक होईल.

मुद्दा क्रं.(३)- यास्तव, अन्य समितीस श्री गंगागिरीजी महाराज यांच्या १७१ व्या हरिनाम सप्ताहासाठी रु.७५/- लाख निधी उपलब्ध करुन देण्याऐवजी याच आर्थिक मर्यादेत संस्थान मार्फत सदर सप्ताहाचे आयोजन करणे व्यवहार्य राहिल.

असे नमूद करुन उपरोक्त मुद्दयांच्या अनुषंगाने व्यवस्थापन समितीच्या विचारार्थ प्रस्ताव सादर करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा असे कळविलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग यांचे प्रस्तावात नमूद मुद्दयांबाबत खालीलप्रमाणे खुलासा सादर करता येईल.

१. संस्थानकडे विविध सप्ताह समितीकडून धार्मिक स्वरुपाच्या कार्यक्रमासाठी देणगी अथवा शिधा मिळणेकरीता प्रस्ताव येत असतात. तथापि अशा स्वरुपाच्या मागण्या संस्थान स्तरावर नाकारण्यात येतात. परंतु योगिराज सदगुरु गंगागिरीजी महाराज यांचा श्री साईसतचरित्रात उल्लेख आहे व त्यांनी श्री साईबाबा हे श्रेष्ठ रत्न आहे, असे नमूद केले आहे. त्यामुळे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्ताने विशेष बाब म्हणून योगीराज सदगुरु गंगागिरीजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह समितीस शासनाचे मान्यतेच्या अधिन राहून संस्थान व छाननी समिती रु.७५/- लक्ष इतके अनुदान देण्यास अनुकूल आहे. याव्यतिरिक्त इतर कोणत्याही संस्थाकडून आलेल्या मागणींचा विचार संस्थानकडून केला जात नाही. भविष्यातही असे प्रस्ताव प्राप्त झाल्यास मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने सदर प्रस्ताव नाकारले जातील.

२. श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने शिर्डी ग्रामस्थांनी श्री साईबाबा संस्थानचे आर्थिक सहभाग गृहित धरुन सप्ताहाचे आयोजन शिर्डीमध्ये केले आहे. योगिराज सदगुरु गंगागिरीजी महाराज अखंड हरिनाम सप्ताहास गेल्या १७० वर्षाची परंपरा असून सप्ताहाचे ०८ दिवसात संपूर्ण राज्यातून सुमारे १५ ते २० लक्ष भक्तगण उपस्थिती दर्शवितात. त्यामुळे या सप्ताहाची व्याप्ती फार मोठी आहे. सप्ताहाची मागील परंपरा पाहता सप्ताहाचे आयोजनासाठी साधारणपणे रु. ३.०० कोटी पेक्षा जास्त खर्च आहे संस्थान मार्फत सदर सप्ताह आयोजित केलयास रु. ७५.०० लक्ष पेक्षा जास्त खर्च संस्थानला करावा लागेल. सप्ताहाचे नियोजनासाठी आयोजक व पंचक्रोशीतील नागरीक रात्रंदिवस झटत असतात. त्यामुळे ह्या सप्ताहाचे आयोजन संस्थानमार्फत करावयाचे झाल्यास संस्थानचे मोठया प्रमाणावर मनुष्यबळ वापरावे लागेल त्यामुळे संस्थानचे दैनंदिन कामकाजावर त्याचा परिणाम होईल.

३. संस्थानमार्फत प्रथेप्रमाणे दरवर्षी श्री साईचरित्र पारायण शिर्डीमध्ये आयोजित केले जाते. संस्थानने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने साईचरित्र पारायणाचे भव्य स्वरुपात आयोजन करणेचे निर्धारित केले आहे. शताब्दी वर्षानिमित्त सदर पारायण सोहळयासाठी सुमारे २० ते २५ हजार पारायणार्थी बसण्याची शक्यता आहे. याच कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यामुळे एकाच वेळी पारायण व अखंड हरिनाम दोन्ही कार्यक्रमांचे आयोजन संस्थानमार्फत करावयाचे झाल्यास संस्थानचे मोठया प्रमाणावर मनुष्यबळ वापरावे लागेल त्यामुळे संस्थानचे दैनंदिन कामकाजावर त्याचा परिणाम होईल.

४. त्यामुळे सदर सप्ताहासाठी रु.७५/- लक्ष इतकी रक्कम संस्थानकडून उपलब्ध करुन देणे श्रेयस्कर राहिल. सप्ताह आयोजन समितीकडून केलेल्या खर्चाचे लेखापरिक्षण करुन घेता येईल.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमित्त योगीराज सदगुरु गंगागिरीजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताहासाठी सप्ताह समितीस रु.७५/- लक्ष मात्र इतके अर्थसहाय्य करणेबाबत शासनाकडे उपरोक्त प्रमाणे अहवाल पाठविणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४६७ यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन पत्रात उपस्थित केलेल्या मुदंयावर पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात यावे, असे ठरले.**

| अ.नं. | शासनाने उपस्थित केलेले मुद्दे | मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय |
|---|---|---|
| १ | शिर्डी ग्रामस्थांच्या वतीने योगिराज श्री गंगागिरीजी महाराज यांच्या १७१ व्या हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यासाठी रुपये ७५/- लाख इतक्या निधीच्या मागणीचा सकारात्मक विचार केल्यास भविष्यात या विषयाशी समरुप अनेक मागण्या शिर्डी संस्थानकडे प्राप्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. | संस्थानकडे विविध सप्ताह समितीकडून धार्मिक स्वरुपाच्या कार्यक्रमासाठी देणगी अथवा शिधा मिळणेकरीता प्रस्ताव येत असतात. तथापि अशा स्वरुपाच्या मागण्या संस्थान स्तरावर नाकारण्यात येतात. परंतु योगिराज सदगुरु गंगागिरीजी महाराज यांचा श्री साईसतचरित्रात उल्लेख आहे व त्यांनी श्री साईबाबा हे श्रेष्ठ रत्न आहे, असे नमूद केले आहे. त्यामुळे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्ताने विशेष बाब म्हणून योगीराज सदगुरु गंगागिरीजी महाराज १७१ वा अखंड हरिनाम सप्ताह समितीस शासनाचे मान्यतेच्या अधिन राहून संस्थान व छाननी समिती रु.७५/- लक्ष इतके अनुदान देण्यास अनुकूल आहे. याव्यतिरिक्त इतर कोणत्याही संस्थाकडून आलेल्या मागणींचा विचार संस्थानकडून केला जात नाही. भविष्यातही असे प्रस्ताव प्राप्त झाल्यास मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने सदर प्रस्ताव नाकारले जातील. |
| २ | सदर पार्श्वभूमीवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था व्यवस्थापन समिती मार्फतच योगिराज | श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने शिर्डी ग्रामस्थांनी श्री साईबाबा संस्थानचे आर्थिक सहभाग गृहित धरुन |

| | | |
|---|---|---|
| | श्री गंगागिरीजी महाराज यांच्या १७१ व्या हरिनाम सप्ताहाचे आयोजन करणे संयुक्तिक होईल. | सप्ताहाचे आयोजन शिर्डीमध्ये केले आहे. योगिराज सदगुरु गंगागिरीजी महाराज अखंड हरिनाम सप्ताहास गेल्या १७० वर्षाची परंपरा असून सप्ताहाचे ०८ दिवसात संपूर्ण राज्यातून सुमारे १५ ते २० लक्ष भक्तगण उपस्थिती दर्शवितात. त्यामुळे या सप्ताहाची व्याप्ती फार मोठी आहे. सप्ताहाची मागील परंपरा पाहता सप्ताहाचे आयोजनासाठी साधारणपणे रु. ३.०० कोटी पेक्षा जास्त खर्च आहे संस्थान मार्फत सदर सप्ताह आयोजित केलयास रु. ७५.०० लक्ष पेक्षा जास्त खर्च संस्थानला करावा लागेल. सप्ताहाचे नियोजनासाठी आयोजक व पंचक्रोशीतील नागरीक रात्रंदिवस झटत असतात. त्यामुळे ह्या सप्ताहाचे आयोजन संस्थानमार्फत करावयाचे झाल्यास संस्थानचे मोठया प्रमाणावर मनुष्यबळ वापरावे लागेल त्यामुळे संस्थानचे दैनंदिन कामकाजावर त्याचा परिणाम होईल. |
| ३ | यास्तव, अन्य समितीस श्री गंगागिरीजी महाराज यांच्या १७१ व्या हरिनाम सप्ताहासाठी रु.७५/- लाख निधी उपलब्ध करुन देण्याऐवजी याच आर्थिक मर्यादेत संस्थान मार्फत सदर सप्ताहाचे आयोजन करणे व्यवहार्य राहिल. | संस्थानमार्फत प्रथेप्रमाणे दरवर्षी श्री साईचरित्र पारायण शिर्डीमध्ये आयोजित केले जाते. संस्थानने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने साईचरित्र पारायणाचे भव्य स्वरुपात आयोजन करणेचे निर्धारित केले आहे. शताब्दी वर्षानिमित्त सदर पारायण सोहळयासाठी सुमारे २० ते २५ हजार पारायणार्थी बसण्याची शक्यता आहे. याच कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यामुळे एकाच वेळी पारायण व अखंड हरिनाम दोन्ही कार्यक्रमांचे आयोजन संस्थानमार्फत करावयाचे झाल्यास संस्थानचे मोठया प्रमाणावर मनुष्यबळ वापरावे लागेल त्यामुळे संस्थानचे दैनंदिन कामकाजावर त्याचा परिणाम होईल. त्यामुळे सदर सप्ताहासाठी रु.७५/- लक्ष इतकी रक्कम संस्थानकडून उपलब्ध करुन देणे श्रेयस्कर राहिल. सप्ताह आयोजन समितीकडून केलेल्या खर्चाचे लेखापरिक्षण करुन घेता येईल. |

**(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

**विषय नं.८** **दि. २५ ऑगस्ट २०१८ रोजी श्री रविंद्र हरणे, संत ज्ञानेश्वर भजन मंडळ, पथरोट यांचा कार्यक्रम आयोजीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबांच्या समाधीस ऑक्टोबर २०१८ मध्ये १०० वर्ष पुर्ण होत असल्यामुळे श्री साईबाबा संस्थान यांच्या वतीने दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ हा कालावधी "श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष" म्हणून साजरा केला जात आहे. यासाठी शताब्दीचे संपुर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे, जेणेकरुन संपुर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहुन श्री साईबाबा समाधी सोहळा अविस्मरणीय होईल या दुष्टीने कामकाज चालु आहे.

याच अनुषंगाने शताब्दी कक्षामार्फत प्रत्येक महिन्याच्या दुस-या व चौथ्या शनिवारी विविध कलाकारांचे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२/०५/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२९० नुसार दि. २५/०८/२०१८ रोजी डॉ. लक्ष्मीकांत सहाकारी, गोवा यांचा ' भक्तीसंध्या ' हा कार्यक्रम ७.३० ते ९.३० या वेळेत समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे निश्चित करणेत आला आहे. तथापि आता मा. अध्यक्ष सो. यांनी दि. २५.०८.२०१८ रोजी श्री रविंद्र हारणे, संत ज्ञानेश्वर भजन मंडळ, पथ्रोट यांचा कार्यक्रम ठेवण्यात यावा व त्यांना मानधन म्हणुन रक्कम रु. २५०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र ) देण्यात यावे व त्या दिवशी इतर कोणाचा कार्यक्रम यापुर्वी निश्चित केला असल्यास त्यांचा कार्यक्रम इतर दिवशी ठेवण्यात यावा असे निर्देश मा. श्री गमे साहेब, प्रशासकीय अधिकारी, यांना दिल्याचे त्यांनी समक्ष सांगितले आहे.

**विभागाचा अभिप्राय-** मा. व्यवस्थापन समितीने शनिवार, दि.२५/०८/२०१८ डॉ.लक्ष्मीकांत सहकारी, गोवा यांचा कार्यक्रम निश्चित केला असल्याने आता मा. अध्यक्ष सो. यांनी दिलेल्या

निर्देशानुसार कार्यवाही करावयाची असल्यास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागेल व त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रमाचे समाधी मंदिर शताब्दी मंडप येथे नियोजन करता येईल.

| अ.नं. | वार, दिनांक व वेळ | प्रस्तावित कलाकाराचे नाव व ठिकाण | कार्यक्रमाची वेळ | कलाकार संख्या | मानधन रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | शनिवार, दि.२५/०८/२०१८ | श्री रविंद्र हारणे, संत ज्ञानेश्वर भजन मंडळ, पथ्रोट | ७.३० ते ९.३० | | २५,०००/- |
| ०२ | रविवार, दि. २६/०८/२०१८ | डॉ.लक्ष्मीकांत सहकारी, गोवा | ७.३० ते ९.३० | १० | ४५,०००/- |

**प्रस्ताव-** उपरोक्तप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे झाल्यास खालील बाबींवर निर्णय होणे आवश्यक आहे.

१. श्री रविंद्र हारणे, संत ज्ञानेश्वर भजन मंडळ, पथ्रोट संत ज्ञानेश्वर भजन मंडळ, पथ्रोट यांचा कार्यक्रम दि. २५.०८.२०१८ रोजी निश्चित करणेस व त्यांना मानधन म्हणून रक्कम रुपये २५०००/- (रक्कम रुपये पंचवीस हजार ) आदा करणेस.

२. डॉ. लक्ष्मीकांत सहकारी, गोवा यांचा दि.२५.०८.२०१८ रोजी निश्चित करणेत आलेला कार्यक्रम दि. २६.०८.२०१८ रोजी निश्चित करणेस.

तरी उपरोक्त बाबीवंर निर्णय होणेकामी सविनय सादर.

निर्णय क्र.४६८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रविंद्र हारणे, संत ज्ञानेश्वर भजन मंडळ,पथ्रोट यांचा कार्यक्रम दि. २५.०८.२०१८ रोजी निश्चित करुन त्यांना मानधन म्हणून रक्कम रुपये रु.२५०००/-मात्र आदा करणेस मान्यता देण्यात आली. तसेच डॉ. लक्ष्मीकांत सहकारी, गोवा यांचा दि.२५.०८.२०१८ रोजी निश्चित करणेत आलेला कार्यक्रम दि. २६.०८.२०१८ रोजी निश्चित करणेत यावा, असे ठरले. (कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

विषय नं.९ **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष महोत्सव वर्षानिमित्त दि.१० ऑक्टोबर, २०१८ ते दि.१९ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजनाबाबत....**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः-**

१) अधिनयामाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास आधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे. मंदिरामध्ये रूढी व प्रथेनुसार धार्मिक व पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे आणि या अधिनियामान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्त व्यवस्थेची उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील.

२) अधिनियामाचे कलम २१ मधील पोट कलम (१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करणे व पा

३) अधिनियामाचे कलम २१ मधील पोट कलम (१) (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे.

४) अधिनयामाचे कलम १७ मधील पोट कलम (२) (ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देणे.

५) अधिनियमाचे कलम २१ (२) पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर आणि विश्वस्त व्यवस्थेच्या उद्देशासाठी आणि मंदिराच्या नजीकच्या भविष्यातील गरजा, आवश्यकता व सुधारणा यासाठी तत्सम तरतूद केल्यानंतर जर विश्वस्तव्यवस्था निधीमध्ये, जादा शिल्लक राहीली तर, त्या जादा शिलकीच्या काही भागाचा समितीस, वेळोवेळी, पुढीलप्रमाणे सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी विनियोग करता येईल.

२१ (२) पोटकलम (१) (ग) मध्ये राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रीडा अकादमी अथवा संस्था, सार्वजनिक ग्रंथालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रीत अथवा शारीरीकदृष्टया विकलांग व्यक्तीसाठी आधारगृह किंवा धर्मादाय अथवा धार्मिक संस्था किंवा सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी केलेली, कला व साहित्य या क्षेत्राशी संबंधीत असलेली कोणतीही अन्य बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटना

अथवा सोसायटी स्थापन करणे व त्याची देखभाल करणे किंवा स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी अशा संस्थाना अथवा व्यक्तींना किंवा शिर्डी नगरपंचायतीला वित्तसहाय्य देणे.

**शासन निर्णयः**- महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सासंवि २०१३ / प्र.क्र.०१/का.१६ दि.२२/१०/२०१३ अन्वये मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता रु.३,०२३.१७ कोटी इतक्या रकमेच्या कृती आराखड्यास दि.३१/०३/२०१७ रोजी मान्यता दिली आहे. सदर आराखडयात संस्थानचे प्रथम व व्दितीय प्राधान्य गटात असे एकुण रु.१,८२८.३१ कोटी इतक्या रकमेचे प्रकल्प प्रस्तावीत असून वरीलपैकी व्दितीय प्राधान्य गटातील रु.१,२५२.८५ कोटी निधीची मागणी करणारा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणेत आला आहे. तसेच प्रथम प्राधान्य गटातील अ.नं. १२ मध्ये विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनासाठी रु.२५ कोटी मात्र अंदाजित खर्चास मान्यता मिळालेली असून, पारायण तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनानिमित्त ७० दिवसांकरीता मंडप टाकून त्यात अनुषंगिक व्यवस्था पुरविणे तसेच श्री साईचरित्र महापारायणाकरीता एकाचवेळी ५० हजार साईभक्त सामावू शकतील असे नियोजन करणे, असे नमुद केले आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय-** मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१ खालीलप्रमाणे पारीत झालेला आहे.

"*श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि. ०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे*", असे ठरलेले आहे.

**प्रस्तावनाः**- श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जात आहे.

यासाठी शिर्डी येथे भाविकांकरीता संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येत असून, या कार्यक्रमांचे आयोजनाबाबतचे प्रारूप वार्षिक कॅलेंडर तयार करण्यात आलेले होते.

त्यानुसार शताब्दी वर्षामध्ये विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. आता श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव अंतिम टप्यातील धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात येत आहे.

**विभागाचा अभिप्रायः**- श्री साईबाबा समाधी शताब्दी माहे-ऑक्टोबर-२०१८ मध्ये दि.१० ऑक्टोबर, २०१८ ते दि.१९ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये साईभजन संध्या, सांस्कृतिक कार्यक्रम, पुण्यतिथी उत्सव, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रम, मान्यवरांच्या हस्ते टपाल तिकट प्रकाशन, श्री साईबाबा प्रशासकीय प्रबोधिनीचे उदघाटन या कार्यक्रमांचे आयोजन करणेस यापूर्वी मान्यता देण्यात आलेली आहे.

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या समाधी शताब्दी समारोपाच्या निमित्ताने खालील तपशिलात नमूद केल्याप्रमाणे कार्यक्रम आयोजित करावे असे नम्र मत आहे.

| अ.नं | दिनांक | प्रस्तावित कार्यक्रामांचा तपशिल | कार्यक्रमांचे प्रस्तावित ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१. | १०/१०/२०१८ | भक्त मंडळाचे सभासदाचे महासंमेलन | साईनगर मैदान किंवा शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास किंवा शेतीमहामंडळाची जागा |
| ०२. | ११/१०/२०१८ | एक दिवसीय अखंड पारायण सोहळा | साईनगर मैदान किंवा शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास |
| ०३. | १२/१०/२०१८ | महाआरोग्य शिबीर (रक्तदान शिबीर, सर्व रोग निदान शिबीर, नेत्र तपासणी-नेत्र शस्त्रक्रीया व चष्मे वाटप अपंग व जयपूर, प्लॅस्टीक सर्जरी, कर्णबधिर यंत्रवाटप, जयपूर फुट शिबीर इत्यादी ) | साईनगर मैदान |
| ०३. | १३/१०/२०१८ | साई सेवक संमेलन | साईनगर मैदान किंवा शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास |
| ०४. | १४/१०/२०१८ | माजी. अध्यक्ष, उपाध्यक्ष व विश्वस्त, माजी. कार्यकारी | साईनगर मैदान किंवा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, लेखाधिकारी, निवृत्त प्रशासकीय अधिकारी व अधिक्षक, प्र, अधिक्षक व कर्मचारी यांचे संमेलन | शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास |
| ०५. | १५/१०/२०१८ | जागतिक साईमंदिर संमेलन | शताब्दी मंडप साईआश्रम भक्तनिवास |
| ०६. | १६/१०/२०१८ | ५०० ॲम्बुलन्स वाटप कार्यक्रम (शासन मान्यतेस अधिन राहून चेक वाटप) / श्री साईबाबा संस्थान कर्मचारी यांचे स्नेह संमेलन. | साईनगर मैदान |
| ०८. | १७/१०/२०१८ | पुण्यतिथी उत्सव, साईभजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साईनगर किंवा जुने साईप्रसाद निवासस्थान मैदान किंवा शताब्दी मंडप |
| ०९. | १८/१०/२०१८ | पुण्यतिथी उत्सव, साईभजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साईनगर किंवा जुने साईप्रसाद निवासस्थान मैदान किंवा शताब्दी मंडप |
| १०. | १९/१०/२०१८ | पुण्यतिथी उत्सव, साईभजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साईनगर किंवा जुने साईप्रसाद निवासस्थान मैदान किंवा शताब्दी मंडप |

**प्रस्तावः-** श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या अंतिम टप्यातील दि.१० ऑक्टोबर,२०१८ ते दि.१९ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीतील प्रत्येक दिवसाचे कार्यक्रमांचे स्वरूप व व्याप्ती, पुण्यतिथी उत्सवाचे स्वरूप, कार्यक्रमांचे ठिकाण, समारोप कार्यक्रमासाठी निमंत्रीत मान्यवरांची निश्चिती करणे. कार्यक्रम निश्चित झालेनंतर संस्थानचे विविध विभागामार्फत अंदाजपत्रक तयार करणे. यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेकामी सदरहू प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सविनय सादर.

निर्णय क्र.४६९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष महोत्सव वर्षानिमित्त दि.१० ऑक्टोबर, २०१८ ते दि.१९ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजनाबाबत स्थानिक उपसमितीमध्ये चर्चा करुन निर्णय घेण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

विषय नं.१० **मंदिर परीसर नविन दर्शनलाईनचे इलेक्ट्रीकल लोडसाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने कळविलेले चार्जेस आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा नियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एक प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क). मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**प्रस्तावः-** शिर्डी मध्ये श्रीं चे दर्शनासाठी येणा-या भक्तांचे दर्शन विना त्रासाचे व सुखकर व्हावे याकरीता साईनिवास अतिथीगृहाचे पश्चिम बाजूस असलेल्या साईप्रसाद नं.०१ व ०२ या इमारती पाडून त्याठिकाणी दर्शनलाईन विकसित करण्यात येणार असल्याने सदरील दर्शनलाईनकरीता कराव्या लागणा-या विद्युतीकरण कामांचे अंदाजपत्रक आर्किटेक्ट, मे.माथुर ॲण्ड कापरे, नवि दिल्ली यांचेमार्फत तयार करण्यात आले असून या प्रकल्पाचा एकुण वीजभार ३००० केव्हीए इतका वाढणार आहे. याकरीता लोड एक्सटेंशन कामी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे पत्रव्यवहार चालू आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने लोड एक्सटेंशन विषयी संस्थानला पत्र पाठवून लोड एक्सटेंशन करीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे भराव्या लागणा-या सिक्युरिटी डिपॉझिट चार्जेससह इतर चार्जेसची रक्कम भरणेविषयी कळविले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | Description | Amount (In Rs.) |
|---|---|---|
| 1 | 1.3% Fixed Service Connection Charges | 1,245/- |
| 2 | Non refundable 1.3% Sup.Charges | 71,960/- |
| 3 | Security Deposit | 1,41,00,000/- |
| 4 | Cost of Agreement | 400/- |
| 5 | Applications Registration Fee | 1,700/- |
| 6 | Installing Testing Fee | 350/- |
| 7 | Goods & Service Fax | 13,546/- |
| | **Total Amount (In Rs) :-** | **1,41,89,201/-** |

महावितरणे मागितलेले Security Deposit बाबत विद्युत विभागामार्फत जा.नं.एसएसएसटी/विद्युत/५७३/२०१८ दिनांक ०३-०५-२०१८ रोजी तसेच जा.नं.एसएसएसटी/विद्युत/८८९/२०१८ दिनांक २२-०५-२०१८ रोजीचे पत्रान्वये चौकशी करण्यात आलेली होती. त्यावर महावितरणचे मा.अधिक्षक अभियंता, अहमदनगर यांनी पत्र पाठवून Security Deposit बाबतचा खर्चाचा सविस्तर तपशिल पुढीलप्रमाणे कळविलेला आहे.

| Sr.No. | Description | Amount in Rs. |
|---|---|---|
| 01) | एक्सटेंशन लोड = ३००० के.व्ही.ए.<br>PF (पॉवर फॅक्टर) = ०.८<br>LF (लोड फॅक्टर) = ०.६<br>Unit Charges = Rs.12.40 | |
| ०२) | Total Unit = KVA x PF x No.Of Days x Hourse x LF<br>Total Unit = 3000 x 0.8 x 30 x 24 x 0.6<br>Total Unit = 10,36,800 x Rs.12.40 | |
| 03) | Energy Charges = Total Unit x Unit Charges<br>Energy Charges = 10,36,800 x Rs.12.40 | 1,28,56320.00 |
| 04) | Demand Charges = KVA x 250<br>Demand Charges = 3000 x 250 | 0,07,50,000.00 |
| 05) | Total (03 + 04) | 1,36,06,320.00 |
| 06) | Electricity Duty on total (21%) | 0,28,57,327.20 |
| 07) | Total (05+06) | 1,64,63,647.20 |
| 08) | Previous Paid Security Deposit | 0,23,71,600.00 |
| 09) | Total Amount | 1,40,92,047.20 |
| 10) | Round Up Security Deposit | 1,41,00,000.00 |

उपरोक्तप्रमाणे महावितरणाचे मा.अधिक्षक अभियंता, अहमदनगर यांनी Security Deposit बाबतच्या खर्चाचा सविस्तर तपशील कळविलेला असून त्यांनी कळविलेली Security Deposit ची रक्कम ही त्यांचे नियमानुसार आहे. त्यामुळे सिक्युरिटी डिपॉझिट चार्जेससह इतर चार्जेसची रक्कम रुपये १,४१,८९,२०१/- इतकी रक्कम महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे भरावी लागणार आहे.

**प्रस्ताव:-** उपरोक्तप्रमाणे नविन दर्शनलाईन लोडचे कामी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे भराव्या लागणा-या सिक्युरिटी डिपॉझिट चार्जेससह इतर चार्जेसची रक्कम रुपये १,४१,८९,२०१/- इतकी रक्कम अदा करणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

निर्णय क्र.४७० **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परीसर नविन दर्शनलाईनचे इलेक्ट्रीकल लोडसाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीस सिक्युरिटी डिपॉझिट चार्जेससह इतर चार्जेसची रक्कम रुपये १,४१,८९,२०१/-मात्र अदा करणेस मान्यता देण्यात आली. तत्पुर्वी नविन दर्शनलाईन कामी ३००० केव्हीए एवढा वीजभार आवश्यक आहे काय याची तपासणी करुन खात्री करुन घेण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही- उपकार्यकारी अभियंता,विद्युत विभाग)**

---

विषय नं.११ **व्दारावती भक्तनिवास मधील जुने स्प्लिट ए.सी बायबॅक करून नविन खरेदी करून बसविणेबाबत..**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतूद** : (१) कलम १७(झ) – सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. (२) कलम २१(क) – मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**प्रस्तावना** : श्री साईभक्तांचे सुविधेकरीता व्दारावती भक्तनिवासस्थान येथील ८० रुम्स मध्ये ए.सी. बसवून कार्यरत आहेत. या सर्व स्प्लिट ए.सी. चे मेन्टेनंन्स मेकॅनिकल विभागामार्फत करण्यात येत आहेत. सदर ए.सी. हे आठ ते दहा वर्षे जुने झाले असल्याने त्यांची वारंवार दुरुस्ती करावी लागते.सदरचे ए.सी. पुर्ण क्षमतेने कार्यरत राहत नाही. त्यामुळे साईभक्तांच्या सेवा सुविधेमध्ये व्यत्यय येत आहे. सध्या व्दारावती भक्तनिवासमधील रूममध्ये बसविणेत आलेल्या ए.सी.चा तपशील खालील :

| Sr.No. | Room No. | Dead Stock No. | Company/Model | Capacity | Purchase Date | Depreciation Cost up to 31-03-2018 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 401 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 2. | 402 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 3. | 403 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 4. | 404 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 5. | 405 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 6. | 406 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 7. | 407 | MCH/0327 | Voltas/Vertis | 1.5 टन | 08/06/2006 | 765/- |
| 8. | 408 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 9. | 409 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 16/06/2008 | 2,534/- |
| 10. | 410 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 11. | 411 | Store Room | | | | - |
| 12. | 412 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 13. | 413 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 14. | 414 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 15. | 415 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 16. | 416 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 17. | 417 | MCN/0065 | Voltas/Vertis Plus | 1.5 टन | 25/07/2006 | 771/- |
| 18. | 418 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 19. | 419 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 20. | 420 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 21. | 421 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 22. | 422 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 23. | 423 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 24. | 424 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 25. | 425 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 26. | 426 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 27. | 427 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 28. | 428 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 29. | 429 | MCH/0327 | Voltas/Vertis | 1.5 टन | 08/06/2006 | 765/- |
| 30. | 430 | MCH/0327 | Voltas/Vertis | 1.5 टन | 08/06/2006 | 765/- |
| 31. | 431 | MCH/0327 | Voltas/Vertis | 1.5 टन | 08/06/2006 | 765/- |
| 32. | 432 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 33. | 433 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 34. | 434 | MCH/0327 | Voltas/Vertis | 1.5 टन | 08/06/2006 | 765/- |
| 35. | 435 | MCH/0327 | Voltas/Vertis | 1.5 टन | 08/06/2006 | 765/- |
| 36. | 436 | MCH/0327 | Voltas/Vertis | 1.5 टन | 08/06/2006 | 765/- |
| 37. | 437 | MCH/0327 | Voltas/Vertis | 1.5 टन | 08/06/2006 | 765/- |
| 38. | 438 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 39. | 439 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 40. | 440 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 41. | 441 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 42. | 442 | MCN/0067 | Voltas/Vertis Gold | 2 टन | 13/04/2007 | 1,309/- |
| 43. | 443 | MCN/0067 | Voltas/Vertis Gold | 2 टन | 13/04/2007 | 3,009/- |
| 44. | 444 | MCN/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 45. | 445 | MCN/0065 | Voltas/Vertis | 1.5 टन | 25/07/2006 | 771/- |
| 46. | 446 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 47. | 447 | MCH/2742 | Voltas/Vertis Plus | 2 टन | 10/12/2011 | 4,781/- |
| 48. | 448 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 49. | 449 | MCN/0067 | Voltas/Vertis Gold | 2 टन | 13/04/2007 | 1,309/- |
| 50. | 450 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 51. | 451 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 52. | 452 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 53. | 453 | MCH/2742 | Voltas/Vertis Plus | 2 टन | 10/12/2011 | 4,781/- |
| 54. | 454 | MCH/0327 | Voltas/ Vertis | 1.5 टन | 08/06/2006 | 765/- |
| 55. | 455 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 56. | 456 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 57. | 457 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 58. | 458 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 59. | 459 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 60. | 460 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 61. | 461 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 62. | 462 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 63. | 463 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 64. | 464 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 65. | 465 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 66. | 466 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 67. | 467 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 68. | 468 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 69. | 469 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 70. | 470 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 71. | 471 | MCH/0327 | Voltas/ Vertis | 1.5 टन | 08/06/2006 | 765/- |
| 72. | 472 | Store Room | | | | - |
| 73. | 473 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 74. | 474 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 75. | 475 | MCH/2700 | Voltas/Vertis Premium | 2 टन | 13/06/2008 | 2,534/- |
| 76. | 476 | MCH/0327 | Voltas/Vertis | 1.5 टन | 08/06/2006 | 765/- |
| 77. | 477 | MCH/2760 | Oneida/Speed Cool | 1.5 टन | 03/05/2012 | 5,072/- |
| 78. | 478 | MCH/0327 | Voltas/ Vertis | 2 टन | 08/06/2006 | 765/- |
| 79. | 479 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 80. | 480 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 81. | 481 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| 82. | 482 | MCH/2730 | Voltas/Vertis Plus | 1 टन | 03/11/2010 | 3,014/- |
| | | | | | एकुण रक्कम रूपये : | २,०२,७०३/- |

**मागणी** : व्दारावती भक्तनिवास विभागातील जुने ए.सी. बायबॅक करुन, त्यांचे बदली नविन ए.सी. खरेदी करावे लागणार आहे. जेणेकरुन सदर ठिकाणचे ए.सी. सुस्थितीत कार्यरत राहतील. व्दारावती इमारतीतील चौथ्या मजल्यावरील रुम्स हया १६२ स्क्वे.फुट ते २६२ स्क्वे.फुट या वेगवेगळया साईजच्या असल्याने रुम्स साईजचा विचार करता खालीलप्रमाणे नवीन ए.सी. खरेदी करावे लागणार आहे.

| अ.नं. | तपशिल/क्षमता | नग |
|---|---|---|
| १. | ए.सी. २ टन | ४७ नग |
| २. | ए.सी. १.५ टन | ३३ नग |
| | एकूण | ८० नग |

उपरोक्तप्रमाणे एकूण नविन ८० ए.सी. खरेदी करावे लागणार आहेत. या ए.सी. खरेदीकामी येणा-या खर्चाचा अंदाजाकरीता विविध पुरवठादार यांचेकून दरपत्रके मागविण्यात आली होती. तसेच इंटरनेटव्दारेही दराची माहिती घेतली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत :

अ) नवीन ए.सी. २ टन

| तपशील | दर रुपये प्रती नग | नग | रक्कम |
|---|---|---|---|
| Split Type Wall Mounted Air Conditioner Capacity - 2 **Ton,** Three Star, Single Phase, Rotary Compressor, Copper Condenser, & Copper Piping With Outdoor Unit, Extra M.S. Stand with Ecofriendly Gas Make- Daikin/Hitachi /Mistubushi | 45,000/- | 47 | 21,15,000/- |

ब) नवीन ए.सी.१.५ टन

| तपशील | दर रुपये प्रती नग | नग | रक्कम |
|---|---|---|---|
| Split Type Wall Mounted Air Conditioner Capacity – 1.5 **Ton,** Three Star, Single Phase, Rotary Compressor, Copper Condenser, & Copper Piping With Outdoor Unit, Extra M.S. Stand with Ecofriendly Gas Make- Daikin/Hitachi /Mistubushi | 40,000/- | 33 | 13,20,000/- |

उपरोक्त दराप्रमाणे नविन ८० ए.सी. खरेदी करणेकामी रुपये-३४,३५,०००/- मात्रचा अंदाजे खर्च अपेक्षित आहे. सदरील खर्चाची तरतूद सन २०१८-२०१९ या वर्षातील 'मशीनरी खरेदी खर्च' या शिर्षातील अंदाजपत्रकात करता येईल. तसेच या मशीनरी खरेदीची कार्यवाही ई निविदा प्रक्रियाद्वारे करता येईल.

आवश्यक मान्यता : प्रशासकीय

विभागाचा स्पष्ट अभिप्राय : व्दारावती भक्तनिवासस्थान येथील रुम्स मध्ये सध्या वापरात असलेले ए.सी. जुने असून त्यांचा वापर अधिक झालेने त्यांची वारंवार दुरूस्ती करावी लागते. त्यामुळे सदरचे ए.सी बायबॅक देवुन नवीन ए.सी खरेदी करणे आवश्यक आहे. संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(४) मध्ये "विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित केलेले, पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहिर, दागिने व इतर मौलयवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज, समितीकडून विकण्यात येणार नाही, तारण म्हणून ठेवण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही " असे नमूद आहे, त्यानुसार जुने ए.सी. बायबॅक करणे पुर्वी शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेनतंर ए.सी.बायबॅकरीता शासनास प्रस्ताव पाठवून नवीन खरेदीकामी ई निविदा प्रक्रिया सुरु करता येईल.

संध्याचे ए.सी.बायबॅक करुन व्दारावती भक्तनिवासमधील सर्व रूम मध्ये बसविणेकामी नविन ए.सी. खरेदी करणे यासाठी महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करावी लागेल तसेच सदरील ए.सी. खरेदी करणेकरीता नविन ए.सी. ची किंमत तसेच बायबॅक दयावयाचे ए.सी. ची किंमत अशा स्वतंत्र दोन BOQ अपलोड करुन ई-निविदा मागविता येतील.

प्रस्ताव:- तरी व्दारावती भक्तनिवासस्थान येथील जुने ८० नग ए.सी. बायबॅक करणेकामी प्रस्ताव मान्यतेकरीता शासनास पाठविणेस व आवश्यक नविन ८० नग ए.सी. खरेदी करणेकामी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर निविदा प्रसिद्ध करुन ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ३४,३५,०००/- (अक्षरी रुपये- चौतीस लाख, पस्तीस हजार) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवासस्थान येथील जुने ८० नग ए.सी.बायबॅक करणेकामी प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास पाठविणेस तसेच आवश्यक नविन ८० नग ए.सी. खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.३४,३५,०००/- मात्र खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)**

---

**विषय नं.१२** **श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटलकरीता बसविण्यात आलेल्या सांडपाणी प्रक्रिया संयत्र (STP) करीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट (AMC) देणेबाबत ...**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतूद**: अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तंची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनासाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना**: श्री साईबाबा हॉस्पीटल (STP क्षमता 200 Cum/Day) व श्री साईनाथ रुग्णालय (STP क्षमता 150 Cum/Day) येथील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया संयत्र उभारणेत आलेले आहे. सदर प्रकल्पाची प्रत्येक वर्षी AMC देण्यात येत असते. मागील वर्षी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/०९/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८३१(८) अन्वये सदर प्रकल्पाचे वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (AMC)चे काम ठेकेदार मे. मे. ग्रीन सायंटिफीक डेव्हलोपमेंट (इ) प्रा. लि., मुंबई यांना एक वर्षासाठी रुपये ८,४०,०००/-मात्रचे रकमेत (दोन्ही प्लॅन्ट रुपये ७०,०००/- प्रती महिना) दिनांक ०१/१०/२०१७ ते दिनांक ३०/०९/२०१८ या कालावधीसाठी देणेत आलेले आहे.

सदरचा कालावधी हा दिनांक ३०/०९/२०१८ रोजी संपुष्टात येणार आहे. त्यानंतर सांडपाणी प्रक्रिया सयंत्राची पुढिल एक वर्ष कालावधीकरीता AMC देणेकामी ई-निविदा प्रक्रिया करावी लागणार आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे :

| अ.नं. | कामाचा तपशील | सध्या देणेत आलेल्या AMC ची रक्कम रु. | पुढिल एक वर्षाकरीता AMC देणेकामी ५ टक्के वाढ करुन होणारी अंदाजे रक्कम रु. |
|---|---|---|---|
| 1. | श्री साईबाबा हॉस्पीटल (STP क्षमता 200 Cum/Day) व श्री साईनाथ रुग्णालय (STP क्षमता 150 Cum/Day) येथील सांडपाणी सयंत्र वार्षिक AMC/Operation & Maintenance करणे. | ८,४०,०००/- | ८,८२,०००.०० |
| | | **एकूण अपेक्षित खर्च (एका वर्षाकरीता):** | ८,८२,०००/- |

उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेचे सन२०१८-२०१९ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणेकामी अंदाजे रक्कम रुपये ८,८२,०००/- (अक्षरी रुपये आठ लाख,ब्याऐंसीहजार) मात्र चा खर्च अपेक्षित आहे. सदरील AMC बाबतची कार्यवाही महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन ई-निविदा मागवून करता येईल. या कार्यवाहीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेचे सन२०१८-२०१९ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणेकामी ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय येथील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेचे सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट् (AMC) देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.८,८२,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)**

---

**विषय नं.१३** **श्री साई प्रसादालयातील जुन्या नादुरुस्त पाच चपाती मशीन्सची जाहीर लिलावात आलेल्या किमंतीनुसार विक्री करणेकामी पुढील कार्यवाहीस मान्यता मिळणेबाबत ...**

प्रस्ताव- अधिनियमामधील तरतूद २०१४ : (१) कलम २(१४)(घ) – भक्तांचे सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे (२) कलम २१(१)(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

प्रस्ताविक: श्री साई प्रसादालयात साईभक्तांना प्रसाद भोजनात चपाती पुरविणेकामी संस्थानने सनशाईन इंडस्ट्रीज, नोएडा यांचेकडून सन २०११ मध्ये प्रती तास २००० चपाती क्षमतेचे ३ मशीन्स खेरेदी २ व देणगी १) व सन २०१२ मध्ये २ मशीन्स (देणगी) अशा एकूण ५ चपाती मशीन्स घेतलेल्या होत्या. सदरील चपाती मशीन सन २०११ व सन २०१२ पासून वापरात असून, त्याचा वापरही मोठया प्रमाणात झाला आहे. या कालावधीमध्ये त्यांची अनेकवेळा दुरुस्ती करण्यात आलेली होती. दिवसेंदिवस या मशीनरीवरील दुरुस्तीचा खर्च वाढत असलेने त्या बंद ठेवण्यात आलेल्या आहेत.

मागील वर्षी साईभक्त श्री शैलेश पटेल, बंगलोर यांनी श्री साईप्रसादालयात साईभक्तांना प्रसाद भोजनात चपाती मिळणेकामी तासी ३ हजार क्षमतेचे व तासी १० हजार क्षमतेचे प्रत्येकी एक असे दोन चपाती मशिन देणगी स्वरुपात दिलेले आहे. या चपाती मशीन पासून सध्या चांगल्या पध्दतीने चपाती बनविण्यात येत असून, मशीन दिवसातून अंदाजे ५ ते ६ तास चालवून श्री साईभक्तांना चपाती पुरविण्यात येत आहेत. नवीन चपाती मशीन आलेमुळे जुने चपाती मशीन्सची आवश्यक नसल्याने, दिनांक–०९/०३/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निणर्यान्वये तसेच दिनांक- १४/०७/२०१७ रोजीचे शासन मान्यतेने दि.२१/०५/२०१८ रोजीचे जाहीर लिलावाने विक्री होणेस ठेवण्यात आलेल्या होत्या परंतु सदरच्या लिलावात सदरच्या ५ मशिन लॉट नं. ५ अन्वये टोकन नं. ८४ चे श्री हुसेन सय्यद शमा, कोपरगांव जाहीर लिलावात रुपये १,२५,०००/- मात्र अंतिम बोली झालेली आहे. सदरचे जुने चपाती मशिनची दिनांक- ३१/०३/२०१८ अखेर एकत्रित घसारा किमंत रु.१५,१४,७२४/- (अक्षरी रुपये- पंधरा लाख चौदा हजार सातशे चोवीस ) मात्र इतकी असल्याने सदर चपाती मशिनचा लिलाव स्थगित ठेवण्यात आला असुन, जा.नं.एसएस/वशी-अ.क./ ९९७ / २०१८ दि. ०७/०७/२०१८ अन्वये सदर किमंतीबाबत पुन्हा व्यवस्थापन समितीपुढे विषय निणयार्थ ठेवावा अशा सुचना मेकॅनिकल विभागाला करण्यात आलेल्या आहेत.

मागणी: जाहीर लिलावाव्दारे प्राप्त किमंतीनुसार चपाती मशिन द्यावे किवा त्याचा फेर जाहिर लिलावाव्दारे विक्री करावी याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत: पाचही चपाती मशीन्सचा वापरही मोठ्या प्रमाणात झालेला आहे. नवीन मशीन्स आल्याने जुन्या मशीनरींची आवश्यकता नाही, जाहीर लिलावात प्राप्त झालेली किमंत मशिनचे घसारा किमंतीपेक्षा फार कमी आहे तथापी, सदरच्या मशिन ठेवणेकरीता बंदिस्त जागा उपलब्ध नसल्याने त्या लवकरात लवकर विक्री करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव- श्री साई प्रसादालयाकडील जुन्या नादुरुस्त पाच चपाती मशीन्सची दि. २१/०५/२०१८ रोजी जाहीर लिलावाव्दारे आलेल्या बोली रु.१,२५,०००/- मात्रचे रक्कमेस विक्री करावी अथवा फेर जाहीर लिलावाव्दारे विक्री करावी याबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाकडील जुन्या नादुरुस्त पाच चपाती मशीन्सची दिनांक- ३१/०३/२०१८ अखेर एकत्रित घसारा किमंत रु.१५,१४,७२४/-मात्र इतकी आहे. त्या तुलनेत जाहीर लिलावाव्दारे आलेल्या बोलीची रक्कम रु.१,२५,०००/- मात्र ही घसारा किमंतीपेक्षा फार कमी आहे. विभागाने निश्चीत केलेली घसारा किंमत ही लेखाविभागाने लेखापध्दतीने निश्चित केलेली पुस्तकी किंमत आहे. त्याऐवजी मशिनची प्रत्यक्ष सद्य:स्थितीनुसार तांत्रिक दृष्टया घसारा किंमत निश्चित करावी व त्यानंतर फेर जाहीर लिलाव प्रक्रिया राबविण्यात यावी, असे ठरले.** **(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)**

---

**विषय नं.१४** **मेकॅनिकल विभागाकरीता लागणारी वार्षिक साहीत्य खरेदी कामी येणा-या खर्चास तसेच याकामी ई-निविदा बोलाविणेस मान्यता मिळणेबाबत..**

प्रस्ताव- **अधिनियम व तरतुद** :- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. (14) (भाग 4) मध्ये 14 (2घ) नुसार भक्तांना सोयीसाठी आवश्यक ते दुरूस्तीचे काम.

**प्रस्तावना:-** मेकॅनिकल विभागामार्फत संस्थानचे सर्व मशिनरी (गॅस प्लॅन्ट,आर.ओ.प्लॅन्ट, लॉन्डी युनिट, सोलर स्टीम कुकींग सिस्टम, स्टिम बॉयलर तसेच प्रसादालयातील सर्व प्रकारची मशिनरी एसटीपी प्लॅन्ट

मशीनरी) एसी यंत्रणा दुरुस्ती देखभाल तसेच विविध विभागांचे मागणीनुसार फॅब्रिकेशनची कामे केली जातात. याकरीता स्पेअरपार्ट तसेच हार्डवेअर मटेरीयलची आवश्यकता भासते. सध्या सर्व आवश्यक मटेरीयलचा स्टॉक संपुष्टात येत असल्याने नवीन खरेदी करणे आवश्यक आहे.

**मागणी:-** सर्व मशिनरी दुरुस्ती देखभालीकरीता तसेच फॅब्रिकेशन कामाकरीता सोबतचे यादीनुसार आवश्यक स्पेअरपार्ट व हार्डवेअर मटेरीयल खरेदी करावे लागणार आहे. याकरीता येणा-या अंदाजे अपेक्षित खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे

| Sr.No. | Discription | App. Amount Rs. |
|---|---|---|
| 1) | Machinery Spare part.. | 5,77,837/- |
| 2) | LPG. . Plant Spare part.. | 2,73,204/- |
| 3) | A.C. & Workshop Material.. | 40,41,485/- |
| | Total Amount Rs. | 48,92,526/- |

उपरोक्त प्रमाणे आवश्यक स्पेअरपार्ट व हार्डवेअर मटेरीयल खरेदीकामी अंदाजे रुपये- ४८,९२,५२६/- (अक्षरी रुपये-आठ्ठेचाळीस लाख, ब्यान्नव हजार, पाचशे, सहवीस ) खर्च अपेक्षित आहे.

**विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-** मशीनरी दुरुस्ती व देखभालचे दैंनदिन कामाकरीता नेहमी लागणारे स्पेअरपार्ट तसेच फॅब्रीकेश्न कामाकरीता लागणारे हार्डवेअर मटैरीयल वारंवार खरेदी करावे लागतात. त्यातील बरेचसे स्पेअरपार्ट वेळेवर उपलब्ध नसतात. त्यावेळी दैनंदिन कामकाजात अडचण निर्माण होते, त्यामुळे वार्षिक साहीत्य खरेदी करणे आवश्यक आहे. सदरची खरेदी ही खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करता येईल.

**प्रस्ताव :** १) मेकॅनिकल विभागाकरीता लागणारे वार्षीक साहीत्य खरेदी करणेस.

२) याकामी येणा-या रक्कम रुपये- ४८,९२,५२६/-( अक्षरी रुपये-आठ्ठेचाळीस लाख ब्यान्नव हजार पाचशे सहवीस) मात्र अपेक्षीत खर्चास तसेच

३) सदरची खरेदी कामी खरेदी विभागामार्फत महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in वेबसाईटवर तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा बोलाविणेस मान्येतेकरीता प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णायार्थ सादर.

**निर्णय क्र.४७४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मेकॅनिकल विभागाकरीता लागणारे वार्षिक साहीत्य खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.४८,९२,५२६/-मात्रचे अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)**

---

**विषय नं.१५** **श्री साई प्रसादालयामार्फत मनुष्यबळाव्दारे अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहीरात देणे व ई-निवीदा मागविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ) नूसार भक्तांना तसेच भक्तांच्या सोयीसाठी आवश्यकत ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१ घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७४४.

प्रस्तावना :- श्री साई प्रसादालयामार्फत सकाळी ६ ते १० या वेळेत भक्तांना अल्पोपहार म्हणून अन्नपाकीटे (५ पुरी, कडधान्य भाजी, बर्फी वडी ) ही उक्ती ठेकेदारी पध्दतीने आऊटसोर्सिंगव्दारे तयार करुन घेण्यात येत आहे. त्यानूसार श्री साई प्रसादालयामार्फत अन्नपाकीटे तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समिती दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७४४ (१०) नूसार, जा.एसएसएस/वशी/३२५९/२०१७ दि.१९/०९/२०१७ अन्वये, दि.यशोधरा महिला सह. औद्योगिक उत्पादक संस्था, नाशिक यांना दि.०१/१०/२०१७ ते ३०/०९/२०१८ अखेर एक वर्ष कालावधीकरीता प्रती पाकीटास मजूरी रु.२.६९ पैसे सर्व करांसह (जी.एस.टीसह) याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेला आहेत. या कामाची मुदत दि.३०/०९/२०१८ अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे पुढील एक वर्ष कालावधीसाठी अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेकामी मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागणार असून त्याकामी ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

मागणी:- प्रास्तविक नूसार अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) बनविणेच्या कामाचे कंत्राट दि.३०/०९/२०१८ अखेर संपुष्टात येत असल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयामार्फत भक्तांना अल्पोपहार (नाष्टापाकीटे) आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणे संस्थानचे दृष्टीने हितावह असल्याने वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्याकडून, केटरर्स/ ठेकेदारांकडून नव्याने ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानूसार अनुमान :- आर्थिक

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत :- श्री साई प्रसादालयामार्फत अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) तयार करणेच्या कामाची मुदत दिनांक ३०/०९/२०१८ अखेर संपुष्टात येत असल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयामार्फत अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) उक्त्या स्वरुपात आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणेकामी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन तसेच महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन नामांकित कंपन्याकडून, केटरर्स/ ठेकेदारांकडून नव्याने ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

सध्या ठेकेदारास देण्यात येत असलेल्या प्रती पाकीटास रु.२.६९ पैसे सर्व करांसह प्रमाणे मजूरी देण्यात येते. त्यानूसार माहे ऑक्टोबर-२०१७ ते माहे मे-२०१८ अखेर ८ महिन्याचे बिलांची रक्कम रु.६५,८८,५०२/- एवढी झालेली आहे. त्यानूसार अंदाजे वार्षिक मजुरीची रक्कम रु.९८,८२,७५३/- इतकी होते. सदर रकमेमध्ये अंदाजे २०% वाढ गृहीत धरल्यास पुढील एक वर्ष कालावधीसाठी (दि.०१/१०/२०१८ ते दि.३०/०९/२०१९) अंदाजे रक्कम रु.१,१८,५९,३०४/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी अठरा लाख एकोणसाठ हजार तीनशे चार मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, मान्यता मिळालेनंतर ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल.

तरी श्री साई प्रसादालयामार्फत अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) कंत्राटाची मुदत दि.३०/०९/२०१८ अखेर संपत असल्याने पुढील एक वर्ष कालावधीसाठी उक्त्या स्वरुपात आऊटसोर्सींग पध्दतीने अन्नपाकीटे तयार करणेकामी अंदाजे मजुरी रक्कम रु.१,१८,५९,३०४/- (अक्षरी रक्कम रुपये एक कोटी अठरा लाख एकोणसाठ हजार तीनशे चार मात्र ) मात्रचे खर्चास मंजूरी मिळणेकामी व मान्यतेतर वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन महाराष्ट्र शासनाचे www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१/१०/२०१८ ते दि.३०/०९/२०१९ या एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयामार्फत अन्नपाकीटे (नाष्टापाकीटे) उक्त्या स्वरुपात आऊटसोर्सींग पध्दतीने तयार करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१,१८,५९,३०४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,प्रसादालय विभाग)**

---

**विषय नं.१६** **जुन्या साईलिला आंतरराष्ट्रीय इंग्रजी द्वैमासिकाचे मुखपृष्ठाचे श्रींचे थ्री डी फोटोसाठी अॅक्रॅलिक फ्रेम बनवून फोटो तयार करणेबाबत..**

**प्रस्ताव-** अधिनियम तरतुद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम १७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे. "श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील" तसेच कलम १७(४) मध्ये "विश्वस्तव्यवस्थेने निहित केलेले पन्नास हजार रूपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणेतेही जडजवाहिर दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून विकण्यात येणार नाही. तारण म्हणून ठेवण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही," अशी तरतूद आहे.

प्रस्ताविकः- मा.व्यवस्थापन समिती दि.१९.०२.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.२३८ नुसार सन-२०१२ मध्ये विशेष बाब म्हणून परदेशातील साईभक्तांना श्री साईबाबांचे जीवन कार्याचा प्रचार-प्रसार व्हावा तसेच त्यांच्या अगाध लिला याविषयी माहीती व्हावी करिता " श्री साईलिला " हे आंतरराष्ट्रीय इंग्रजी द्वैमासिकाची एप्रिल-मे २०१२ मध्ये परदेशातील साईभक्तांना / मंदीरांना मोफत वाटप करणेसाठी छपाई करण्यात आली होती. संदर्भीय २ चे कार्यादेशाने मे.टॅको व्हिजन,मुंबई यांचेकडून प्रति अंक रू.१०८/- याप्रमाणे २०,००० नग छपाई करणेत आलेली आहे. त्यासाठी रू.२१,६०,०००/- ( अक्षरी रूपये एकवीस लाख साठ हजार मात्र) इतका खर्च झालेला आहे.

श्री साईबाबांची महती परदेशातील साईभक्तांना विदीत होणेकरिता मा.व्यवस्थापन समिती दि.२८.०४.२०१२ चे सभेतील निर्णय क्र.३९२ नुसार स्वागत अंक परदेशातील साईभक्तांना व जनसंपर्क

विभागामार्फत असे एकुण १५०० अंक वितरीत झाले आहेत. शिल्लक अंदाजे १८५०० नगासाठी रू.१९,९८,०००/- खर्च झालेला आहे. सदर खर्च रू.५०,०००/- पेक्षा जास्त आहे. अधिनियम कलम १७ (४) नुसार जडजवाहिर, दागिने व इतर जंगम मालमत्ता विक्री संदर्भात तरतूद आहे. परंतू पुस्तक/मासिके (consumable item) बाबत अधिनियमात तरतूद दिसून येत नाही. करिता शासनाची मान्यता घेण्याची आवश्यकता नाही, असे या विभागाचे मत आहे.

विभागाचा अभिप्राय व स्पष्ट मतः- सध्या प्रकाशने विभागाचे भांडारात १८५०० अंक पडून आहेत. सदर अंकावरील श्रीडी (मुखपृष्ठाचे) फोटो फ्रेम तयार करून घेतल्यास सदरचे फोटो सध्या शताब्दी वर्ष असलेने श्रींच्या पादुका बाहेरगांवी भक्तांचे दर्शनास्तव गेल्यास सदर ठिकाणी मान्यवरांचा सत्कार प्रसंगी, शिर्डीत येणारे सन्माननिय अतिथी यांचे सत्कार प्रसंगी, इतर मान्यवर कलाकार यांचे श्रींचे दर्शनवेळी शिरडीत सत्कार समयी वापरता येतील. असे निर्देश वरिष्ठांनी दिलेले असलेने, त्यास अनुसरून एका मुखपृष्ठ फोटोस फ्रेममध्ये नमुना दाखल तयार करून मा.वरिष्ठांना दाखविली असता, पुढील कार्यवाही करणेबाबत निर्देश प्राप्त झाले आहेत.

त्यानुसार निर्देशाप्रमाणे वरील प्रकारे ॲक्रॅलिक फ्रेम तयार करून (१०" x ११.५" साईज) घेणे, तसेच त्यासाठी मजूरी व पॅकींगसाठी अंदाजे रू.७०/- एका फ्रेमसाठी खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार एकुण १८५०० नग फोटोफ्रेम तयार करणेसाठी अंदाजे एकुण रू.१२,९५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्ताव -** उपरोक्त प्रस्तावित केलेप्रमाणे जुन्या आंतरराष्ट्रीय साईलिला अंकाचे मुखपृष्ठावरून श्रीडी फोटोसाठी ॲक्रॅलिक फ्रेम बसविणे, मजूरी व पॅकींग खर्च तसेच सत्कारप्रसंगी भेट म्हणून देणे, या बाबींवर खालीलप्रमाणे निर्णय होणे आवश्यक आहे.

**अ)** प्रस्तावित केलेप्रमाणे श्रीडी फोटोसाठी फ्रेम व मजूरी , पॅकींग करिता एका फ्रेमसाठी अदाजे रू.७०/- मात्र खर्च गृहीत धरून एकूण १८५०० नगासाठी रू.१२,९५,०००/- खर्च अपेक्षित आहे, त्यास मान्यता असावी

**ब**) फोटो फ्रेम तयार करणे, मजूरी व पॅकींग करणेसाठी ई-निविदा प्रक्रीय राबविणे व जनसंपर्क विभागामार्फत अ.नगर, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, पुणे या शहरांतील वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिध्द करणे.

**क**) वरील श्रीडी फोटोंचा शताब्दी वर्षात श्रींच्या पादूका बाहेरगावी भक्तांचे दर्शनास्तव गेल्यास तेथील मान्यवरांचा सत्कार व शिर्डीत येणारे सन्माननीय अतिथी, मान्यवर कलाकार, तसेच संस्थान प्रशासनात वरिष्ठ पातळीवर कार्यरत शासकीय अधिकारी यांचेकडे प्रशासकीय स्तरावरील कामकाजनिमित्त भेट देणारे शासकीय अधिकारी व मान्यवर यांचे श्रींचे दर्शनवेळी सत्कारसमयी भेट देता येतील, त्यास मान्यता असावी.

**ड**) श्रींचे फोटो व्यतिरिक्त अंकातील उर्वरीत पाने फाडून रद्दी म्हणून अभिलेख कक्ष विभागामार्फत विक्री करणेस मान्यता असावी.

उपरोक्त **' अ ','ब ', 'क' व ड** मागणीप्रमाणे प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे चर्चा होऊन मान्यतेसाठी सादर.

निर्णय क्र.४७६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, जुन्या साईलिला आंतरराष्ट्रीय इंग्रजी द्वैमासिकाचे मुखपृष्ठाचे श्रींचे श्री डी फोटोसाठी ॲक्रॅलिक फ्रेम बनवून फोटो तयार करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी एका फ्रेमसाठी अंदाजे रू.७०/- मात्र खर्च गृहीत धरून एकूण १८५०० नगासाठी रक्कम रू.१२,९५,०००/- मात्र अपेक्षित खर्चास तसेच श्रींचे फोटो व्यतिरिक्त अंकातील उर्वरीत पाने फाडून रद्दी म्हणून अभिलेख कक्ष विभागामार्फत विक्री करणेस मान्यता देण्यात आली.**

**सदर श्रीडी फोटोंचा शताब्दी वर्षात श्रींच्या पादूका बाहेरगावी भक्तांचे दर्शनास्तव गेल्यास तेथील मान्यवरांचा सत्कार व शिर्डीत येणारे सन्माननीय अतिथी, मान्यवर कलाकार, संस्थान प्रशासनात वरिष्ठ पातळीवर कार्यरत शासकीय अधिकारी यांचेकडे प्रशासकीय स्तरावरील कामकाजनिमित्त भेट देणारे शासकीय अधिकारी व मान्यवर यांचे श्रींचे दर्शनवेळी सत्कारसमयी भेट स्वरुपात देण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)**

---

विषय नं.१७ **आर्थिक वर्ष सन २००९-१० चे रु.२२.८३ कोटी देय व्हॅटकर तीन दिवसांचे आत आदा करणेबाबत विक्रीकर अधिकारी, अहमदनगर यांची नोटीस अवलोकनार्थ सादर.**

**प्रसताव** विक्रीकर अधिकारी, अहमदनगर यांनी सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे मुल्यवर्धीत कर निर्धारण करुन दि.३१.०३.२०१८ रोजी रु.२४.२६ कोटी व्हॅटकर देय असलेबाबत आदेश केला आहे. बाबत सद्यस्थिती– सदर प्रस्ताव मा.व्य.स. सभेपुढे अवलोकनार्थ सादर करण्यात आला होती, निर्णय क्र.२५०/दि.०४.०४.२०१८

अन्वये सदर आदेशाचे अवलोकन करण्यात येऊन आवश्यक कायदेशिर कार्यवाही पुर्ण करण्यासाठी सध्याचे वकीलांव्यतिरिक्त इतर वकील व सनदी लेखापाल यांची कायदेतज्ञ समिती सदस्य मा.ॲड.मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली नियुक्ती करणे बाबत निर्णय संमत झाला होता. त्यास अनुसरुन :-

१. दि.२८.०५.२०१८ रोजी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे मे.जुन्नरकर ॲन्ड असोशिएटस, मुंबई यांचेमार्फत रिट अर्ज दाखल करण्यात आला आहे. त्याची सुनावणी दि.०७.०६.२०१८ रोजी नियोजित होती. तथापी सुनावणी झालेली नाही.

२. आदेशाचे तारखेपासुन ६० दिवसांचे आत देय कराच्या १०% रक्कम भरुन अपिल अर्ज दाखल करावा लागतो. बाब ट्रॅब्युनलमध्ये न्यायप्रविष्ठ असल्याने स्थगिती आदेश मिळणेकरीता सदर प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाचे स्थरावर न्यायप्रविष्ठ आहे.

३. मुल्यवर्धीत कर आदेशापोटी व्हॅट टीडीएस वजावट करुन सरकारी कोषागरात भरण्यात आला आहे. तथापी त्यावरही देयकर रु.९९ लाख व्हॅटकर देय नमुद केला होता. या आदेशात सुधारणा करण्याकरीता दि. २८.०५.२०१८ रोजी फॅार्म नं. ३०७ दाखल करण्यात आला होता.

४. दि.०३.०७.२०१८ रोजी विक्रीकर अधिकारी यांनी रु.२२.८३ कोटी व्हॅटकर देय असले बाबत सुधारीत व्हॅटकर आदेश केला असुन तो संस्थानला दि.०५.०७.२०१८ रोजी प्राप्त झाला आहे. आदेश प्राप्त झालेपासुन ३० दिवसांचे आत रक्कम भरणेबाबत नमुद केले आहे. अन्यथा विक्रीकर विभागाकडुन व्हॅटकर वसुली बाबत कार्यवाही होण्याची शक्यता आहे.

५. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या रिट अर्जावर अद्याप सुनावणी होत नाही, मा. विश्वस्त श्री जयकर साहेब यांचे समन्वयाने कामकाज चालु आहे. बाबत मा. उच्च न्यायालय औरंगाबाद येथे रिट दाखल करणे विचाराधीन आहे.

६. व्हॅट कर लागू होणेबाबत प्रस्ताव विक्रीकर प्राधिकरण - ट्रॅब्युनल येथे सुनावणी न्यायप्रविष्ट आहे. त्याची तारीख दि.११ व १२.०७.२०१८ रोजी नियोजित होती. सुनावणीकरीता व्हॅट ट्रॅब्युनल कोर्ट, मुंबई येथे संस्थान ॲड.पी.सी. जोशी, कर सल्लागार श्री.शशीकांत कुलकर्णी, मा.विश्वस्त श्री.जयकर व संस्थान प्रतिनिधी हजर होते. तथापि, अतिवृष्टी आपत्तीमुळे सुनावणी झाली नाही. पुढील सुनावणीची तारीख दि.२५ व २६.०७.२०१८ मिळाली आहे.

७. आज दि.१२.०७.२०१८ रोजी विक्रीकर विभाग, अहमदनगर यांचेकडून दि.११.०७.२०१८ रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे. त्यामध्ये त्यांनी सुधारीत आदेशामध्ये नमूद केलेली रु.२२,८३,३८,७४५/- रक्कम सदर नोटीस प्राप्त झालेपासून ३ दिवसांचे आत जमा करणेबाबत कळविले आहे. अन्यथा व्हॅट कर कायद्यातील तरतुदीनुसार बाबत कोणतीही सुचना न देता वसुलीची कार्यवाही केली जाईल, असे नमूद केले आहे.

अशाप्रकारे दि.०३.०७.२०१८ रोजीच्या सुधारीत व्हॅट कर निर्धारण आदेशामध्ये अट क्र.२ मध्ये सदर आदेश प्राप्त झालेपासून ३० दिवसांचे आत व्हॅट कर भरणेबाबत मुदत दिली होती. दुरुस्ती व्हॅट कर आदेशात व्हॅट कर रक्कम वाढली नाही तर व्हॅट कर निर्धारण आदेशात कर भरण्याची दिलेली मुदत वाढत नसते. त्यानुसार अंतिम तारीख दि.३१.०५.२०१८ अशी होते. तथापि, दुरुस्ती कर निर्धारण आदेश दि.०५.०७.२०१८ रोजी प्राप्त झाला आहे. आज दि.१२.०७.२०१८ रोजी प्राप्त झालेल्या पत्रामध्ये सदर पत्र मिळालेपासून ३ दिवसांचे आत रु.२२,८३,३८,७४५/- व्हॅट कर भरणेबाबत अन्यथा बाबत कोणतीही सुचना न देता वसुलीची कार्यवाही केली जाईल, असे नमूद केले आहे. सदर पत्राची प्रत मा.विश्वस्त श्री.जयकर, संस्थान ॲड.श्री.पी.सी. जोशी, संस्थान कर सल्लागार श्री.शशीकांत कुलकर्णी यांना ई-मेलद्वारे पाठविली आहे. अशा परिस्थितीमध्ये व्हॅट कर भरणे स्थगिती आदेश सादर करणे गरजेचे आहे. व्हॅट कर कायद्यातील तरतुदीनुसार फॉर्म नं.३१० नुसार देय व्हॅट कराच्या १० टक्के रक्कम रु.२,२८,३३,७७५/- सरकारी कोषागारात भरुन अपिलमध्ये जाता येईल, तथापि, सध्या सदर बाब ट्रॅब्युनल कोर्टात न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे सदर व्हॅट कर रक्कम भरण्याकरीता स्थगिती आदेश मिळणेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट अर्ज मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे दाखल करुन स्थगिती आदेश तात्काळ मिळणेबाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

प्रस्ताव:- तरी आर्थिक वर्ष सन २००९-१० चे रु.२२.८३ कोटी देय व्हॅट कराबाबत सद्यस्थिती अवलोकनार्थ व पुढील योग्य त्या मार्गदर्शनासाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.४७७ यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष सन २००९-१० चे रु.२२.८३ कोटी देय व्हॅटकर तीन दिवसांचे आत आदा करणेबाबत विक्रीकर अधिकारी, अहमदनगर यांची नोटीस बाबत सद्यस्थितीचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

यावेळी विक्रीकर प्राधिकरण यांचेसमोर दि.२६ जुलै,२०१८ रोजी अंतिम सुनावणी झाली असून लवकरच निर्णय मिळण्याची शक्यता आहे, असे समिती सदस्य मा.ॲड मोहन जयकर यांनी यावेळी नमुद केले. तसेच मा.उच्च न्यायालय,औरंगाबाद येथे याचिका दाखल करण्याची कार्यवाही देखील सुरु असल्याचे त्यांनी नमुद केले. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.१८ मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा) लिमिटेड, नाशिक यांनी संस्थानचे मनुष्यबळ व्यवस्थापनाबाबत (Manpower Energy Audit) सादर केलेल्या परिक्षण अहवालाबाबत....**

प्रस्ताव- (अ) सन २०१६ मध्ये संस्थानचे ३९ विभागांमध्ये काम करत असलेल्या कायम, कंत्राटी व आऊटसोर्स कर्मचा-यांचे दैनंदिन कामाचे व त्यांच्या कार्यक्षमतेचे मनुष्यबळ व्यवस्थापन सल्लागार संस्थेमार्फत (Human Resource Management Consultant) परिक्षण करणेकामी संस्थानचे संकेतस्थळासह महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये प्रसिध्द होणा-या वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन त्यानुसार प्राप्त झालेल्या सिलंबद व्यावसायिक प्रस्तावांमधील निम्नतम दरधारक मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांची मा.त्रिसदस्य समितीचे दि.१४/०६/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३६५ अन्वये जा.नं. एसएसएस /साप्रशा-आस्था/१८२३/२०१६ दि.१४ जुलै,२०१६ रोजीचा कार्यादेशाव्दारे रु.९,५१,०००/- (अक्षरी रुपये नऊ लाख एक्कावन्न हजार) मात्रचे दरावर (सर्व करासह) नेमणूक करणेत आलेली होती. याकामी त्यांना कार्यादेशातील अटी-शर्तीनुसार प्रत्यक्ष कामास सुरुवात केलेनंतर रु.३,००,०००/- व अहवाल सादर केलेनंतर त्यांचे दि.२०/१०/२०१६ रोजीचे लेखी मागणीनुसार व तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांचे तोंडी सुचनेनुसार आस्थापना विभागाच्या दि.०२/११/२०१६ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये रु.४,००,०००/- असे एकूण रु.७,००,०००/- (अक्षरी रुपये सात लाख मात्र) ॲडव्हॉन्स म्हणून अदा करणेत आलेले आहेत. त्यानंतर त्यांना अद्यापपर्यंत उर्वरित रक्कम अदा करणेत आलेली नाही.

(ब) मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांनी वरील नेमणूक आदेशानुसार मनुष्यबळ व्यवस्थापन (Manpower Energy Audit) करुन केलेल्या कामाच्या अहवालाच्या प्रती त्यांचेमार्फत दि.२०/१०/२०१६ रोजीचे पत्रान्वये मा.अध्यक्ष महोदय, मा.उपाध्यक्ष महोदय व मा.कार्यकारी अधिकारी यांचेकडेस सादर केलेल्या आहेत. तसेच सदर अहवालाच्या छायांकित प्रती इकडील विभागामार्फत सर्व समिती सदस्यांना माहितीसाठी उपलब्ध करुन देणेत आलेल्या आहेत.

त्यास अनुसरुन मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांनी सादर केलेल्या अहवालाबाबत दि.२४ नोव्हेंबर, २०१६ रोजी मा.अध्यक्ष महोदयांनी पुढील मुद्यांबाबत सविस्तर अहवाल मागविणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.

१. अहवालात सादर केलेल्या प्रत्येक विषय / मुद्यांसदर्भात स्तंभ आलेख (Bar Chart)
२. अहवालात सादर केलल्या प्रत्येक कर्मचा-यांच्या वैयक्तिक कामाचा सविस्तर अहवाल (Job Chart).

उपरोक्त निर्देशानुसार कार्यवाही करणेसाठी मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांना दि.२७/१२/२०१६ रोजी पत्र देण्यात आले. त्यानुसार त्यांनी दि.३१/१२/२०१६ रोजी ई-मेलव्दारे स्तंभ आलेख सादर केलेले आहेत. तथापी, मुद्दा क्र.०२ ची माहिती सादर केलेली नाही. याबाबत मे.वैभव प्लेसमेंट्स यांना वेळोवेळी पत्राने तसेच दुरध्वनीव्दारे कळविणेत आलेले आहे. तथापी, त्यांनी अहवालात सादर केलेल्या प्रत्येक कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाचा सविस्तर अहवाल (Job Chart) सादर न केल्यामुळे त्यांना दि.०६/०२/२०१८ रोजी अंतीम पत्र देणेत आलेले होते.

मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांनी सादर केलेल्या गोषवा-याचे अवलोकन केल्यानंतर कॅन्टिन विभाग, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद निवासस्थान, वाहन विभाग, आरोग्य विभाग, प्रसादालय विभाग, सी.सी.टि.व्ही, साईनाथ रुग्णालय व साईबाबा हॉस्पीटल इ. विभागांची मंजूर आकृतीबंधाची संख्या, सध्या कार्यरत कर्मचारी संख्या आणि परिक्षणानंतर कमी करावयाच्या किंवा अतिरिक्त उपलब्ध करुन द्यावयाच्या कर्मचारी संख्येमध्ये मोठा विरोधाभास / तफावत आहे किंवा त्या संख्या न पटणा-या आहेत. त्याबाबत वैभव प्लेसमेंट यांनी कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. तसेच अहवालामध्ये सादर केलेल्या सध्याचे कार्यरत

कर्मचा-यांचा वर्कलोड पुर्णवेळ आहे काय ? याबाबतही स्पष्टीकरण दिलेले नाही. वैभव प्लेसमेंट्स यांनी सादर केलेला अहवाल एकूण १८० पानांचा असून त्यामध्ये अंदाजे ३० ते ४० पाने परिक्षणाचे मूळ विषयाशी संबधीत आहेत. सादर केलेल्या अहवालामध्ये एखाद्या विभागात एखाद्या पदनामाच्या कर्मचा-यांची आवश्यकता अतिरिक्त का आहे? किंवा एखाद्या पदनामाच्या कर्मचारी कमी का करावयाचे आहेत ? याबाबत परिक्षणावेळी निर्दशनास आलेल्या विविध मुद्द्यांच्या तपशिलासह, पुराव्यासह व कारणासह विस्तृत स्वरुपात अहवाल सादर केलाला नाही.

वैभव प्लेसमेंट्स यांचेकडे परिक्षण अहवालामध्ये सादर केलेल्या प्रत्येक कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाचा सविस्तर माहिती (Job Chart) वेळोवेळी दुरध्वनीव्दारे तसेच चार वेळेस लेखी पत्राव्दारे मागितलेली आहे. तथापी, त्यांनी अद्यापपर्यंत कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाचे जॉब चार्ट सादर केलेले नाहीत. याचाच अर्थ परिक्षण अहवालामध्ये सादर केलेल्या कर्मचा-यांची विभागनिहाय बदल करावयाची कमी व अधिक संख्या परिक्षणाच्या प्राथमिक अंदाजानुसार ढोबळमनाने सादर करण्यात आलेल्या आहेत अशी इकडील धारणा असून, हि वस्तूस्थिती वैभव प्लेसमेंट्स यांना दि.०६/०२/२०१८ रोजीचे अंतीम पत्रामध्ये कळविणेत आलेली आहे.

क) संस्थानचे अंतीम पत्रानंतर मे.वैभव प्लेसमेंट्स, नाशिक यांनी दि.१९/०२/२०१८ रोजीचे पत्र सादर केलेले असून त्यामध्ये संस्थानने मागणी केलेल्या माहितीचा समावेश नाही. संस्थानने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने मे.वैभव प्लेसमेंट्स, नाशिक यांनी दि.१९/०२/२०१८ रोजीचे पत्रात खालील प्रमाणे स्पष्टीकरण दिलेले आहे.

१. काही विभागांमधील आम्ही सुचविलेले कर्मचारी पद, संख्या आपणांस पटत नाहीत असे आपण म्हटले आहे. आम्ही आमच्या परिक्षण काळात निरिक्षिकाच्या भुमिकेतून निरिक्षणे करुन, तपासून, अभ्यास करुन, विश्लेषण करुन आमचे मत नोंदविले आहे. त्यासाठी, परिक्षण काळात आपल्या येथे असलेले कामकाज, त्याची व्याप्ती, कर्मचा-यांनी दिलेली लेखी आणि तोंडी माहिती, या सर्वांचा अभ्यास करुन आम्ही सदर मत मांडलेले आहे.

२. सदर अहवाल आम्ही आमच्या चमुमधील विविध क्षेत्रांमधील तज्ञ आणि अनुभवी सल्लगारांच्या मताने तयार केलेला असून तो सविस्तर, विस्तृत, परिपूर्ण, विषयाशी संबधीत तसेच जसा असायला हवा तसाच आहे, अशी आमची खात्री आहे व त्यास विश्वस्त मंडळाच्या बैठकीत तो तसा स्विकारला गेला व त्याबद्दल आमचे अभिनंदन केले या घटनेमुळे पुष्टी मिळते असे आमचे मत आहे.

३. अहवालामध्ये आम्ही आपणांस मनुष्यबळ विभाग स्थापन करुन मनुष्यबळ व्यवस्थापन क्षेत्राशी संबधीत अनुभवी आणि जाणकार अधिकारी नेमून एक स्वतंत्र विभाग त्वरीत कार्यान्वित करावा आणि त्यानुसार संस्थानाचे मनुष्यबळ विभागाचे कामकाज करण्यात यावे असे मत मांडलेले होते. सदर मनुष्यबळ व्यवस्थापन विभाग संस्थानामध्ये कोणत्या विभागात किती कर्मचारी असावेत, कोणती पदे असावीत, त्यांची संख्या किती असावी तसेच कर्मचारी भरती, बडतर्फी, पदोन्नती, पदावनती इत्यादी संबधीत बाबी तंत्रशुध्द आधाराने, कुशलतेने, नियमांना धरुन, त्याचप्रमाणे आमच्या अहवालातील विविध सुचना आणि मतांचा यथायोग्य वापर करुन संस्थानला प्रगतीपथावर नेईल असे आमचे मत आहे. या मताचा आपण गांभीर्याने विचार करावा असे वाटते.

४. संस्थानामधील कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाची तपशिलवार माहिती, कामाच्या पध्दती, इत्यादीबाबी या संस्थानाच्या अंतर्गत कामकाजाचा विशेष करुन मनुष्यबळ व्यस्थापन विभागचा भाग आणि कार्ये आहेत. आमच्या परिक्षण कामाची व्याप्ती मनुषबळ व्यवस्थापन कामाकजाचे परिक्षण करुन त्यांसंदर्भात अहवाल देणे इतपत मर्यादित होती.

१. आम्ही सादर केलेल्या अहवालासंबधी कोणाची काय मत अथवा धारणा असावी याबद्दल आमचे काहीही मत नाही, कारण अशा प्रकारच्या अहवालांच्या बाबतीत सर्वच मुद्यांशी / परिक्षणांशी सर्वच जण सहमत होतील असे नाही, ही सार्वत्रिक परिस्थिती आहे. या आमच्या मताशी आपण सहमत व्हाल असे वाटते.

**ड)** मे.वैभव फ्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांना संस्थानचे विविध विभागात बदल करावयाच्या कर्मचारी संख्यमध्ये कशाच्या आधारे बदल करावयाचा याबाबतचे स्पष्टीकरण शेवटपर्यंत देता आलेले नाही. त्यांनी पत्रात नमूद केलेप्रमाणे सदरचे अहवालास जर मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष व तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी शाबासकी देऊन विश्वस्त मंडळाचे बैठकीमध्ये सदर अहवाल पूर्णपणे स्विकारीत असल्याची सहमती दिलेली असती, तर याबाबतची नोंद मा.व्यवस्थापन समिती बैठकीचे इतिवृत्तामध्ये अथवा निर्णयामध्ये येणे आवश्यक होते किंवा याबाबत मा.वरिष्ठांकडून काही निर्देश प्राप्त होणे आवश्यक होते. तथापी, असे न होता याऊलट मा.अध्यक्ष महोदयांकडून अहवाल सादर केलेनंतर लगेचच दि.२४ नोव्हेंबर, २०१६ रोजी काही मुद्यांबाबत

सविस्तर माहिती मागविण्याच्या सुचना प्राप्त झाल्यानुसार मे.वैभव प्लेसमेंट्स यांना वेळोवेळी पत्र देऊन तसेच दूरध्वनीद्वारे केलेल्या अहवालानुसार प्रत्येक कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाची सविस्तर माहिती (Job Chart) सादर करणेबाबत कळविणेत आलेले आहे. सबब, मे.वैभव प्लेसमेंट्स यांनी अद्याप कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाचे जॉब चार्ट सादर केलेले नाहीत व करु शकलेले नाहीत.

याउलट त्यांनी पत्राच्या अं.क्र.०३ मध्ये पुढील बाबी नमूद केल्या आहेत 'अहवालामध्ये आम्ही आपणांस एक स्वतंत्र मनुष्यबळ विभाग त्वरीत कार्यान्वित करुन तेथे अनुभवी आणि जाणकार अधिकारी नेमून संस्थानचे मनुष्यबळ विभागाचे कामकाज करण्यात यावे असे मत मांडलेले होते. सदर मनुष्यबळ व्यवस्थापन विभाग संस्थानामध्ये कोणत्या विभागात किती कर्मचारी असावेत, कोणती पदे असावीत, त्यांची संख्या किती असावेत हे आमच्या अहवालातील विविध सुचनाच्या आधारे योग्य रितीने ठरवतील' असा सल्ला देणेस त्यांना संकोच वाटलेला नाही. तसेच अं.क्र.०४ मध्ये 'संस्थानामधील कर्मचा-यांच्या दैनंदिन कामाची तपशिलवार माहिती, कामाच्या पध्दती, इत्यादीबाबी या संस्थानाच्या अंतर्गत कामकाजाचा विशेष करुन मनुष्यबळ व्यवस्थापन विभागाचा भाग आणि कार्ये आहेत. आमच्या परिक्षण कामाची व्याप्ती मनुष्यबळ व्यवस्थापन कामाकाजाचे परिक्षण करुन त्यांसंदर्भात अहवाल देणे इतपत मर्यादित होती.' असे बेजवाबदारपणाने म्हटले आहे .

याचाच अर्थ परिक्षण अहवालामध्ये सादर केलेल्या कर्मचा-यांची विभागनिहाय बदल करावयाची कमी व अधिक संख्या परिक्षणाच्या प्राथमिक अंदाजानुसार ढोबळमनाने / अंदाजे सादर करण्यात आलेल्या आहेत हे सिध्द होते. सबब मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांनी सादर केलेला परिक्षण अहवालानुसार संस्थान कर्मचारी विषयक धोरणाबाबत बदल करणे संस्थानचे हितावह ठरणार नसून तो स्विकारणेत येवू नये असे मत आहे. तसेच मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.),लि.नाशिक यांना विषयांकित कामापोटी जी रक्कम रु.७,००,०००/- (अक्षरी रुपये सात लाख मात्र) अगाऊ आदा करणेत आलेली आहे, ती रक्कम त्यांनी आजपावेतो केलेल्या कामकाजाचा मोबदला म्हणून विषयांकित कामापोटी अंतिम करुन जमा नावे करणेत यावे, असे मत आहे.

याबाबत सविस्तर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०४/२०१८ रोजीचे सभेपुढे निर्णयास्तव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.२५८ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

" यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. वैभव प्लेसमेंट्स (प्रा.) लिमिटेड, नाशिक यांनी संस्थानचे मनुष्यबळ व्यवस्थापनाबाबत (Manpower Energy Audit) सादर केलेल्या परिक्षण अहवालाबाबत विषयात नमूद मुद्यांच्या अनुषंगाने तपशीलवार माहिती मागवावी. तसेच त्यांनाही सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत यावे, असे ठरले."

उपरोक्त निर्णयानुसार मे. वैभव प्लेसमेंट्स (प्रा.) लिमिटेड, नाशिक यांना इकडील जा.नं.५५७/२०१८ दि.१ मे, २०१८ अन्वये पत्र देऊन त्यांनी मनुष्यबळ व्यवस्थापन (Manpower Energy Audit) परिक्षण अहवालात नमूद केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने तपशीलवार माहिती सादर करणेबाबत तसेच त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे चर्चेसाठी समक्ष उपस्थीत राहणेबाबत कळविणेत आले आहे. त्यास अनुसरुन मे.वैभव प्लेसमेंट्स, नाशिक यांनी दि. ४ मे, २०१८ रोजी संस्थानला पत्र दिले असून, पत्रासोबत संस्थानने मागणी केलेप्रमाणे कुठलीही माहीती सादर न करता यापुर्वी संस्थानला सादर केलेल्या दि.१३/०२/२०१८ रोजीचे पत्राची झेरॉक्स प्रत जोडून त्यानुसार पाठविणेत आलेला अहवाल अंतिम असल्याचे कळविले आहे. तसेच सदरहू पत्रात मे. वैभव प्लेसमेंट्स (प्रा.) लिमिटेड, नाशिक यांनी मी दि.१० जुन, २०१८ पर्यंत परदेश दौ-यावर असून, दि.१० जुन, २०१८ नंतर आपण कळवाल त्याप्रमाणे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सदरहू अहवालासंदर्भात चर्चेसाठी उपस्थीत राहील, असे कळविले आहे.

त्यानुसार मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.) लि. नाशिक यांनी संस्थानचे मनुष्यबळ व्यवस्थापनासंबधी सादर केलेल्या अहवालाबाबत चर्चेसाठी त्यांना आजचे सभेपुढे उपस्थीत राहणेबाबत दूरध्वनीद्वारे कळविणेत आले आहे.

तरी मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा.) लि. नाशिक यांनी संस्थानचे मनुष्यबळ व्यवस्थापनासंबधी सादर केलेल्या अहवालाबाबत त्यांचेशी समक्ष चर्चा होऊन निर्णय होणेस...

किंवा

उपरोक्त परिशिष्ट (ड) मध्ये अधोरेखीत केलेप्रमाणे कार्यवाही करणेस अथवा इतर अनुषंगिक यथोचित कार्यवाही करणेबाबत प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४७८ यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा) लिमिटेड, नाशिक यांनी संस्थानचे मनुष्यबळ व्यवस्थापनाबाबत (Manpower Energy Audit) सादर केलेल्या परिक्षण अहवालाबाबत चर्चा करणेसाठी मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा) लिमिटेड, नाशिक याचे प्रतिनिधी श्री. व्यवहारे आजचे व्यवस्थापन समिती सभेपुढे उपस्थित होते. यावेळी त्यांनी सदर कामाचे भाग-१ व भाग-२ असे दोन भाग होते, भाग-१चा कार्यादेश मिळाला असुन त्या प्रमाणे अहवाल सादर करण्यात आला असुन तो संस्थानने मान्य केल्यानंतर व संस्थानने कार्यादेश दिल्यास भाग-२ चे काम सुरु केले जाईल. भाग-२ साठी मानधन निश्चीत करण्यात आलेले नाही. असे नमुद केले.

तथापी संस्थानने दिलेल्या दि.१४.०७.२०१६ चे कार्यादेशाप्रमाणे मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा) लिमिटेड, नाशिक यांना भाग-१ व भाग-२ असे दोन्ही भागाचे काम देण्यात आले असुन त्यांचे एकत्रित मानधन रक्कम रु.९,५१,०००/- मात्र निश्चीत करण्यात आले आहे.

भाग १ मध्ये- मनुष्यबळ संरचना, कामाची मांडणी, व्याख्या आणि विभागणी,कौशल्य तक्ता, मनुष्यबळ संख्या, मनुष्यबळ परिक्षणाबाबत अहवाल सादर करणे.

भाग २ मध्ये- भाग १ वर आधारीत सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार मनुष्यबळ संरचना करणे, कामाची विभागणी व त्यानुसार अंमलबजावणी करणे याबाबत उपाययोजना सुचविणे, संस्थाकडून अपेक्षीत असलेली मदत, सल्लागार संस्थेचे शुल्क/मानधन, इतर आवश्यक सर्व साधारण बाबी.

याकामांचा समावेश होता.

तसेच भाग-१ व भाग-२ प्रमाणे त्यांनी कार्यवाही करुन अहवाल सादर करावयाचा आहे. भाग-२ साठी स्वतंत्रपणे कळविण्याची आवश्यकता नाही, असे मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी नमुद केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.वैभव प्लेसमेंट्स (प्रा) लिमिटेड, नाशिक यांनी त्यांचेकडील सर्व कागदपत्रांसह प्रशासनाशी संपर्क करावा, असे ठरले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन विभाग)

---

विषय १९ शासन पत्राचे अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे श्री साईबाबा अध्यासन सुरु करणेबाबतचे मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय निरस्त करणेबाबत...

प्रस्ताव- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पुर्वीचे पुणे विद्यापीठ) येथे श्री साईबाबा अध्यासन सुरु करणेकामी मात्र यापुर्वी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयामार्फत उपरोक्त विषयाबाबत कार्यवाही झालेली आहे, त्याचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे -

१. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०८.२००५ चे सभेतील निर्णय क्र.४६८ अन्वये पुणे विद्यापीठात संत श्री ज्ञानेश्वर महाराज, संत श्री नामदेव महाराज यांचे अध्यासन आहे, त्याचप्रमाणे श्री साईबाबांचे अध्यासन सुरु करणेबाबत पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मा.श्री.अशोक कोळस्कर यांची मा.अध्यक्ष साहेब आणि मा.उपाध्यक्ष साहेब यांनी समक्ष भेट घेऊन चर्चा करावी असे ठरले होते.

२. त्यानुसार पुणे विद्यापीठाचे तत्कालिन कुलगुरु मा.डॉ.अशोक कोळस्कर यांनी दि.२९.०९.२००५ रोजी शिर्डी येथे भेट देऊन, समक्ष चर्चा करुन प्रस्ताव सादर केलेला आहे.

३. सदर प्रस्तावामध्ये पुणे विद्यापीठात श्री साईबाबांचे अध्यासन सुरु करण्याची कार्यवाही करण्यासाठी दोन प्रकारे अनुदान रुपाने निधीची तरतुद करता येईल असे सुचविले होते. पैकी (अ) संस्थानकडून एक रकमी एकदाच एक कोटी रुपये

४. विद्यापीठाला अनुदान देऊन, त्यावरील व्याजावर श्री साईबाबा अध्यासनाचे कार्य चालविता येईल. (या पद्धतीने मौलिक हक्क अध्यासन (Intellectual Property Rights Chair) पुणे विद्यापीठात स्थापन करण्यात आलेली आहे. यासाठी पुणे विद्यापीठाला एकरकमी दहा लक्ष रुपये Council of Scientific and Industrial Research यांनी दिलेले आहेत.) किंवा (ब) श्री साईबाबा अध्यासनाचे कार्य सुरु करण्यासाठी सुरुवातील पहिल्यावर्षी १० लक्ष रुपये अनुदान रुपाने संस्थानकडून पुणे विद्यापीठाला देण्यात यावे आणि पुढील पाच वर्षे प्रतिवर्षी १० लक्ष रुपये प्रमाणे अनुदान देण्यात यावे असे एकुण ६० लक्ष रुपये या कामासाठी उपलब्ध होतील. या रकमेवरील व्याज आणि सुरुवातीच्या अनुदानापैकी काही रक्कम श्री साईबाबा अध्यासनाचे कार्यासाठी वापरण्यात येईल नंतर फक्त व्याजावर श्री साईबाबा अध्यासनाचे कार्य चालेल. असे कळविलेले होते.

५. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.१०.२००५ चे सभेतील निर्णय क्र.६३५ अन्वये उपरोक्त पैकी (ब) पर्याय स्विकारण्यात आला.

६. तसेच उपरोक्त (ब) प्रमाणे कार्यवाही करणेस व सदर कामासाठी पुणे विद्यापीठास अनुदान देणेस मान्यता मिळणेबाबत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पत्र देण्यात आलेले होते.

७. सदर पत्रानुसार मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील दि.१० एप्रिल, २००६ रोजीचे पत्रान्वये पुणे विद्यापीठाचा अध्यासन सुरु करण्याबाबतचा तपशिलवार खर्चासह प्रस्ताव तसेच सदर अध्यासन सुरु करण्याने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७ (२)(ठ) ची कशाप्रकारे पूर्तता होईल याची कारणमिमांसा सादर करणेबाबत निर्देश दिलेले होते.

८. त्यास अनुसरुन मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना त्यांचे पत्रातील निर्देशाप्रमाणे प्रस्ताव पुनश्ःच सादर करण्यात आला.

९. त्यानंतर मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांनी त्यांचे दि.१६ नोव्हेंबर, २००६ रोजीचे पत्रान्वये कुल सचिव, पुणे विद्यापीठ यांना १. पुणे विद्यापीठामार्फत सुरु करण्यात आलेल्या संत तुकाराम अध्यासनाबाबतची/ अन्य अध्यासनांबाबतची तपशिलवार माहिती खर्चाच्या तपशिलासह २. श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांजकडून विद्यापीठास अध्यासनाकरिता निधी उपलब्ध करुन देण्यास आल्यास सदर निधीचा विनियोग कशा प्रकारे केला जाईत तसेच विद्यापीठात अध्यासनाबाबतच्या कोणत्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील, याबाबत माहिती मागविलेली होती.

१०. त्यानंतर मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांनी त्यांचे दि.१८ एप्रिल, २००७ रोजीचे पत्रान्वये कुल सचिव, पुणे विद्यापीठ यांना संत तुकाराम अध्यासनाबाबतची विविध मुद्यांबाबत माहिती मागविलेली होती.

११. मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी मागविलेली माहिती पुणे विद्यापीठ, पुणे यांनी त्यांचेकडील दि.२५.०७.२००७ रोजीचे पत्रान्वये मुद्दे निहाय सादर केलेली आहे.

१२. त्यानंतर मा.विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांनी त्यांचेकडील दि.१९ मार्च, २००८ रोजीचे पत्रान्वये विद्यापीठात एखादे नवीन अध्यासन निर्माण करावयाचे झाल्यास त्याच्या खर्चासाठी पुरेसे व्याज उपलब्ध होईल एवढा म्हणजे किमान १ कोटी रुपये स्थायी निधी देण्यास श्री साईबाबा संस्थान तयार आहे काय? याबाबत संस्थानचा अभिप्राय शासनास पाठविण्याबाबत कळविलेले होते. त्यानंतर दि.०५ जून, २००८ रोजीचे पत्रान्वये सदरची माहिती तात्काळ पाठविण्याबाबत कळविलेले होते. त्यानंतर झालेल्या कार्यवाहीची कागदपत्रे आढळून आलेले नाहीत.

त्यानंतर उपरोक्त संदर्भ क्र.१ चे परिपत्रकान्वये मा.अध्यक्ष महोदय, यांनी दि.१० व ११ नोव्हेंबर, २०१६ रोजीचे राऊंडमध्ये दिलेल्या सुचनांनुसार सबंधीत विभागांना निर्देश देणेत आलेले आहेत. सदर परिपत्रकामध्ये अ.क्र.१७ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात श्रीसाईबाबां विषयी स्वतंत्र अध्यासन (Chair) तयार करणेबाबत निर्देश देणेत आलेले आहेत.

मा.अध्यक्ष महोदय, यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात, श्री साईबाबांविषयी स्वतंत्र अध्यासन (Chair) सुरु करणेबाबत इकडील कार्यालयाकडील दि.०१.०१.२०१७ रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसर मा.कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांना दि.०१ फेब्रुवारी, २०१७, दि.०७ फेब्रुवारी, २०१७ व दि.०३ जुलै, २०१७ रोजी पत्र देऊन माहिती व अभिप्राय मागविण्यात आलेला होता.

त्यानुसार प्रभारी कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी त्यांचेकडील संदर्भ क्रमांक–एटी/अध्यासन/१२५७ दि.२७.०७.२०१७ रोजीचे पत्रान्वये "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये श्री साईबाबा अध्यासन सुरु करण्याकरिता संस्थेकडून १ कोटी रुपयांचा निधी प्राप्त होण्याकरिता तत्कालीन कुलगुरु डॉ.अशोक कोळस्कर यांच्या कार्यकाळात प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्ताव संस्थानमार्फत शासनास सादर करण्यात आला होता. तदनंतर शासनाने याबाबत अधिकची माहिती या विभागाकडे मागितली असता वेळोवेळी सदर माहिती शासनास सादर करण्यात आलेली आहे. परंतू अद्यापी संस्थेमार्फत तसेच शासनामार्फत कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत. तरी याबाबत आपणास कळविण्यात येते की, मा.व्यवस्थापन परिषदेच्या ठराव क्र.१८४/ २६०५१० दि.२६ मे, २०१० अन्वये विद्यापीठामध्ये एखादे नवीन अध्यासन निर्माण करावयाचे झाल्यास सदर अध्यासनाच्या खर्चापोटी पुरेसे व्याज उपलब्ध होईल एवढा म्हणजे किमान १ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. शासनाकडून अथवा आपल्या संस्थानकडून श्री साईबाबा अध्यासन सुरु करण्याकरिता रु.१ कोटीचा निधी उपलब्ध करुन दिल्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये श्री साईबाबा अध्यासन सुरु करता येणे शक्य आहे" असे कळविलेले आहे.

सदरचा प्रस्ताव हा आर्थिक स्वरुपाचा व धोरणात्मक असल्याने मा.व्यवस्थापन समितीचीचे सभेत सादर केला असता, मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७०४ अन्वये "श्री साईबाबांच्या समाधी शताब्दीचे औचित्य साधून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे श्री साईबाबा

अध्यासन सुरु करावे, असे समितीचे एकमत झाले. परंतू त्यासाठी रु.१ कोटी मात्र रक्कम निधी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडे डिपॉझीट स्वरुपात जमा करावयाची आहे. सदर डिपॉझीट रिफंडेबल आहे किंवा कसे, याबाबत माहिती घेऊन, तसा प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करावा" असे ठरले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७०४ नुसार इकडील जा.क्र.एसएसएस/साप्रशा/ आस्था/३६६३/२०१७ दि.०७ ऑक्टोबर, २०१७ अन्वये मा.कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांना पत्र देऊन श्री साईबाबा अध्यासन सुरु करणेकामी रु.१ कोटी मात्र निधी उपलब्ध करुन दिल्यास सदरचा निधी हा रिफंडेबल राहील अगर कसे याबाबत विचारणा करण्यात आलेली होती.

त्यानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांनी त्यांचेकडील संदर्भ क्रमांक एटी/अध्यासन/१६८३ दि.०८.११.२०१७ रोजीचे पत्रान्वये "सदर जमा झालेल्या डिपॉझिटच्या व्याजावर अध्यासन निर्माण करुन अध्यासनाचा खर्च करावयाचा असल्याने सदर डिपॉझिट रिफंडेबल नाही, याची नोंद घेण्यात यावी" असे कळविलेले आहे.

सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर अवलोकनार्थ सादर करण्यात आला असता, मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१२.२०१७ चे सभेत निर्णय क्र.१०३१ पुढीलप्रमाणे पारित झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे या विद्यापीठामध्ये श्री साईबाबा अध्यासन सुरु करणेसाठी भरावयाची रु.१ करोड डिपॉझिट रक्कम रिफंडेबल नाही, याची नोंद घेण्यात आली व शासन मान्यतेने सदरहू रक्कम सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये डिपॉझीट म्हणून भरुन श्री साईबाबा अध्यासन सुरु करणेसाठी पुढील कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली"

उपरोक्त निर्णयानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडे श्री साईबाबा अध्यासन सुरु करणेसाठी रु.१ करोड डिपॉझिट रक्कम भरणेस व श्री साईबाबांचे अध्यासन सुरु करणेस मान्यता मिळणेकामी इकडील जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/आस्था/५४७३/२०१७ दि.१३ जानेवारी, २०१८ अन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

त्यानुसार विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी त्यांचेकडील क्र.सासंवि-१०१८/ १५७ /प्र.क्र.१५/का.१६ दि.१९ मे, २०१८ रोजीचे पत्रान्वये "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात श्री साईबाबा अध्यासन सुरु करणेबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे अभिप्राय मागविले असता, त्यांनी असे कळविले आहे की, अध्यासना संदर्भात निश्चित धोरण तयार करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु असून त्यानुसार प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच अध्यासनांसंदर्भात निश्चित धोरण तयार करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. सबब या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अध्यासन निर्मितीबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या स्तरावर धोरण निश्चित झाल्यानंतरच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे अध्यासन सुरु करण्याबाबतची कार्यवाही करणे उचित होईल," असे कळविलेले आहे.

विभागाचे अभिप्राय - विधी व न्याय विभागाकडील उपरोक्त अभिप्राय पाहाता शासनाने श्री साईबाबा अध्यासन सुरु करण्यासाठी अध्यासन निर्मितीबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या धोरण निश्चित होईपावेतो स्थगिती दिल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात श्री साईबाबांचे अध्यासन सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव तूर्तास स्थिगत ठेऊन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या धोरण निश्चित झाल्यानंतर त्यांचे धोरणानुसार पुन्हा प्रस्ताव सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

तसेच सद्यस्थिती अध्यासन सुरु करण्याबाबतची सर्व कार्यवाही स्थगित ठेऊन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या धोरण निश्चित झाल्यानंतर त्यांचे धोरणानुसार प्रस्ताव सादर करावा लागणार असल्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात श्री साईबाबा अध्यासन सुरु करणेकामी यापुर्वी पारित झालेले मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०८.२००५ चे सभेतील निर्णय क्र.४६८, दि.०२.१०.२००५ चे सभेतील निर्णय क्र.६३५, दि.२०.०८.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७०४ व दि.०८.१२.२०१७ चे सभेत निर्णय क्र.१०३१ निरस्त करणे योग्य होईल, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव- तरी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात श्री साईबाबांचे अध्यासन सुरु करणेचा प्रस्तावबाबत विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.१९ मे, २०१८ रोजीचे पत्रातील अभिप्रायाचे अवलोकन करता उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अध्यासनांसंदर्भात निश्चित धोरण तयार होईपावेतो सदरहु प्रस्ताव स्थगित ठेऊन, शासनाचे धोरण निश्चित झाल्यानंतर नव्याने प्रस्ताव सादर करणेस तसेच यापुर्वी श्री साईबाबांचे अध्यासन सुरु करणेकामी पारित झालेले मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०८.२००५ चे सभेतील निर्णय क्र.४६८,

दि.०२.१०.२००५ चे सभेतील निर्णय क्र.६३५, दि.२०.०८.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७०४ व दि.०८.१२.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.१०३१ निरस्त करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.४७९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात श्री साईबाबांचे अध्यासन सुरु करणेबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अध्यासनासंदर्भात धोरण निश्चित झालेले नसल्याने श्री साईबाबांचे अध्यासन सुरु करणेकामी पारित झालेले मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०८.२००५ चे सभेतील निर्णय क्र.४६८, दि.०२.१०.२००५ चे सभेतील निर्णय क्र.६३५, दि.२०.०८.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७०४ व दि.०८.१२.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.१०३१ निरस्त करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,सामान्य प्रशासन)**

---

विषय नं.२० **महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांनी पत्र क्र. सासंवि-१०१७/६७४/प्र.क्र.२०/का.१६ दि.०८/०५/२०१७ अन्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील तरतूदींचा विचार करता साई रुग्णवाहिका प्रकल्पाच्या फेर प्रस्तावाबाबत....**

प्रस्ताव- **महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधीलः-**

१) कलम १७ (१) मध्ये,"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्यती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यकत त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) कलम १७ (२-ण) मध्ये,मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला अपत्ती मध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

३) कलम २१ (१) मध्ये, विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल,--

(ख) - रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) - भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) - श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

४) कलम २१ (१क-२) मध्ये पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापराता व खर्च करता येईल.-

(एक) राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेला एखादी नोंदणीकृत सावर्जनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखाभाल करुन घेणेसाठी छाननी समितीचे मान्यतेने अर्थसाहय्य देण्याची तरतुद आहे.

५) कलम-१७ (३) मध्ये "विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरिता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाही", अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना**:-दि.३१/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीने सभेतील विषय क्र.२३ निर्णय नं.६३७ (१८) अन्वये, श्री साईबाबांनी त्यांच्या हयाती मध्ये स्वत:च्या हाताने अनेक रुग्णांची सेवा सुश्रुषा करुन त्यांच्या व्याधी ब-या केलेल्या आहेत. श्री साईबाबांनी केलेले हे रुग्णसेवेचे कार्य श्री साईबाबा संस्थानने अविरतपणे पुढे

सुरु ठेवलेले आहे. आजमितीस शिर्डी मध्ये संस्थान मार्फत श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन रुग्णालयामार्फत ही सेवा अल्पदरात उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

श्री साईबाबांचे हे रुग्णसेवेचे कार्य पुढे असेच चालु ठेवुन त्यांची व्याप्ती वाढविण्याकरीता, "राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील अधिकाधिक रुग्णांपर्यंत तातडीने वैद्यकीय सेवा पोहचविणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व दानशुर साईभक्त यांचे संयुक्त विद्यमाने राज्यातील विविध भागातील स्वयंसेवी संस्थाना रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याचा उपक्रम सुरु करण्याचा व्यवस्थापन समितीचा मानस आहे. सदरचा उपक्रम सुरु करण्यासाठी ५०० रुग्णवाहिका (Ambulance) खरेदी कराव्या लागतील. या रुग्णवाहिकांच्या खरेदीसाठी रुग्णवाहिका प्रकल्प राबविणा-या स्वयंसेवी संस्थानी त्यासाठीची २५ टक्के रक्कम भरावी व उर्वरित ७५ टक्के रक्कम दानशुर देणगीदार साईभक्ताच्या देणगीमधुन उपलब्ध करावयाची आहे. याकरीता या उपक्रमासाठी देणगीदार साईभक्त आपल्या आई-वडीलांच्या स्मृतीपित्यर्थ अथवा इतर कार्यानिमित्त देणगी देऊ शकतात. अशा प्रकारे देणगीदारांना आवाहान करण्यात यावे. या सर्व रुग्णवाहिका साई ॲम्बुलन्स या नावाने महाराष्ट्रभर चालतील व त्यांचे संचालन स्वयंसेवी संस्थामार्फत होईल अशा प्रकारे कार्यवाही करण्यात यावी" असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार इकडील जा.नं.एसएसएस-वशी-वाहन/४४५५/२०१६ दि.२३/११/२०१६ अन्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांना सदर साई-रुग्णवाहिका प्रकल्पास शासन मान्यता मिळणे कामी पत्र देण्यात आलेले होते.

त्यानंतरदि.२५.०२.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४ व निर्णय क्र.१४ अन्वये ''महाराष्ट्रातील ग्रामीण,दुर्गम भागातील गरीब व गरजु रुग्णांना तात्काळ वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन देणेसाठी ५०० रुग्णवाहिकांचा प्रकल्प राबविणेकामी अंतीम सुधारित नियमावली तयार करणेत येऊन त्यास मान्यता देण्यात आली व या सर्व कार्यवाहीस संस्थानच्या छाननी समितीची मान्यता घेऊन पुढील मंजुरीसाठी सदर प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात यावा", असे ठरले.

सदर निर्णयानुसार,दि.२७/०३/२०१७ रोजीचे मा छाननी समितीचे सभेत सदर साई रुग्णवाहिका प्रकल्पास व त्या बाबतचे सुधारीत नियमावलीस मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या सभेत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

"वरील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. श्री साईबाबा संस्थानमार्फत ५०० रुग्णवाहिकांचा साई-रुग्णवाहिका प्रकल्प राबविणेस व याकामी महिंद्रा व महिंद्रा कंपनीचे BS-III बोलेरो वाहन, विशेष किंमत रु.५ लक्ष प्रति रुग्णवाहिका या दराने खरेदी करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.

सर्वसहमतीने असेही ठरले की, या प्रकल्पाच्या पहिल्या टप्यात १०० रुग्णवाहिका खरेदी करण्यात याव्यात व त्यानंतर या १०० रुग्णवाहिकांच्या व त्या रुग्णवाहिका चालविणा-या संस्थाच्या कामकाजाबाबत आढावा घेवुन पुढील प्रकल्प राबविण्याची कार्यवाही करावी. श्री साईबाबा संस्थानचे रुग्णवाहिका संदर्भातील सर्व नियम हे संबंधीत संस्थांना लागु असतील. तसेच या प्रकल्पात लागु होणारे सर्व प्रकारचे सरकारी कर माफ करण्याचा विनंती प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा. सर्वानुमते प्रस्तावीत नियमावलीस मान्यता देण्यात आली व सदरहु नियमावलीस व प्रकल्प राबविणेस शासनाची मान्यता घेणेसाठी विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.

यानुसार इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/२५३/२०१७ दि.१५/०४/२०१७ चे पत्रान्वये, साई रुग्णवाहिका प्रकल्पास व या बाबतचे मा.व्यवस्थापन समितीने तसेच छाननी समितीने मान्यता दिलेले नियमावलीस शासन मान्यता मिळणे करीता प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करण्यात आला होता.

महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांनी पत्र क्र. सासंवि-१०१७/६७४/प्र.क्र.२०/का.१६ दि.०८/०५/२०१७ अन्वये, "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील उपरोक्त तरतूदी विचारात घेता,"भक्तांना जाहिर आवाहन करुन या प्रयोजनासाठी भक्तांकडून थेट प्राप्त होणारा निधी कोणत्याही स्वयंसेवी संस्थेला उपलब्ध करुन देता येणार नाही. सबब, संदर्भाधीन पत्रान्वये आपण सादर केलेला प्रस्ताव अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने सदर प्रस्तावावी फेर तपासणी करण्यात यावी", असे कळविलेले होते.

यानुसार सदर विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ चे सभेत सादर केला असता. यावर सविस्तर चर्चा होऊन,"राज्यातील गोर-गरीब, दुर्बल, आदिवाशी रुग्णांच्या सेवेसाठी श्री साईबाबा संस्थान

विश्वस्तव्यवस्थामार्फत साई रुग्णवाहिका प्रकल्प सुरु करण्याचा समितीचा माणस आहे. सदरहू प्रकल्प राबविणेसाठी, अधिनियमातील तरतूदींचा सखोल अभ्यास करुन, तसेच संस्थान कायदे सल्लागाराचा सल्ला घेण्यात येऊन व मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेबरोबर चर्चा करुन सविस्तर फेरप्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा", असे ठरले.

या निर्णयानुसार इकडील जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/९०९/२०१७ दि.२३/०५/२०१७ चे पत्रान्वये संस्थानचे कायदे विषयक सल्लागार ॲड. नितीन आर. भवर, औरंगाबाद यांना शासनाचे पत्र संस्थान अधिनियम याचा अभ्यास करुन साई रुग्णवाहिका प्रकल्पाबाबत उचीत मार्गदर्शन करणे बाबत कळविलेले आहे. त्यांचेकडून अद्याप अभिप्राय अप्राप्त आहे.

कार्यासन अधिकारी, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.सासवि-१०१७/सं.क्र.११९५/का.१६, दि.१९.०७.२०१७ चे पत्र इकडील कार्यालयास दि.२८/०७/२०१७ रोजी प्राप्त झालेले आहे. सदर पत्रामध्ये,"श्री संजय भास्करराव काळे, कोपरगांव, जि.अहमदनगर यांच्या दिनांक २१/०६/२०१७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करावे. सदर पत्रातील मुद्यांच्या अनुषंगाने आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास त्वरीत सादर करण्यात यावेत", असे कळविलेले आहे.

तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री संजय भास्कर काळे यांनी १) महाराष्ट्र शासन, २) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचीकेत मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ व दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयाची मा.कोर्टाचा पुढील आदेश होईपावेतो स्थगीत ठेवणेची मागणी केलेली आहे. या करीता संस्थानचे विधी विभागामार्फत दि.०९/०९/२०१७ चे टिपणीनुसार ॲड. नितीन भवर यांना वकीलपत्र दिलेले आहे. सदर जनहित याचिकेचा नंबर ८६/२०१८ असुन पुढील सुनावणी दि.१८/०७/२०१८ रोजी आहे.

महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांचेकडील पत्रातील व मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या जनहित याचीकेतील मुद्यांबाबत सविस्तर चर्चा होऊन शासनास देणेचे अभिप्राय बाबत निर्णय होणे करीता सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ चे सभेपुढे सादर करण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०५, निर्णय क्र.२०४ "साई रुग्णवाहिका प्रकल्पामध्ये संस्थानने Aggregator ची भूमिका पार पाडावी. महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीशी चर्चा करुन एका रुग्णवाहिकेची किंमत निश्चित करावी. सदर किंमतीच्या २५% रक्कम रुग्णवाहिका मागणी करणा-या संस्थेने व उर्वरीत ७५% रक्कम साईभक्तांनी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीकडे भरावेत. यासाठी संस्थानने सर्व साईभक्तांना आवाहन करावे.

प्रथम महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन या प्रकल्पासाठी रुग्णवाहिकेची किंमत निश्चित करावी. सदर रुग्णवाहिकेवर "साई रुग्णवाहिका" असे कंपनीमार्फत प्रिंट करुन घ्यावे. यासाठी प्रथम कार्यवाही करावी.

सध्या सदर प्रकल्पासाठी ज्या साईभक्तांनी देणगी दिलेली आहे. त्यांना त्यांची रक्कम परत करता येईल का? याबाबत अभ्यास करुन प्रस्ताव सभेसमोर सदर करणेत यावा, असे ठरले.

यानंतर दि.०४/०४/२०१८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०१ निर्णय क्र.२२४ (५) नुसार दि.०७/०३/२०१८ रोजीचे शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

दि.०७/०३/२०१८ चे सभेतील निर्णय क्र.२०४ या मध्ये खालील मजकुर समाविष्ठ करणेत यावा.

साई रुग्णवाहिका प्रकल्पासाठी साईभक्तांनी देणगी दिलेल्या रकमेचा सदर योजनेसाठी विनियोग कसा करता येईल, याबाबत समिती सदस्य मा. ॲड. मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली कायदेतज्ञ व आयकर तज्ञांचा सल्ला घेण्यात यावा, असे ठरले.

या सभेत दिलेल्या निर्देशानुसार वाहन विभागाकडील दि.०५/०४/२०१८ चे मान्यतेने व जा.नं.एसएसएस/वाहन/९९/२०१८ दि.१२/०४/२०१८ चे आदेशान्वये साई रुग्णवाहिका प्रकल्पाकरीता संस्थानमार्फत साईभक्तांकडून स्विकारण्यात येणारी देणगी पुढील आदेश पावेतो स्थगित करण्यात आलेली आहे. त्यानुसार साई रुग्णवाहिका प्रकल्पाचे निधीमध्ये संस्थानखाती दि.१३/०४/२०१८ अखेर एकुण रु.६,२४,३४,४६१/- (अक्षरी रु. सहा कोटी चौविस लाख चौतीस हजार चारशे एकसष्ट मात्र) जमा आहेत.

यानंतर दि.०२/०५/२०१८ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३३८ व दि.०१/०६/२०१८चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३४७ अन्वयेखालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"रुग्णवाहिकांसाठी साई रुग्णवाहिका प्रकल्पाबाबत सभेत सविस्तर चर्चा झाली, सदर प्रकल्पासाठी भाविकांकडून जमा केलेल्या निधीचा विनियोग कसा करावा, याबाबत संस्थानचे कर सल्लागार श्री केळकर व सनदी लेखापाल श्री चितळे यांचा सल्ला घेण्यात आला. भाविकांनी रुग्णवाहीकांसाठी देणगी स्वरुपात दिलेली रक्कम कोणत्याही परिस्थितीत त्यांना परत करता येणार नाही, असे दोन्ही सल्लागारांनी सुचित केले आहे. त्याऐवजी सदर निधीचा विनियोग संस्थाननेच करावा असे त्यांची सुचविले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर निधी भाविकांना परत करु नये, असे ठरले. तसेच सदर निधीमधुन विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन १०० रुग्णवाहीका खरेदी कराव्यात, सदर रुग्णवाहिकेवर साई रुग्णवाहिका व संस्थानचे तसेच देणगीदार साईभक्ताचे नाव टाकावे. सदर रुग्णवाहिका राज्यभरातील आरोग्य क्षेत्रात कार्य करणा-या सेवाभावी संस्था / ट्रस्ट यांना करारपध्दतीने वापरण्यासाठी देण्यात याव्या, त्यासाठी सदर संस्थाकडून रु.१ लाख मात्र एवढी रक्कम नापरतावा अनामत रक्कम म्हणून संस्थानकडे जमा करुन घ्यावी. सदर रुग्णवाहीकांची मालकी संस्थानची राहील. तथापी सदर रुग्णवाहीकेवरील वाहन चालक त्यासाठी येणार इंधन, दुरुस्ती देखभाल व इतर अनुषंगीक खर्च करण्याची जबाबदारी वापरकर्त्या सस्थांची राहील. तसेच सदर रुग्णवाहिकेचा वापर करतांना अपघात किंवा तत्सम प्रसंगातुन उद्भवणा-या कायदेशीर बाबींची जबाबदारी देखील संबधीत वापरकर्त्या सस्थांची राहील", असे ठरले. त्याप्रमाणे प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यास मान्यता देण्यात आली.

याबाबत सेवाभावी संस्था/ ट्रस्ट यांचेकडून अर्ज मागविणे, त्यांची निवड करण्याची पध्दती पात्रतेचे निकष तसेच संस्थेची निवड झाल्यानंतर त्यांचेशी करावयाच्या करारनाम्यातील अटी व शर्ती यांचा समावेश असलेल्या नियमावलीसह सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करावा, असे ठरले.

**विभागाचा अभिप्रायः-** उपरोक्त निर्णयानुसार, साई रुग्णवाहिका प्रकल्पाच्या रुग्णवाहिका संस्थानच्या नावावर असलेने त्या अनुषंगीक खालील बाबी संस्थानवर बंधनकारक राहतील.

१) सदर साई रुग्णवाहिका प्रकल्पाकरीता १०० रुग्णवाहिका कंपनी व मॉडेल निश्चित करुन विहीत पध्दतीने खरेदी करणेस तसेच या कामी येणा-या खर्चास शासनाची मान्यता घ्यावी लागेल.

२) साई रुग्णवाहिकांचा प्रथम RTO रजिस्ट्रेशन व इतर अनुषगीक खर्च संस्थानला करावा लागेल.

३) एखाद्या रुग्णवाहिकेस अपघात झालेस तसेच या अपघातात दुर्दैवी मृत्यु झाल्यास त्या संबंधीत कायदेशीर प्रक्रिया संस्थानला पारपाडाव्या लागतील. त्यासंबंधीत काही कायदेशिर बाबी निर्माण झाल्यास त्यावेळी संबंधीत न्यायालयात संस्थानचे विधी विभागामार्फत संस्थान प्रतिनिधी हजर ठेवुन वेळोवेळी माहिती द्यावी लागेल.

४) अपघातग्रस्त साई रुग्णवाहिका दुरुस्ती करीता येणा-या खर्चाचा तसेच अपघातातील जखमी अथवा मयत व्यक्तींनी किंवा त्यांचे नातेवाईकांनी नुकसान भरपाईची मागणी केल्यास त्यासंबंधी विमा क्लेम संबंधीत विमा कंपनीकडे संस्थानला सादर करावा लागेल. तसेच यासंबंधीत कायदेशिर बाबींचे पुर्ततेकरीता संबंधीत न्यायालयात संस्थानचे विधी विभागामार्फत संस्थान प्रतिनिधी हजर ठेवुन कार्यवाही करावी लागेल.

५) साई रुग्णवाहिका प्रकल्पातील रुग्णवाहिकेचा अपघात झाल्यास तीचे दुरुस्ती करीता झालेला खर्च संबंधीत संस्था सेवाभावी संस्था / ट्रस्ट आदा करणार आहेत. मात्र साई रुग्णवाहिका संस्थानचे नावावर असलेने अपघातग्रस्त रुग्णवाहिकेस दुरुस्ती करीता आलेल्या खर्चाची विमा कंपनीचे नियमानुसार विमा क्लेम पोटी मिळणारी परतावा रक्कम प्रथम संस्थान खाती जमा होईल. अशी संस्थान खाती झालेली जमा झालेली रक्कम संबधीत संस्थांना परत करणे अडचणीचे होईल.

६) साई रुग्णवाहिकांचाप्रतीवर्षी टॅक्स माफ करुन घेणे करीता सर्व सेवाभावी संस्थाना रुग्णवाहिका व आवश्यक कागदपत्रांसह शिर्डी येथे बोलावुन टॅक्स माफ करणेची अनुशंगिक कामे संस्थानला करावे लागतील. टॅक्स माफी न मिळाल्यास नियमानुसार RTO कार्यालयात टॅक्सची रक्कम भरावी लागेल.

७) साई रुग्णवाहिकांचा प्रती वर्षी सर्व वाहने फिटनेस करीता सर्व सेवाभावी संस्थाना रुग्णवाहिका व आवश्यक कागदपत्रांसह शिर्डी येथे बोलावुन सदरच्या रुग्णवाहिका विहीत फॉर्म व फी भरुन RTO कार्यालयाकडे तपासणी कामी पाठवाव्या लागतील. विहीत कालावधीत फिटनेस न झालेस या कामी RTO कार्यालयाच्या नियमानुसार दंड संस्थानला भरावा लागेल.

८) फिटनेस कामांकरीता सर्व रुग्णवाहिका एकाच वेळी उपलब्ध होतील असे नाही त्यामुळे सदर कामेवेळोवेळी करावे लागतील.

९) साई रुग्णवाहिका आठ वर्ष जुन्या झाल्यानंतर नंतर RTO कार्यालयाच्या नियमानुसार पर्यावरणकर संस्थानलाभरावा लागेल.

१०) साईरुग्णवाहिका प्रकल्पातील सर्व रुग्णवाहिकांचा प्रति वर्षीविमा नुतणीकरण संस्थानमार्फत वेळेत करावा लागेल. याकामी विमा हप्त्याची रक्कम संबधीत संस्थेकडून परत घ्यावी लागेल.

११) या सर्व रुग्णवाहिकेवर व त्यांचे कामकाजावर नियंत्रण ठेवणे करीता एक स्वतंत्र साई रुग्णवाहिका या नावाने नवीन विभाग तयार करावा लागेल. या करीता आवश्यक कर्मचारी उपलब्ध करुन द्यावे लागतील. या कामी लागणा-या कर्मचा-यांची संख्येची संस्थान आकृतीबंधात वाढ करणे बाबत शासन मान्यता घ्यावी लागेल.

१२) सदर रुग्णवाहिकांवर नियंत्रण ठेवणे करीता वाहनांमध्ये कॅमे-यासह जीपीआरएस सिस्टीम बसवावी लागेल. तसेच इतर अनुशंगिक साधन सामुग्री संस्थानचे सीसीटीव्ही विभागामार्फत उपलब्ध करुन त्यांचे दैनंदिन नियंत्रण व दुरुस्ती देखभाल सीसीटीव्ही विभागामार्फत करावी लागेल.

उपरोक्त बाबी विचारात घेता सदर रुग्णवाहिका प्रकल्पाची अंमलबजावणी करणे अव्यवहार्य आहे, असे प्रशासनाचे मत आहे.

तथापि ज्या स्वयंसेवी संस्था / ट्रस्ट यांना रुग्णवाहिका द्यावयाच्या आहेत, त्यांचे निकष / नियमावली निश्चित करुन त्यानुसार त्यांचेकडून विहीत नमुन्यात अर्ज मागवुन त्या संस्था निश्चित करुन त्यांना ठरावीक रक्कम अनुदान म्हणुन देवुन त्या रक्कमेतुन त्यांनी रुग्णवाहिका खरेदी केल्यास त्या रुग्णवाहिकांची कायदेशीर जबाबदारी त्यांची राहील.

संस्थान अधिनियमातील कलम २१ (२) (१) नुसार पात्र संस्थांची निवड करुन मा.छाननी समितीच्या मान्यतेने शासनाला प्रस्ताव सादर करता येईल. शासन मान्यता मिळालेनंतर संबधीत संस्थाना एकरकमी अनुदान अटी व शर्तींच्या अधिन राहुन देता येईल. यामुळे संस्थानवर भविष्यात कोणतीही कायदेशिर जबाबदारी येणार नाही.

**प्रस्तावः-** मा.व्यवस्थापन समितीच्या सभेमध्ये साई रुग्णवाहिका प्रकल्पाबाबत वेळोवेळी झालेल्या सर्व निर्णयांचे अवलोकन होऊन शासनास पाठवावच्या अंतिम प्रस्तवाचा मसुदा निश्चित करुन निर्णय होणेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.४८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**१. ५०० रुग्णवाहिकांचा प्रकल्प मान्यतेसाठी मा.छाननी समितीचे शिफारशीने शासनाकडे फेर प्रस्ताव पाठविण्यात यावा.**

**२. याकामी संस्थानने पात्र सेवाभावी संस्थाना प्रत्येकी रुपये ५ लाख उपलब्ध करुन दयावेत, उर्वरीत रक्कम संबधीत संस्थेने द्यावी.**

**३. संबधीत संस्थेशी करारनामा करुन घेण्यात यावा.**

**४. रुग्णवाहीकेसाठी महिंद्रा ॲन्ड महिंद्रा कंपनीचे BS –VI हे मॉडेल निश्चित करणेत यावे.**

**५. प्रत्येक रुग्णवाहीकेस GPS System बसवुन घेण्यात यावी.**

**६. रुग्णवाहीकेच्या नोंदणी व विम्याची जबाबदारी संबधीत संस्थेची राहील.**

**७. रुग्णवाहीकेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे सौजन्याने 'श्री साई शताब्दी रुग्णवाहीका' असे नमुद करण्यात यावे.**

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,वाहन विभाग)**

---

**विषय नं.२१** **महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांनी पत्र क्र. सासंवि-१०१७/६७४/प्र.क्र.२०/का.१६ दि.०८/०५/२०१७ अन्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील तरतूदींचा विचारकरता साई रुग्णवाहिका प्रकल्पाच्या फेर प्रस्तावाच्या अनुषंगाने सुधारित नियमावली बाबत....**

**प्रस्ताव-** महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधीलः-

१) कलम १७ (१) मध्ये,"राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्यती

व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यकत त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) कलम १७ (२-ण) मध्ये,मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला अपत्ती मध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

३) कलम २१ (१) मध्ये, विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल,--

(ख) - रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) - भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) – श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

४) कलम २१ (१क-२) मध्ये पोट-कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यवस्थेच्या निधीत शिल्लक राहिली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापराता व खर्च करता येईल.-

(एक) राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही शैक्षणिक संस्था, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तींसाठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेला एखादी नोंदणीकृत सावर्जनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर-वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखाभाल करुन घेणेसाठी छाननी समितीचे मान्यतेने अर्थसाहय्य देण्याची तरतुद आहे.

५) कलम-१७ (३) मध्ये "विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्व मंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडून, एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरिता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही, किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रमित करण्यात येणार नाही", अशी तरतुद आहे.

प्रस्तावनाः- दि.३१/०८/२०१६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीने सभेतील विषय क्र.२३ निर्णय नं.६३७ (१८) अन्वये,श्री साईबाबांनी त्यांच्या हयाती मध्ये स्वत:च्या हाताने अनेक रुग्णांची सेवा सुश्रुषा करुन त्यांच्या व्याधी ब-या केलेल्या आहेत. श्री साईबाबांनी केलेले हे रुग्णसेवेचे कार्य श्री साईबाबा संस्थानने अविरतपणे पुढे सुरु ठेवलेले आहे. आजमितीस शिर्डीमध्येसंस्थान मार्फत श्री साईबाबा व श्री साईनाथ या दोन रुग्णालयामार्फत ही सेवा अल्पदरात उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

श्री साईबाबांचे हे रुग्णसेवेचे कार्य पुढे असेचचालु ठेवुन त्यांची व्याप्ती वाढविण्याकरीता, "राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील अधिकाधिक रुग्णांपर्यंत तातडीने वैद्यकीय सेवा पोहचविणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व दानशुर साईभक्त यांचे संयुक्त विद्यमाने राज्यातील विविध भागातील स्वयंसेवी संस्थाना रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याचा उपक्रम सुरु करण्याचा व्यवस्थापन समितीचा मानस आहे. सदरचा उपक्रम सुरु करण्यासाठी ५०० रुग्णवाहिका (Ambulance) खरेदी कराव्या लागतील. या रुग्णवाहिकांच्या खरेदीसाठी रुग्णवाहिका प्रकल्प राबविणा-या स्वयंसेवी संस्थानी त्यासाठीची २५ टक्के रक्कम भरावी व उर्वीरत ७५ टक्के रक्कम दानशुर देणगीदार साईभक्ताच्या देणगीमधुन उपलब्ध करावयाची आहे. याकरीता या उपक्रमासाठी देणगीदार साईभक्त आपल्या आई-वडीलांच्या स्मृतीपित्यर्थ अथवा इतर कार्यानिमित्त देणगी देऊ शकतात. अशा प्रकारे देणगीदारांना आवाहान करण्यात यावे. या सर्व रुग्णवाहिका साई ॲम्बुलन्स या नावाने महाराष्ट्रभर चालतील व त्यांचे संचालन स्वयंसेवी संस्थामार्फत होईल अशा प्रकारे कार्यवाही करण्यात यावी" असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार इकडील जा.नं.एसएसएस-वशी-वाहन/४४५५/२०१६ दि.२३/११/२०१६ अन्वये मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांना सदर साई-रुग्णवाहिका प्रकल्पास  शासन मान्यता मिळणे कामी पत्र देण्यात आलेले होते.

तद्यानंतर दि.२५.०२.२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४ व निर्णय क्र.१४ अन्वये  ''महाराष्ट्रातील ग्रामीण, दुर्गम भागातील गरीब व गरजु रुग्णांना तात्काळ वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन देणेसाठी ५०० रुग्णवाहिकांचा प्रकल्प राबविणेकामी अंतीम सुधारित नियमावली तयार करणेत येऊन त्यास मान्यता देण्यात आली व या सर्व कार्यवाहीस संस्थानच्या छाननी समितीची मान्यता घेऊन पुढील मंजुरीसाठी सदर प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात यावा'', असे ठरले.

सदर निर्णयानुसार,दि.२७/०३/२०१७ रोजीचे मा छाननी समितीचे सभेत सदर साई रुग्णवाहिका प्रकल्पास व त्या बाबतचे सुधारीत नियमावलीस मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या सभेत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आलेला  आहे.

''वरील विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. श्री साईबाबा संस्थानमार्फत ५०० रुग्णवाहिकांचा साई-रुग्णवाहिका प्रकल्प राबविणेस व याकामी महिंद्रा व महिंद्रा कंपनीचे BS-III बोलेरो वाहन, विशेष किंमत रु.५ लक्ष प्रति रुग्णवाहिका या दराने खरेदी करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली.

सर्व सहमतीने असेही ठरले की, या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात १०० रुग्णवाहिका खरेदी करण्यात याव्यात व त्यानंतर या १०० रुग्णवाहिकांच्या व त्या रुग्णवाहिका चालविणा-या संस्थाच्या कामकाजाबाबत आढावा घेवुन पुढील प्रकल्प राबविण्याची कार्यवाही करावी. श्री साईबाबा संस्थानचे रुग्णवाहिका संदर्भातील सर्व नियम हे संबंधीत संस्थांना लागु असतील. तसेच या प्रकल्पात लागु होणारे सर्व प्रकारचे सरकारी कर माफ करण्याचा विनंती प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा. सर्वानुमते प्रस्तावीत नियमावलीस मान्यता देण्यात आली व सदरहु नियमावलीस व प्रकल्प राबविणेस शासनाची मान्यता घेणेसाठी विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा, असे ठरले.

यानुसार इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/२५३/२०१७ दि.१५/०४/२०१७ चे पत्रान्वये, साई रुग्णवाहिका प्रकल्पास व या बाबतचे मा.व्यवस्थापन समितीने तसेच छाननी समितीने मान्यता दिलेले नियमावलीस शासन मान्यता मिळणे करीता प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सादर करण्यात आला होता.

महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांनी पत्र क्र. सासंवि-१०१७/६७४/प्र.क्र.२०/का.१६ दि.०८/०५/२०१७ अन्वये, ''श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४ मधील उपरोक्त तरतूदी विचारात घेता,''भक्तांना जाहिर आवाहन करुन या प्रयोजनासाठी भक्तांकडून थेट प्राप्त होणारा निधी कोणत्याही स्वयंसेवी संस्थेला उपलब्ध करुन देता येणार नाही. सबब, संदर्भाधीन पत्रान्वये आपण सादर केलेला प्रस्ताव अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने सदर प्रस्तावावी फेर तपासणी करण्यात यावी'', असे कळविलेले होते.

यानुसार सदर विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ चे सभेत सादर केला असता. यावर सविस्तर चर्चा होऊन, ''राज्यातील गोर-गरीब, दुर्बल, आदिवाशी रुग्णांच्या सेवेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थामार्फत साई रुग्णवाहिका प्रकल्प सुरु करण्याचा समितीचा माणस आहे. सदरहू प्रकल्प राबविणेसाठी, अधिनियमातील तरतूदींचा सखोल अभ्यास करुन, तसेच संस्थान कायदे सल्लागाराचा सल्ला घेण्यात येऊन व मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेबरोबर चर्चा करुन सविस्तर फेर प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा'', असे ठरले.

या निर्णयानुसार इकडील जा.क्र.एसएसएस/वशी-विधी/९०९/२०१७ दि.२३/०५/२०१७ चे पत्रान्वये संस्थानचे कायदे विषयक सल्लागार ॲड. नितीन आर. भवर, औरंगाबाद यांना शासनाचे पत्र संस्थान अधिनियम याचा अभ्यास करुन साई रुग्णवाहिका प्रकल्पाबाबत उचीत मार्गदर्शन करणे बाबत कळविलेले आहे. त्यांचेकडून अद्याप अभिप्राय अप्राप्त आहे.

कार्यासन अधिकारी, विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.सासवि-१०१७/सं.क्र. ११९५/का.१६, दि.१९.०७.२०१७ चे पत्र इकडील कार्यालयास दि.२८/०७/२०१७ रोजी प्राप्त झालेले आहे. सदर पत्रामध्ये,"श्री संजय भास्करराव काळे, कोपरगांव, जि.अहमदनगर यांच्या दिनांक २१/०६/२०१७ रोजीच्या पत्राचे अवलोकन करावे. सदर पत्रातील मुद्यांच्या अनुषंगाने आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास त्वरीत सादर करण्यात यावेत'', असे कळविलेले आहे.

तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे श्री संजय भास्कर काळे यांनी १) महाराष्ट्र शासन, २) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे विरुध्द दाखल केलेल्या जनहित याचीकेत मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ व दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयाची मा.कोर्टाचा पुढील आदेश होईपावेतो स्थगीत ठेवणेची मागणी केलेली आहे. या करीता संस्थानचे विधी विभागामार्फत दि.०९/०९/२०१७ चे टिपणीनुसार अॅड. नितीन भवर यांना वकीलपत्र दिलेले आहे. सदर जनहित याचिकेचा नंबर ८६/२०१८ असुन पुढील सुनावणी दि.१८/०७/२०१८ रोजी आहे.

महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांचेकडील पत्रातील व मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या जनहित याचीकेतील मुद्यांबाबत सविस्तर चर्चा होऊन शासनास देणेचे अभिप्राय बाबत निर्णय होणे करीता सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ चे सभेपुढे सादर करण्यात आला होता.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७/०३/२०१८ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.०५, निर्णय क्र.२०४ "साई रुग्णवाहिका प्रकल्पामध्ये संस्थानने Aggregator ची भूमिका पार पाडावी. महिंद्रा अॅण्ड महिंद्रा कंपनीशी चर्चा करुन एका रुग्णवाहिकेची किंमत निश्चित करावी. सदर किंमतीच्या २५% रक्कम रुग्णवाहिका मागणी करणा-या संस्थेने व उर्वरीत ७५% रक्कम साईभक्तांनी महिंद्रा अॅण्ड महिंद्रा कंपनीकडे भरावेत. यासाठी संस्थानने सर्व साईभक्तांना आवाहन करावे.

प्रथम महिंद्रा अॅण्ड महिंद्रा कंपनीच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन या प्रकल्पासाठी रुग्णवाहिकेची किंमत निश्चित करावी. सदर रुग्णवाहिकेवर "साई रुग्णवाहिका" असे कंपनीमार्फत प्रिंट करुन घ्यावे. यासाठी प्रथम कार्यवाही करावी.

सध्या सदर प्रकल्पासाठी ज्या साईभक्तांनी देणगी दिलेली आहे. त्यांना त्यांची रक्कम परत करता येईल का? याबाबत अभ्यास करुन प्रस्ताव सभेसमोर सदर करणेत यावा, असे ठरले.

यानंतर दि.०४/०४/२०१८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.०१ निर्णय क्र.२२४ (५) नुसार दि.०७/०३/२०१८ रोजीचे शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या, त्यास मान्यता देण्यात आली.

दि.०७/०३/२०१८ चे सभेतील निर्णय क्र.२०४ या मध्ये खालील मजकुर समाविष्ठ करणेत यावा.

साई रुग्णवाहिका प्रकल्पासाठी साईभक्तांनी देणगी दिलेल्या रकमेचा सदर योजनेसाठी विनियोग कसा करता येईल, याबाबत समिती सदस्य मा. अॅड. मोहन जयकर यांचे मार्गदर्शनाखाली कायदेतज्ञ व आयकर तज्ञांचा सल्ला घेण्यात यावा, असे ठरले.

या सभेत दिलेल्या निर्देशानुसार वाहन विभागाकडील दि.०५/०४/२०१८ चे मान्यतेने व जा.नं.एसएसएस/वाहन/९९/२०१८ दि.१२/०४/२०१८ चे आदेशान्वये साई रुग्णवाहिका प्रकल्पाकरीता संस्थानमार्फत साईभक्तांकडून स्विकारण्यात येणारी देणगी पुढील आदेश पावेतो स्थगित करण्यात आलेली आहे. त्यानुसार साई रुग्णवाहिका प्रकल्पाचे निधीमध्ये संस्थानखाती दि.१३/०४/२०१८ अखेर एकुण रु.६,२४,३४,४६१/- (अक्षरी रु. सहा कोटी चौविस लाख चौतीस हजार चारशे एकसष्ट मात्र) जमा आहेत.

यानंतर दि.०२/०५/२०१८ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३३८ व दि.०१/०६/२०१८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.३४७ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"रुग्णवाहिकांसाठी साई रुग्णवाहिका प्रकल्पाबाबत सभेत सविस्तर चर्चा झाली, सदर प्रकल्पासाठी भाविकांकडून जमा केलेल्या निधीचा विनियोग कसा करावा, याबाबत संस्थानचे कर सल्लागार श्री केळकर व सनदी लेखापाल श्री चितळे यांचा सल्ला घेण्यात आला. भाविकांनी रुग्णवाहीकांसाठी देणगी स्वरुपात दिलेली रक्कम कोणत्याही परिस्थितीत त्यांना परत करता येणार नाही, असे दोन्ही सल्लागारांनी सुचित केले आहे. त्याऐवजी सदर निधीचा विनियोग संस्थाननेच करावा असे त्यांची सुचविले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदर निधी भाविकांना परत करु नये, असे ठरले. तसेच सदर निधीमधुन विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन १०० रुग्णवाहीका खरेदी कराव्यात, सदर रुग्णवाहिकेवर साई रुग्णवाहिका व संस्थानचे तसेच देणगीदार साईभक्ताचे नाव टाकावे. सदर रुग्णवाहिका राज्यभरातील आरोग्य क्षेत्रात कार्य करणा-या सेवाभावी संस्था / ट्रस्ट यांना करारपध्दतीने वापरण्यासाठी देण्यात याव्या, त्यासाठी सदर संस्थाकडून रु.१ लाख मात्र एवढी रक्कम नापरतावा अनामत रक्कम म्हणून संस्थानकडे जमा करुन घ्यावी. सदर रुग्णवाहीकांची

मालकी संस्थानची राहील. तथापी सदर रुग्णवाहीकेवरील वाहन चालक त्यासाठी येणार इंधन, दुरुस्ती देखभाल व इतर अनुषंगीक खर्च करण्याची जबाबदारी वापरकर्त्या सस्थांची राहील. तसेच सदर रुग्णवाहिकेचा वापर करतांना अपघात किंवा तत्सम प्रसंगातुन उद्भवणा-या कायदेशीर बाबींची जबाबदारी देखील संबधीत वापरकर्त्या सस्थांची राहील", असे ठरले. त्याप्रमाणे प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यास मान्यता देण्यात आली.

याबाबत सेवाभावी संस्था/ ट्रस्ट यांचेकडून अर्ज मागविणे, त्यांची निवड करण्याची पध्दती पात्रतेचे निकष तसेच संस्थेची निवड झाल्यानंतर त्यांचेशी करावयाच्या करारनाम्यातील अटी व शर्ती यांचा समावेश असलेल्या नियमावलीसह सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करावा, असे ठरले.

विभागाचा अभिप्रायः- उपरोक्त निर्णयानुसार, साई रुग्णवाहिका प्रकल्पाच्या रुग्णवाहिका संस्थानच्या नावावर असलेने त्या अनुषंगीक ब-याच कायदेशिर जबाबदा-या संस्थानवर बंधनकारक राहतील.

तथापि ज्या स्वयंसेवी संस्था / ट्रस्ट यांना रुग्णवाहिका द्यावयाच्या आहेत, त्यांचे निकष/ नियमावली निश्चित करुन त्यानुसार त्यांचेकडून विहीत नमुन्यात अर्ज मागवुन त्या संस्था निश्चित करुन त्यांना ठरावीक रक्कम अनुदान म्हणुन देवुन त्या रक्कमेतुन त्यांनी रुग्णवाहिका खरेदी केल्यास त्या रुग्णवाहिकांची कायदेशीर जबाबदारी त्यांची राहील. यामुळे अनुदान देणे बाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला आहे.

त्या अनुषंगाने पुर्वी मा.छाननी समितीने रुग्णवाहिका देणे बाबत मान्य केलेल्या नियमावलीत बदल करावा लागेल.

मा.छाननी समितीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अर्थ सहाय्य मिळणेसाठी खालील प्रमापणे पात्रतेचे निकष ठराविण्यात आलेले आहे.

१) संस्थेच्या उद्देशामध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या सन-२००४ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम २१ (२) पोट कलम (१) मधील प्रयोजनापैकी एका तरी प्रयोजनाचा समावेश असावा.

२) सहाय्य मागणारी संस्था ही मुंबई सार्वजनिक संस्था १९५० (बॉम्बे पब्लिक ट्रस्ट १९५०) खाली नोंदणीकृत होऊन कमीतकमी पाच वर्ष कार्यरत असावी. (अथवा सोसायटी रजि. अॅक्ट खाली ५ वर्षापुर्वी नोंदलेली असावी) विशेष परीस्थितीत छाननी समितीला ५ वर्षाची अट शिथिल करता येईल.

३) संस्थेच्या कार्यकारणीची निवड ही लोकशाही पध्दतीने व कायद्याप्रमाणे झालेली असावी व तशी स्पष्ट तरतुद संस्थेच्या घटनेत व उपनिधीमध्ये असावी.

४) संस्थेचे पॅनकार्ड पाहिजे. संस्थेबद्दल विश्वस्तांचे कुठल्याही न्यायालयात वाद असु नये.

५) लेखापरिक्षीत ताळेबंदीच्या गेल्या तीन वर्षाच्या प्रती परिक्षकांचे अभिप्रायासह.

६) धर्मादाय आयुक्तांनी साक्षांकित केलेली घटनेची प्रत / बदलासह.

७) सदस्य व पदाधिका-यांची नांवे व दुरुध्वनी / मोबाईल क्रमांकाची साक्षांकित संस्थेच्या अध्यक्षांनी केलेली यादी.

८) इमारत ज्या जागेवर उभारावयाची आहे. त्या जागेचा ७/१२, सिटी सर्व्हे उतारा व इमारतीचे वास्तुशास्त्रज्ञांनी प्रमाणीत केलेला नकाशा, किती प्रमाणात अर्थ सहाय्ययाचे विवेचन व संस्था त्यामध्ये किती गुंतवणूक करु शकेल याची माहिती.

९) अर्थ सहाय्य आवश्यक असलेल्या शेतकरी, पिडीत, रुग्ण, विद्यार्थी, संस्था यांना वैद्यकीय अथवा तत्सम आर्थिक मदत देणे बाबत.

१०) रुगणवाहिका, रुग्णालय किंवा तत्सम प्रकल्प राबविण्याबाबत, त्यासाठी वेगळी नियमावली राहील. ती संबधीत संस्थेस बंधनकारक राहील.

११) वृध्दाश्रम, आश्रमार्थीची संख्या व शिर्डी संस्थानकडून अपेक्षीत मदतीचे स्वरुप, गोशाळा यांना आर्थिक तत्सम मदत, त्याबाबत संबधीत संस्थेकडे उपलब्ध, पशुधन, बांधकामाचे क्षेत्र, मोकळी जागा व शिर्डी संस्थानकडून अपेक्षीत मदतीचे स्वरुप.

१२) संस्थेने (शाळेला / विद्यालयाला) नविन इमारत किंवा असलेल्या इमारतीत सुधारणा आवश्यक असलेबाबत संस्थेच्या अध्यक्ष / सचिव यांचे प्रमाणपत्र.
उपसंचालक, शिक्षण विभाग यांना अगोदर सादर केलेल्या जमा खर्चाच्या तपशिलाची प्रत.

अ) आयकर खात्याचे आयकर अधिनियम कलम ८० (जी) खाली आयकरातुन सुट मिळाल्याचे प्रमाणपत्र (असल्यास)

ब) शैक्षणिक संस्थेला शासनाकडून अनुदान मिळते किंवा नाही याबाबतचे प्रमाणपत्र.

क) संस्थेच्या मालमत्तेविषयी किंमतीसह यादी, याबाबत धर्मादाय आयुक्त यांचेकडे नोंदवहीचा साक्षांकित उतारा.

ड) संस्थेचे बँकेत नाव, पत्ता, व खाते नंबर (संस्थेच्या बाबतीत)

इ) बांधकाम करण्यसाठीचे परवानगी पत्र तसेच आराखडयाला दिलेले मंजूरीचे पत्र.

१३) प्रस्तावीत प्रकल्पात अर्जदार संस्थेचा आर्थिक सहभागाचा तपशिल सादर करणे आवश्यक आहे. (अंशतः मदत श्री साईबाबा संस्थानाने केल्यास शिल्लक निधी कशाप्रकारे उभारण्यात येणार आहे. याबाबतचे नियोजन व त्याला लागणारा कालावधीचा तपाशिल) या बाबी कलम ९, १० व ११ यांना लागु होणार नाहीत.

१४) प्रकल्प खर्चाच्या एकुण रक्कमेपैकी किमान २५ टक्के रक्कम वरील उद्देशासाठी संस्थेने जमा केली असल्याचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

१५) बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेले अर्थ सहाय्य हे बांधकामाच्या प्रगतीनुसार व टप्प्यानुसार हप्त्याहप्त्याने देण्यात येईल. म्हणजे ज्याप्रमाणात बांधकाम प्रकल्प पुर्ण होईल त्या प्रमाणात मंजुर अर्थ सहाय्यपैकी मंजूर रक्कमेचा हप्ता देण्यात येईल.

१६) न्यासाने ठरवुन दिलेला नमुना व न्यासाने निश्चित केलेले सदस्य किंवा अधिकारी यांनी प्रस्तावित प्रकल्पाला प्रत्यक्ष भेट देवुन अर्थसहाय्याच्या गरजेविषयी व प्रकल्पाच्या यशस्वितेविषयी प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

अर्थ सहाय्य मंजुर झाल्यानंतर शिर्डी संस्थानचे छानननी समितीने नियुक्त केलेले विश्वस्त किंवा अधिकारी वेळोवेळी अर्जदार संस्थेला भेट देतील व त्यावेळी अर्जदार संस्थेने अशा विश्वस्तांना अधिका-यांना प्रकल्पासंबधी माहिती देण्याबाबत सहकार्य करण्याचे लेखी आवश्यन देणे आवश्यक राहील.

साई रुग्णवाहिका प्रकल्पांर्गत स्वयंसेवी संस्था/ट्रस्ट यांची निवड करतांना उपरोक्त नियमाव्यतिरीक्त खालील बाबींचा देखील समावेश असावा असे मत आहे.

१) स्वयंसेवी संस्था ही मुंबई सार्वजनिक संस्था १९५० (बॉम्बे पब्लिक ट्रस्ट १९५०) खाली नोंदणीकृत होऊन कमीतकमी पाच वर्ष कार्यरत असावी. (अथवा सोसायटी रजि. ॲक्ट खाली किंवा मा.धर्मदाय आयुक्त यांचेकडे ५ वर्षापुर्वी नोंदलेली असावी).

२) ज्या स्वयंसेवी संस्था या प्रकल्पात समाविष्ट होवु शकतात त्यांना या प्रकल्पातील जास्तीत जास्त एक रुग्णवाहिकेसाठी अनुदान देय राहील.

३) सदर अनुदानातुन केवळ रुग्णवाहिकाच खरेदी करता येईल.

४) संस्थान अनुदानातुन रुग्णवाहिका खरेदी केले बाबतचा पुरावा संस्थानकडे सादर करावा लागेल.

५) रुग्णवाहिकेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व साई रुग्णवाहिका असे नाव टाकणे बंधनकारक राहील.

६) सेवाभावी संस्थेचे लेखापरिक्षण नियमित (प्रति वर्षी) होणे आवश्यक असुन मागील ३ (तिन) वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे.

७) सेवाभावी संस्थेची मागील ३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल (टर्नओव्हर) किमान २५ (पंचवीस) लाख रुपये असावी.

८) सेवाभावी संस्थेवर कोणतेही आर्थिक गैरव्यवहारातील गुन्हे नोंदविलेले नसावेत. या बाबत संस्थेने रु.१००/- चे गैरन्यायीक स्टॅम्पवरील प्रतिज्ञापत्र द्यावे.

९) स्वयंसेवी संस्थेला देण्यात येणा-या अनुदानातुन घेतलेली रुग्णवाहिका ही फक्त रुग्णांना सेवा देणेकरीताच वापरावी लागेल. यात कोणत्याही प्रकारची प्रवासी अगर अवैध वाहतुक करता येणार नाही.

१०) सदर रुग्णवाहिकेचे पीयुसी, फिटणेस टॅक्स इत्यादी कामे व त्याकरीता येणारा खर्च संबधीत संस्थेस करावा लागेल.

११) स्वयंसेवी संस्थेला संस्थान सोबत अटी व शर्तीचा स्वतंत्र करारनामा रु.६००/- चे गैरन्यायीक स्टॅम्प पेपरवर करुन द्यावा लागेल. या करीताचा खर्च संबंधीत सेवाभावी संस्थेस करावा लागेल.

१२) कायदेरशिर बाब उदभवल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र राहाता, कोपरगांव व औरंगाबाद कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

१३) संस्थान अनुदानातुन खरेदी केलेली रुग्णवाहिका स्वयंसेवी संस्थेला पुढील १० वर्ष इतर कोणासही चालविण्यास देता येणार नाही अथवा हस्तांतरीत करता येणार नाही.

साई रुग्णवाहिका प्रकल्पाच्या सुधारीत प्रस्तवाच्या अनुषंगाने सुधारीत नियमावली मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निश्चित झालेनंतर त्यास मा.छाननी समितीची मान्यता घेवुन व विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी सविस्तर प्रस्ताव सादर करणेत येईल.

प्रस्तावः- तरी साई रुग्णवाहिका प्रकल्पाच्या सुधारीत प्रस्तावाच्या अनुषंगाने सुधारीत नियमावलीस मान्यता मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

**निर्णय क्र.४८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, पुढील प्रमाणे नियमावलीस मान्यता देण्यात आली.**

१) स्वयंसेवी संस्था ही मुंबई सार्वजनिक संस्था १९५० (बॉम्बे पब्लिक ट्रस्ट १९५०) खाली नोंदणीकृत होऊन कमीत कमी तीन वर्ष कार्यरत असावी. (अथवा सोसायटी रजि.अॅक्ट खाली किंवा मा.धर्मदाय आयुक्त यांचेकडे ३ वर्षापुर्वी नोंदलेली असावी).

२) ज्या स्वयंसेवी संस्था या प्रकल्पात समाविष्ट होवु शकतात त्यांना या प्रकल्पातील जास्तीत जास्त एक रुग्णवाहिकेसाठी अनुदान देय राहील.

३) सदर अनुदानातुन केवळ रुग्णवाहिकाच खरेदी करता येईल.

४) संस्थान अनुदानातुन रुग्णवाहिका खरेदी केले बाबतचा पुरावा संस्थानकडे सादर करावा लागेल.

५) रुग्णवाहिकेवर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व साई शताब्दी रुग्णवाहिका असे नाव टाकणे बंधनकारक राहील.

६) सेवाभावी संस्थेचे लेखापरिक्षण नियमित (प्रति वर्षी) होणे आवश्यक असुन मागील ३(तिन) वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे.

७) सेवाभावी संस्थेची मागील ३ वर्षाची सरासरी वार्षिक उलाढाल (टर्नओव्हर) किमान १०(दहा) लाख रुपये असावी.

८) सेवाभावी संस्थेवर कोणतेही आर्थिक गैरव्यवहारातील गुन्हे नोंदविलेले नसावेत. या बाबत संस्थेने रु.१००/- चे गैरन्यायीक स्टॅम्पवरील प्रतिज्ञापत्र द्यावे.

९) स्वयंसेवी संस्थेला देण्यात येणा-या अनुदानातुन घेतलेली रुग्णवाहिका ही फक्त रुग्णांना सेवा देणेकरीताच वापरावी लागेल. यात कोणत्याही प्रकारची प्रवासी अगर अवैध वाहतुक करता येणार नाही.

१०) सदर रुग्णवाहिकेचे पीयुसी, फिटणेस टॅक्स इत्यादी कामे व त्याकरीता येणारा खर्च संबधीत संस्थेस करावा लागेल.

११) स्वयंसेवी संस्थेला संस्थान सोबत अटी व शर्तीचा स्वतंत्र करारनामा रु.६००/- चे गैरन्यायीक स्टॅम्प पेपरवर करुन द्यावा लागेल. या करीताचा खर्च संबंधीत सेवाभावी संस्थेस करावा लागेल.

१२) कायदेरशिर बाब उदभवल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र राहाता, कोपरगांव व औरंगाबाद कोर्टाचे न्याय कक्षेत राहील.

१३) संस्थान अनुदानातुन खरेदी केलेली रुग्णवाहिका स्वयंसेवी संस्थेला पुढील १० वर्ष इतर कोणासही चालविण्यास देता येणार नाही अथवा हस्तांतरीत करता येणार नाही.

**(कार्यवाही- प्र.अधिक्षक,वाहन विभाग)**

---

**विषय नं.२२** **शिर्डी विकास योजना आरक्षण व प्रारुप विकास आराखडा (सुधारीत) मधील संस्थानसाठी प्रस्तावित आरक्षणे रद्द करणेकामी श्री.अमृतराव मुरलीधर गोंदकर, श्रीमती रुंजाबाई भाऊसाहेब शेळके, सौ.सुशिला दिलीपराव गोंदकर, सौ.उज्ज्वला दिलीपचंद संकलेचा व इतर यांचे अर्ज..**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद** – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(२) (ट) मध्ये विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील, अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना**– मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१/०८/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.५८८ प्रमाणे संस्थानसाठी पूर्वीचे आरक्षणांसह नवीन क्षेत्रांसाठी आरक्षण प्रस्तावित करणेबाबत नगररचना अधिकारी,शिर्डी विकासयोजना (सुधारीत) शिर्डी तथा प्र.सहायक संचालक, नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग, अहमदनगर यांना इकडील जा.नं.३०११/२०१६ दि.१२/०९/२०१६ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आलेले आहे व सदर आरक्षणा संबंधात मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.७७२ प्रमाणे प्रारुप सुधारीत विकास योजनेत खालील नमूद केलेल्या तकत्यातील आरक्षणे प्रस्तावित करणेसाठी सहायक संचालक, नगररचना, अहमदनगर यांना रु.१००/- चे प्रतिज्ञापत्र करुन दिलेले आहे.

**संस्थानने प्रस्तावित केलेली आरक्षणे (परिशिष्ट ब)**

| अ.क्र | आरक्षणाचा हेतू | क्षेत्र हे आर | अपेक्षित अंतर/परीसर |
|---|---|---|---|
| १ | श्री साई दर्शनासाठी वेगवेगळया भागातून पायी येणारे साईभक्तांचे निवास व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामी पालखीग्राम साठी क्षेत्र आरक्षित करणे. | ५ हेक्टर | शिर्डी – समाधी मंदीरापासून अंदाजे १ कि.मी.अंतरापर्यंत. |
| २ | वाहनतळासाठी ठरावीक अंतरावर वेगवेगळया ठिकाणी क्षेत्र आरक्षित करणे तसेच मल्टीलेव्हल पार्कीगसाठी वेगवेगळया ठिकाणी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी २ हेक्टर | शिर्डी – समाधी मंदीरापासून अंदाजे १ कि.मी.अंतरापर्यंत ५ ठिकाणी रस्त्यालगत. |
| ३ | सध्या होणारी गर्दी, त्यामुळे येणा-या अडचणी तसेच सुरक्षेच्या गुरुस्थान, द्वारकामाई, श्री समाधी मंदीर व चावडी या मंदीरांचे सुलभ दर्शनासाठी एकत्रीत दर्शन रांगेच्या नियोजनासाठी तसेच रथपालखी मिरवणुकीचे गर्दीचे नियोजनासाठी दक्षिणेकडील बाजूस अतिरिक्त जागा उपलब्ध करणेसाठी क्षेत्र आरक्षित करणे. | -- | शिर्डी – समाधी मंदीर दक्षिण बाजू |
| ४ | मंदीर परिसरालगत संभाव्य दुर्घटना टाळणे व गर्दीसाठी (Refuse Area) अतिरीक्त जागा उपलब्ध करणे. | -- | शिर्डी – समाधी मंदीर परिसरालगत. |
| ५ | स.नं. ५४,५५ मधील आरक्षित क्षेत्राचा संस्थानचे विविध उपक्रमांसाठी भूसंपादन असा हेतू बदल करणे. | -- | -- |
| ६ | शिर्डी परीसरात वेगवेगळया ठिकाणी गार्डनसाठी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी २ हेक्टर | शिर्डी – समाधी मंदीरापासुन अंदाजे २ कि.मी.अंतरापर्यंत. |
| ७ | शिर्डी परीसरात वेगवेगळया ठिकाणी भक्तनिवाससाठी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी २ हेक्टर | शिर्डी – समाधी मंदीरापासुन अंदाजे २ कि.मी.अंतरापर्यंत. |
| ८ | शिर्डी परीसरात वेगवेगळया ठिकाणी संस्थानचे बस सेवेचे बस थांब्यासाठी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी ५ आर | शिर्डी – समाधी मंदीरापासुन अंदाजे २ कि.मी.अंतरापर्यंत ५ ठिकाणी. |
| ९ | माहिती व सुविधा केंद्रासाठी शिर्डी शहराच्या चारही बाजूने मुख्य रस्त्यालगत क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी ५ आर | शिर्डी – समाधी मंदीरापासुन अंदाजे २ कि.मी.अंतरापर्यंत ५ ठिकाणी. |
| १० | प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी शहरात किमान दोन ठिकाणी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी २ हेक्टर | शिर्डी – समाधी मंदीरापासुन अंदाजे २ कि.मी.अंतरापर्यंत. |
| ११ | संस्थानचे प्रस्तावित पाणीपुरवठा, वितरण व्यवस्था, शुध्दीकरण यंत्रणा, घनकचरा व्यवस्थापन, वॉटर रिसायक्लींग इत्यादीसाठी क्षेत्र आरक्षित करणे. | प्रत्येकी २ हेक्टर | शिर्डी – समाधी मंदीरापासुन अंदाजे २ कि.मी.अंतरापर्यंत २ ठिकाणी. |
| १२ | संस्थानमार्फत खरेदी करण्यात आलेल्या क्षेत्रांचे संस्थानचे विविध उपक्रमांसाठी आरक्षण करणे व झोन बदल करणे. | -- | -- |

प्रारुप विकास योजना (सुधारीत) नगरपंचायत,शिर्डी यांचेमार्फत तयार करणेत येवून माहे जुन २०१७ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याबाबत नगरपंचायतीकडून माहीती मागविली असता त्यांनी त्यांचेकडील दि.०४/०६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये नगरपंचायतने शिर्डी विकास योजनेतील आरक्षण व प्रारुप विकास

आराखडा (सुधारीत) मधील आरक्षण संदर्भात टेबल क्रं.१३ व टेबल क्रं.१४ मधील माहीती इकडेस सादर केलेली आहे.

नगरपंचायतीने सादर केलेल्या माहितीतील टेबल क्रं.१३ चे अवलोकन केले असता त्यात नगरपंचायतीने शिर्डी प्रारुप विकास योजना (सुधारीत) मध्ये खालीलप्रमाणे आरक्षणे प्रस्तावित केलेली आहेत.

| आरक्षण क्रं. | हेतु | सर्वे नं. | जागा मालक | क्षेत्र हे. आर | विकसन यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|
| ५ | संस्थान हेतु | १/२ पै. | साई संस्थान | ०.१२ | नगरपंचायत/साई संस्थान |
| १२ | बेघरांसाठी घरे | ५४,५५ | साई संस्थान | १.९० | नगरपंचायत |
| १३ | संस्थान हेतु | ५५ पै. | खाजगी व साई संस्थान | ३.५६ | नगरपंचायत/साई संस्थान |
| २३ | संस्थान हेतु | १२४ पै. १२५ पै. १२६ पै. | खाजगी | ५.३७ | नगरंपचायत/साई संस्थान |
| २५ | रुग्णालय विस्तारीकरण | १२४ पै. १२५ पै. १२६ पै. | खाजगी | ४.०० | नगरपंचायत/साई संस्थान |
| २६ | पार्कींग | १४९ पै. १५० पै. | खाजगी | ३.०१ | नगरपंचायत/साई संस्थान |
| २८ | धर्मशाळा कॉम्प्लेक्स | १४८ पै. १४९ पै.१५० पै. | खाजगी | ०.२७ | नगरपंचायत/साई संस्थान |
| २९ | पार्कींग | १६७ पै. १६९ पै. | खाजगी | ०.३३ | नगरपंचायत/साई संस्थान |
| ३१ | पार्कींग | १६७ पै. १६९ पै. | खाजगी | १.२९ | नगरपंचायत/साई संस्थान |
| ३२ | कॅम्पिंग ग्राऊंड | १६२ ते १६५ पै. | खाजगी | ४.६५ | नगरपंचायत/साई संस्थान |
| ३४ | पार्कींग | ११ पै. १२ पै. | खाजगी | १.२७ | नगरंपचायत/साई संस्थान |
| ४० | पार्कींग | १५ पै. | खाजगी | २.९० | नगरपंचायत/साई संस्थान |
| ४२ | शैक्षणिक संकुल | ५९ पै. | खाजगी | २.७५ | नगरपंचायत/साई संस्थान |
| ४५ | गार्डन | ६१ पै. ६२ पै. | खाजगी | ४.५८ | नगरपंचायत/साई संस्थान |
| ५१ | पार्कींग | १२० पै. | खाजगी | २.०० | नगरपंचायत/साई संस्थान |
| ५४ | धर्मशाळा | १४७ पै.१५३ पै. | खाजगी | ३.०० | नगरपंचायत/साई संस्थान |
| ५६ | कॅम्पिंग ग्राऊंड | १६४ पै.१६८ पै. | खाजगी | १.५६ | नगरपंचायत/साई संस्थान |
| ५७ | पब्लिक लॅट्रीन | १६८ पै. | खाजगी | ०.३३ | नगरपंचायत/साई संस्थान |

**अ)** सौ.उज्ज्वला दिलीपचंद संकलेचा व इतर १७ यांनी श्री साई मंदिराचे दक्षिण बाजूचे १२ मी.रस्त्याचे भुसंपादन रद्द करावे यासाठी दि.१४/०३/२०१८ रोजी अर्ज सादर केलेले आहेत. त्यास अनुसरुन अर्जदार यांना इकडील पत्र क्रं.एसएसएसटी मालमत्ता/४७७/ २०१८ दि.२६/०४/२०१८ अन्वये शिर्डी विकास योजना सुधारीत प्रारुप विकास आराखडा नगरपंचायत शिर्डी यांनी नगरपंचायत ठराव क्रं.२ दि.०५/०६/२०१७ अन्वये प्रसिध्द केलेला असून सुचना व हरकती स्विकारण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०१७ ही मुकरर करण्यात आलेली होती. सदर मुदतीत अर्जदार यांनी नगरपंचायतीकडे हरकत अर्ज सादर करणे विधीग्राहय आहे. यास्तव मर्जीतर नगरपंचायत,शिर्डी यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा असेबाबत अलाहीदा कळविणेत आलेले आहे.

उपरोक्त परिशिष्ट ब मधील अ.नं.३ मध्ये सध्या होणारी गर्दी त्यामुळे येणा-या अडचणी तसेच सुरक्षेच्या दृष्टिकोनातून गुरुस्थान,द्वारकामाई,श्री समाधी मंदिर व चावडी या मंदिराचे सुलभ दर्शनासाठी एकत्रित दर्शनरांगेच्या नियोजनासाठी तसेच रथ पालखी मिरवणुकीचे गर्दीचे नियोजनासाठी दक्षिणकडील बाजूस अतिरिक्त जागा उपलब्ध करणेसाठी क्षेत्र आरक्षित करणेबाबत प्रस्तावित केलेले आहे.

शिर्डी नगरपंचायत,शिर्डीचे पूर्वीचे डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये साई मंदिर दक्षिण बाजूकडील द्वारकामाई रोड ९ मी.रुंदीचा होता. त्याऐवजी प्रारुप विकास आराखडयात सदरचा रोड १२ मी.इतका दर्शविलेला आहे.

**ब)** श्री.अमृतराव मुरलीधर गोंदकर व इतर ३ तसेच श्रीमती रुंजाबाई भाऊसाहेब शेळके यांनी इकडेस दि.०२/०६/२०१८ रोजी उपरोक्त प्रादेशिक विकास योजना (सुधारीत) मध्ये दर्शविलेले आरक्षण क्रं.५६ कॅम्पिंग ग्राऊंडच्या संदर्भात सर्वे नं.१६४/१९,१६८ पैकी चे जमीन मालकांनी त्यांचे उक्त क्षेत्रावर दर्शविलेले कॅम्पिंग ग्राऊंडचे आरक्षण रद्द करणेत यावे यासाठी अर्ज सादर केलेले आहेत.

यापूर्वी शिर्डी विकास योजनेत आरक्षण क्रं.४८ प्रमाणे सदर सर्वे नंबर पैकीचे क्षेत्र कॅम्पिंग ग्राऊंडसाठी आरक्षित केलेले होते व त्यात विकसन यंत्रणा नगरपंचायत ही दर्शविलेली होती. मात्र प्रारुप विकास आराखडयात नगरपंचायतने आरक्षण क्रं.५६ प्रमाणे सदर सर्वे नंबर कॅम्पिंग ग्राऊंडसाठी पुन:श्च आरक्षित दर्शविलेले आहेत आणि विकसन यंत्रणा नगरपंचायत,शिर्डी व श्री साईबाबा संस्थान असे संयुक्तपणे दर्शविलेले आहे.

**क**) सौ.सुशिला दिलीपराव गोंदकर व इतर ३ यांनी उपरोक्त आरक्षण क्रं.४२ शैक्षणिक संकुलाचे आरक्षण रद्द करणेत यावे यासाठी दि.०२/०६/२०१८ रोजीचा अर्ज इकडेस सादर केलेले आहे.

उपरोक्त परिशिष्ट ब मधील अ.नं.१० मध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी शहरातील किमान दोन ठिकाणी प्रत्येकी २ हेक्टर क्षेत्र आरक्षित करणेबाबत प्रस्तावित केलेले आहे.

याबाबत विचार विनिमय होवून निर्णय होणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेत सादर करणेत आला. त्यावर निर्णय क्रं.४५२ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

उपरोक्त प्रस्तावावर खालीलप्रमाणे सविस्तर चर्चा झाली.

समाधी मंदिराचे दक्षिण बाजूकडील रस्ता साईभक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून गुरुस्थान,द्वारकामाई,समाधी मंदिर व चावडी

या मंदिरांचे सुलभ दर्शनासाठी एकत्रित दर्शन रांगेच्या नियोजनासाठी तसेच रथ पालखी मिरवणुकीचे गर्दीचे नियोजनासाठी सदरच्या रस्त्याला अतिरिक्त जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. कॅम्पिंग ग्राऊंडचे आरक्षण हे सर्वे नं.१६४ पै.,१६८ पै. चे क्षेत्र १.५६ हेक्टर यावर दर्शविलेले आहे. सदरचे क्षेत्र हे संस्थानचे साई प्रसादालयाच्या दक्षिण बाजूस समोर व लगत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी संस्थानसाठी कॅम्पिंग ग्राऊंडसाठी जागा आरक्षित ठेवणे आवश्यक आहे. तसेच सदर जागेत शताब्दी कालावधीमध्ये श्री साईसच्चरित्र महापारायण करण्याचे प्रस्तावित आहे. सदरची जागा संस्थानला नेहमीच उपयुक्त ठरणार आहे. यास्तव कॅम्पिंग ग्राऊंडचे आरक्षण रद्द करणे उचित होणार नाही.

सध्यस्थितीत संस्थान मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे येथे गट नं.१८३ मध्ये शैक्षणिक संकुल उभारणे प्रस्तावित केलेले आहे. त्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) विभाग समाविष्ट केलेला नाही. सध्यस्थितीत औद्योगिक प्रशिक्षण संस्था मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१०९ मध्ये साईबाबा भक्तनिवासस्थान व साईआश्रम-१ यांचे लगत कार्यान्वित असून सदरचा परिसर भक्तांच्या सोयी-सुविधांसाठी व रहिवास कारणासाठी वापरण्यात यावा असेबाबतचा समजुतीचा करारनामा(M.O.U.) झालेला आहे. त्यामुळे सध्यस्थितीत औद्योगिक प्रशिक्षण संस्था असलेल्या जागेत भक्तनिवासस्थानांचा विस्तार करणे आवश्यक आहे. यास्तव औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी सदर शैक्षणिक संकुलासाठी आरक्षित असलेले सर्वे नं.५९ पै.चे क्षेत्राची संस्थानला भविष्यात आवश्यकता भासणार आहे. यास्तव सदरचे आरक्षण क्रं.४२ हे रद्द करणे उचित होणार नाही. सबब उपरोक्त प्रस्ताव स्थगित ठेवणेत आला. याबाबत सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेत सादर करणेत यावा आणि संबंधीतांना चर्चेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर उपस्थित राहणेस सांगण्यात यावे,असे ठरले.

विभागाचा अभिप्राय– अ) श्री साई मंदिराचे दक्षिण बाजूकडील द्वारकामाई रोड हा अत्यंत अरुंद आहे. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून गुरुस्थान,द्वारकामाई, समाधी मंदिर व चावडी या मंदिरांचे सुलभ दर्शनासाठी एकत्रित दर्शनरांगेच्या नियोजनासाठी तसेच रथ पालखी मिरवणुकीचे गर्दीचे नियोजनासाठी सदरच्या रस्त्याला अतिरिक्त जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. सध्यस्थितीत साईभक्तांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून संस्थानने लोखंडी बॅरिकेटींग केलेले आहे. साईभक्तांची सदर रस्त्यावर मोठया प्रमाणावर गर्दी असते. भविष्यात उत्सव काळात चेंगराचेंगरीसारखी आपत्कालीन परिस्थिती उदभवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी सदर रस्त्याचे बाजूस अतिरिक्त जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचे आरक्षण रद्द करणे उचित होणार नाही.

ब) आरक्षण क्रं.५६ मध्ये दर्शविलेल्या कॅम्पिंग ग्राऊंडची जागा सर्वे नं.१६४ पै. व १६८ पै. क्षेत्र १.५६ हेक्टर इतके प्रस्तावित केलेले असून सदरचे क्षेत्र हे संस्थानचे साईप्रसादालयाच्या दक्षिण बाजूस व लगत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी संस्थानसाठी कॅम्पिंग ग्राऊंडसाठी जागा राखीव ठेवणे अत्यावश्यक आहे. तसेच सदर जागेत शताब्दी कालावधीमध्ये श्रीसाई सच्चरित्र महापारायण करण्याचे प्रस्तावित आहे. त्यामुळे सदरची जागा संस्थानला नेहमीच उपयुक्त ठरणार आहे. यास्तव कॅम्पिंग ग्राऊंडचे आरक्षण रद्द करणे उचित होणार नाही.

क) सध्यस्थितीत संस्थानने संस्थान मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे येथे गट नं.१८३ मध्ये शैक्षणिक संकुल उभारणे प्रस्तावित केलेले आहे. त्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) विभाग समाविष्ट केलेला नाही. सध्यस्थितीत औद्योगिक प्रशिक्षण संस्था मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१०९ मध्ये साईबाबा भक्तनिवासस्थान व साईआश्रम-१ यांचे लगत कार्यान्वित असून सदरचा परिसर भक्तांच्या सोयी-सुविधांसाठी व रहिवास कारणासाठी वापरण्यात यावा असेबाबतचा समजुतीचा करारनामा (M.O.U.) झालेला आहे. त्यामुळे सध्यस्थितीत औद्योगिक प्रशिक्षण संस्था असलेल्या जागेत भक्तनिवासस्थानांचा विस्तार करणे आवश्यक आहे. यास्तव औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी सदर शैक्षणिक संकुलासाठी आरक्षित असलेले सर्वे नं.५९ पै.चे क्षेत्राची संस्थानला भविष्यात आवश्यकता भासणार आहे. यास्तव सदरचे आरक्षण क्रं.४२ हे रद्द करणे उचित होणार नाही.

प्रस्ताव – अ) अर्जदार सौ.उज्वला दिलीपचंद संकलेचा व इतर १७ यांनी समाधी मंदिराचे दक्षिण बाजूकडील रस्त्याची रुंदी १२ मीटर ऐवजी ९ मीटर करणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि सुरक्षेच्या दृष्टिकोनातून गुरुस्थान,द्वारकामाई,समाधी मंदिर व चावडी या मंदिरांचे सुलभ दर्शनासाठी एकत्रित दर्शनरांगेच्या नियोजनासाठी तसेच रथ पालखी मिरवणुकीचे गर्दीचे नियोजनासाठी सदरच्या रस्त्याला अतिरिक्त जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. यावर विचारविनिमय होवून निर्णय होणेस विनंती.

ब) श्री.अमृतराव मुरलीधर गोंदकर, श्रीमती रुंजाबाई भाऊसाहेब शेळके व इतर यांनी कॅम्पिंग ग्राउंडचे आरक्षण रद्द करणेबाबत विनंती केलेली आहे. सदरचे आरक्षण हे सर्वे नं.१६४ पै.१६८ पै. चे क्षेत्र १.५६ हेक्टर यावर दर्शविलेले आहे. सदरचे क्षेत्र हे संस्थानचे साईप्रसादालयाच्या दक्षिण बाजूस समोर व लगत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी संस्थानसाठी कॅम्पिंग ग्राऊंडसाठी जागा आरक्षित ठेवणे आवश्यक आहे. तसेच सदर जागेत शताब्दी कालावधीमध्ये श्री साईसच्चरित्र महापारायण करण्याचे प्रस्तावित आहे. सदरची जागा संस्थानला नेहमीच उपयुक्त ठरणार आहे. यास्तव कॅम्पिंग ग्राऊंडचे आरक्षण रद्द करणे उचित होणार नाही. यावर विचारविनिमय होवून निर्णय होणेस विनंती.

क) सौ.सुशिला दिलीपराव गोंदकर व इतर ३ यांनी प्रारुप विकास आराखडयात समाविष्ट केलेले शैक्षणिक संकुलासाठीचे आरक्षण रद्द करणेबाबत विनंती केलेली आहे. सध्यस्थितीत संस्थानने संस्थान मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे येथे गट नं.१८३ मध्ये शैक्षणिक संकुल उभारणे प्रस्तावित केलेले आहे. त्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) विभाग समाविष्ट केलेला नाही.

सध्यस्थितीत औद्योगिक प्रशिक्षण संस्था मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१०९ मध्ये साईबाबा भक्तनिवासस्थान व साईआश्रम-१ यांचे लगत कार्यान्वित असून सदरचा परिसर भक्तांच्या सोयी-सुविधांसाठी व रहिवास कारणासाठी वापरण्यात यावा असेबाबतचा समजुतीचा करारनामा (M.O.U.) झालेला आहे. त्यामुळे सध्यस्थितीत औद्योगिक प्रशिक्षण संस्था असलेल्या जागेत भक्तनिवासस्थानांचा विस्तार करणे आवश्यक आहे. यास्तव औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी सदर शैक्षणिक संकुलासाठी आरक्षित असलेले सर्वे नं.५९ पै.चे क्षेत्राची संस्थानला भविष्यात आवश्यकता भासणार आहे. यास्तव सदरचे आरक्षण क्रं.४२ हे रद्द करणे उचित होणार नाही.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४८२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील नमुद अ मध्ये श्री साई मंदिराचे दक्षिण बाजूकडील सध्याचा रस्ता ९ मीटर रुंदीचा आहे. 'श्रीं' ची पालखी व्दारकामाई मंदिरातुन निघत असल्याने पालखीस अडथळा निर्माण होत नाही. तसेच सन २००५ मध्ये संपादन करतांना ९ मीटर रस्त्यासाठी सर्व मालमत्ता धारकांनी संमती दिली होती. त्याप्रमाणे संपादन होऊन ९ मीटर पालखी रस्ता झालेला आहे. त्यामुळे आता पुन्हा १२ मीटरसाठी संपादन करणे योग्य होणार नाही. त्यामुळे नवीन ३ मीटर वाढीव जागेची आवश्यकता नाही, त्यामुळे सदर आरक्षण वगळण्याचा प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

**प्रस्तावातील नमुद ब मध्ये आरक्षण क्रं.५६ मध्ये दर्शविलेल्या कॅम्पिंग ग्राऊंडची जागा सर्वे नं.१६४ पै. व १६८ पै. क्षेत्र १.५६ हेक्टर इतके प्रस्तावित केलेले असून सदरचे कॅपींग ग्राऊंडच्या जागेची संस्थानला आवश्यकता नाही, त्यामुळे सदर आरक्षण वगळण्याचा प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

**प्रस्तावातील नमुद क मधील शैक्षणिक संकुलासाठी सध्यस्थितीत संस्थानने संस्थान मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे येथे गट नं.१८३ मध्ये शैक्षणिक संकुल उभारणे प्रस्तावित केलेले असल्याने शैक्षणिक संकुलासाठी आरक्षीत असलेले आरक्षण क्र.४२ शैक्षणिक संकुलासाठी आरक्षित असलेले सर्वे नं.५९ पै.चे क्षेत्राची संस्थानला भविष्यात आवश्यकता भासणार नाही, त्यामुळे सदर आरक्षण वगळण्याचा प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.** **(कार्यवाही- प्र.अधिक्षक,मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२३** **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु. ५,०९,९४७ /-मात्र अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद –**

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.** – १) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र.६९० (६) अन्वये रु.२०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

**प्रास्ताविक**– खालील संस्थान कर्मचा-यांची रु.२०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज.

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ. **संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये रेफर केले होते.** | | | | | | | |
| १ | सुभाष मल्हारी बंदावणे विभाग -ध्वनीक्षेपण हुद्दा - विद्युत पर्यवेक्षक | मुलाकरीता | Renal Failure | डॉ. जाधवर | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ४६६४६.०० | ४६६४६.०० | |
| २ | मोनिका सतिष चव्हाण विभाग -साईबाबा हॉस्पिटल हुद्दा- परिचारिका | वडिल | Viral encephalitis | डॉ. जाधवर | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ४२५०००.०० | ३८८१५६.०० | |
| ३ | राजेंद्र दत्तात्रय जोर्वेकर विभाग –साईबाबा हॉस्पिटल हुद्दा - फार्मासिस्ट | मुला | PTCA Pulmonry | डॉ. शिंदे | रुबी हॉल क्लिनिक, पुणे | ३२६६१.०० | ३२६६१.०० | |
| ४ | श्री.परसराम सोमाजी भालेराव विभाग-संरक्षण हुद्दा –पहारेकरी | पत्नी | Dengue NS 1 Reactive | डॉ.काटे | रुबी हॉल क्लीनीक, पुणे | २०४९४.०० | २०४९४.०० | |
| ५ | शकुंतला शंकर मोहिते विभाग –साईनाथ हॉस्पिटल हुद्दा- परिचारिका | आई | Ca Esophagus | डॉ.बो-हाडे | टाटा मेमोरीयल हॉस्पिटल | २१९९०.०० | २१९९०.०० | |
| | | | | **अ - एकूण रक्कम** | | ५४६७९१.०० | ५०९९४७.०० | |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.५०९९४७ /- इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत– नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही, असे मत आहे.

प्रस्ताव– उपरोक्त ५ कर्मचारी / कर्मचा-यांवर अवलंबित व्यक्ती यांचे वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.५,०९,९४७ /- मात्र अदा करण्यास मान्यता असावी.

**निर्णय क्र.४८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन- १९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे, उपरोक्त तक्त्यामधील ५ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.५,०९,९४७/ मात्र त्यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.** **(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

**विषय नं. २४** **श्री साईबाबा शताब्दी कॅन्सर हॉस्पिटलची उभारणी करणेसाठी जागा निश्चीत करणेबाबत, कॅन्सर हॉस्पिटलसाठी जागा तसेच इमारतीचे बांधकाम सुध्दा संस्थानने करुन त्यानंतर तज्ञ मनुष्यबळ, डॉक्टर्स व वैद्यकीय उपकरणे व औषधी या सर्व बाबींसह कॅन्सर हॉस्पिटल टाटा ट्रस्ट, मुंबई यांना अटी व शर्तीनुसार आऊटसोर्स पध्दतीने चालविण्यास देणेबाबत.**

**प्रस्ताव-** रुग्णसेवा हिच ईश्वरसेवा या श्री साईबांबाचे शिकवणीतुनच श्री साईबाबा संस्थानने श्री साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल रुग्णसेवेकरीता चालु केलेले आहे. हजारो रुग्ण या रुग्णसेवेचा दरवर्षी लाभ घेत आहे. गरीब व गरजु रुग्णांना याचा फायदा होत आहे.

१. दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७१ विवेकानंद हॉस्पिटल नागपुर यांनी कॅन्सर रुग्णांसाठी कमी खर्चात सुसज्ज हॉस्पिटलची उभारणी केली आहे त्यांचे मार्गदर्शनानुसार श्रीचे समाधी शताब्दी वर्षानिमीत्ताने शिर्डी येथे कॅन्सर पिडीत रुग्णांसाठी श्री साईबाबा शताब्दी कॅन्सर रुग्णालय करणेचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेत सादर करणेत यावा अशा सुचना दिलेल्या होत्या त्या अनुषंगाने प्रस्ताव सादर करणेत आला.

२. दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.५२९ नुसार कॅन्सर हॉस्पिटल उभारणी करणेबाबत विषयावर सविस्तर चर्चा होवुन श्रींचे समाधी शताब्दी निमीत्ताने शिर्डी येथे कॅन्सर पिडीत रुग्णांसाठी श्री साईबाबा संस्थान मार्फत १०० बेडच्या श्री साईबाबा शताब्दी कॅन्सर हॉस्पिटल उभारणी कामी जागेची निश्चिती करणे, उपलब्ध असलेल्या जागेचा प्रस्ताव सादर करणेत यावा, सदरहु कॅन्सर हॉस्पिटल संस्थान निधीतुन उभारणेत यावा तसेच याकामी टाटा,ट्रस्ट मुंबई या स्वय सेवी संस्थेचे सहकार्य घेणेत यावे व कॅन्सर हॉस्पिटलचे व्यवस्थापन ,सर्व मशिनरी /मनुष्यबळासह टाटा ट्रस्ट मुंबई यांना देईल का ? याबाबतचा अभ्यासपुर्वक प्रस्ताव पुढील सभेत सादर करावा असा निर्णय झाला.

३. दि.०७/०८/२०१७ रोजी टाटा ट्रस्ट, मुंबई या स्वय सेवी संस्थेकडुन सदरचे हॉस्पिटलसाठी एमओयु (MOU) पाठविणेत आला होता.

४. दि.२५/११/२०१७ चे टिपणी अन्वये टाटा ट्रस्ट , मुंबई व श्री साईबाबा संस्थान यांचे संयुक्त विद्यमाने श्री साईबाबा शताब्दी कॅन्सर हॉस्पिटलची उभारणी करणेकामी एमओयु (MOU) बाबत विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ ठेवणेसाठी मान्यतेसाठी पाठविले असता तत्कालीन प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहे.

१. डीपीआर प्रमाणे एकुण प्रस्तावित बेड किती ?ओटी कीती ?.

२. दोन ठिकाणांपैकी प्रस्तावित आहेत त्यापैकी एक ठिकाण निश्चित करणेसाठी प्रस्ताव आवश्यक जागा किती ?याचा उल्लेख टिपणीत विषयात असावा

५. दि.२५/११/२०१७ रोजी प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी यांनी एमओयु (MOU) ड्राफट मा.अध्यक्ष ,उपाध्यक्ष व सर्व विश्वस्त यांना ई मेल दवारे पाठवुन याबाबत त्यांच्या काही सुचना किंवा बदल असल्यास व अभिप्राय घ्यावेत अशा सुचना केल्या होत्या त्यानुसार संबंधीतांना सदर (MOU) ड्राफट सर्वांना पाठविलेला आहे परंतु त्यांचेकडुन अजुन अभिप्राय आलेला नाही. तसेच विधी विभाग यांचे कडे (MOU) ड्राफट तपासणीसाठी पाठविलेला आहे.

६. दि.०२/०२/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे विषय नं -२५ निर्णय क्र.९९ अन्वये शेती महामंडळाची जागा खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीने मान्य करुन शासन परवानगीसाठी पाठविणेत आला आहे. परंतु मौजे रुई ता.राहाता जि.अहमदनगर येथील जमीन गट नं.२८८ /अ,२८८/ब,,२८८/क ब गट नं-२९४ पै.एकुण क्षेत्र १०.२३ हेक्टर हे यलो झोनमध्ये असुन तेथील संस्थान मालकीची जमीनी लगत आहे व शेती महामंडळाकडुन खरेदी करावयाच्या शेती पेक्षा कमी दराने मिळत आहे तसेच संस्थानने प्रस्तावित जमील खरेदी केल्यास राधा कालीधनदास दर्यानानी चॅरीटेबल ट्रस्ट यांची या व्यतीरीक्त तेथे असलेली उर्वरीत जमीन संस्थानला विनामुल्य दान देण्याची शक्यता आहे. याकरीता सदरहु क्षेत्र शासनाचे मान्यतेने कायम खरेदी करुन घेण्यात यावे त्यासाठी दि.२४/०९/२०११रोजीचे सभेतील निर्णय क्र.७५९ ची अंमलबजावणी प्रस्ताव सादर करणेत यावा असे ठरले.

७. मा.व्यवस्थापन समितीचे आयत्या वेळेचे विषय नं -१९ निर्णय क्र.४०९ अन्वये मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१५ नुसार मौजे रुई ता.राहाता येथील राधा कालियनदास दर्यानानी चॅरीटेबल ट्रस्ट मुंबई यांचेकडुन दानपत्रादवारे प्राप्त झालेल्या गट नं-२९३ मधील क्षेत्र ७ हेक्टर ३२ आर या जागेमध्ये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये तसेच प्रस्तावीत कॅन्सर हॉस्पिटलसाठी

एकत्रित वैद्यकीय संकुल उभारण्यासाठी आर्किटेक्टची नियुक्ती करणेबाबत निवीदा प्रक्रिया सुरु करणेत यावी असे ठरले.

८. टाटा ट्रस्ट यांनी सर्वेक्षण करुन सर्वेक्षण अहवाल सादर केला आहे त्यानुसार दिलेल्या डीपीआर नुसार १०० बेडचे कॅन्सर रुग्णालय उभारणी करणेकामी खालील बाबी आवश्यक आहे.

अ) सदर हॉस्पिटलसाठी कमीत कमी ०५ एकर जागा आवश्यक आहे व हॉस्पिटलसाठी १,६५,५११ स्क्वेअर फुट बांधकाम आवश्यक आहे यासाठी अंदाजे रु ४,५००/- प्रति स्क्वेअर फुट प्रमाणे खर्च येईल असे अहवालात नमुद केलेले आहे.

आ) सदर हॉस्पिटलसाठी १०० बेड आवश्यक आहे त्यात वार्डसकरीता ८४ बेड,आयसीयु मध्ये १२, बीएमटी-०२ रेडिओक्टिव्ह आयोडीन-०२ असे बेड आवश्यक आहे.

इ) एकुण ०४ ऑपरेशन थिएटर प्रस्तावित असुन यात मेजर ओटी -०३ व मायनर ओटी -०१ दर्शवली आहे तसेच स्वतंत्र दोन रेडिअेशन ऑन्कोलॉजी युनिट असतील.

ई) अहवालानुसार कॅन्सर रुग्णालयासाठी एकुण ४७१ पदे आवश्यक आहेत त्यापैकी तज्ञ डॉक्टर्स व आरएमओ ४३ पदे पॅरामेडिकल व इतर ४२८ पदे आवश्यक आहे.

उ) रुग्णालय उभारणीसाठी लागणारे आवश्यक खर्चाबाबत .

सदर रुग्णालयाचे बांधकामासाठी एकुण स्क्वेअर फुट १,६५,५११ x प्रति स्क्वेअर फुट रु-४,५००/- प्रमाणे = रु ७४,४७,९९,५००/- (चौरेहत्तर कोटी, सत्तेचाळीस लाख नव्यानो हजार पाचशे) अंदाजे इतका खर्च येईल.मेडिकल उपकरणे व फर्निचरसाठी अंदाजे खर्च रु-५६,५७,००,०००/- (छपन्न कोटी सत्तावन्न लाख ) नॉन मेडिकल फर्निचरसाठी अंदाजे खर्च रु -२,८५,५५,०००/- ( दोन कोटी पंच्चाशी लाख पंचावन्न हजार) सदर रुग्णालयासाठी एकुण रु-१३३,९०,५४,५००/-( एकशे तैहतीस कोटी नव्वद लाख चौपन्न हजार पाचशे) सदरचा खर्च श्री साईबाबा संस्थान करणार आहे कि टाटा ट्रस्ट करणार आहे याबाबत निर्णय होणे गरजेचे आहे.

**विभागाचा अभिप्राय-**

**१. नियोजीत कॅन्सर रुग्णालय उभारणेकामी जागा निश्चित करावी लागेल.**

मा.व्यवस्थापन समितीचे विषय नं -१९ निर्णय क्र.४०९ अन्वये मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१५ नुसार मौजे रुई ता.राहाता येथील राधा कालियनदास दर्यानानी चॅरीटेबल ट्रस्ट मुंबई यांचेकडुन दानपत्रादवारे प्राप्त झालेल्या गट नं-२९३ मधील क्षेत्र ७ हेक्टर ३२ आर या जागेमध्ये श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालये तसेच प्रस्तावीत कॅन्सर हॉस्पिटलसाठी एकत्रित वैद्यकीय संकुल उभारण्यासाठी आर्किटेक्टची नियुक्ती करणेबाबत निवीदा प्रक्रिया सुरु करणेत यावी असे ठरले त्यानुसार सदर जागेपैकी ०५ एकर जागा सदर कॅन्सर रुग्णालयासाठी निश्चित करावी असे मत आहे.

२. श्री साईबाबा संस्थान सध्या श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पिटलअसे दोन हॉस्पिटल चालु आहे. येथे डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत इतर तज्ञ मनुष्यबळाची सुदधा कमतरता भासते तसेच वैद्यकीय उपकरणे औषधी यांच्या खरेदीसाठी मोठा कालावधी लागतो व त्यामुळे वारंवार रुग्ण तसेच संबंधीत कर्मचारी यांना समस्याना सामोरे जावे लागते. एकंदरीत दोन्ही रुग्णालय चालविणे व्यवस्थापनाचे दृष्टीने जिकरीचे आहे ही वस्तुस्थिती विचारात घेता कॅन्सर हॉस्पिटलसाठी जागा श्री साईबाबा संस्थानने द्यावी तसेच इमारतीचे बांधकाम सुदधा संस्थानने करावे व त्यानंतर डॉक्टर्स , तज्ञ मनुष्यबळ, , वैद्यकीय उपकरणे व औषधी या सर्व बाबींसह कॅन्सर हॉस्पिटल टाटा ट्रस्ट, मुंबई यांना अटी व शर्तीनुसार आऊटसोर्स पदधतीने चालविण्यास देणे योग्य राहील असे मत आहे कॅन्सर हॉस्पिटल चे व्यवस्थापन कशा पदधतीने करावे याबाबत श्री साईबाबा संस्थानची भुमिका निश्चित झालेनंतर त्या अनुषंगाने सामंजस्य करार (MOU) करणे योग्य राहील असे मत आहे.

प्रस्ताव -

१. सदर नमुद केलेल्या जागेपैकी ०५ एकर जागा कॅन्सर हॉस्पिटलसाठी निश्चित करणेबाबत.

२. कॅन्सर हॉस्पिटलसाठी जागा श्री साईबाबा संस्थानने द्यावी तसेच इमारतीचे बांधकाम सुदधा संस्थानने करावे व त्यानंतर तज्ञ मनुष्यबळ, डॉक्टर्स वैद्यकीय उपकरणे व औषधी या सर्व बाबींसह कॅन्सर हॉस्पिटल टाटा ट्रस्ट, मुंबई यांना अटी व शर्तीनुसार आऊटसोर्स पदधतीने चालविण्यास द्यावे.

तरी याबाबत चर्चा होवुन निर्णय होणेसाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४८४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा शताब्दी कॅन्सर हॉस्पिटलची उभारणी करणेकामी मान्यतेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा, तसेच मौजे रुई, ता.राहाता येथील राधा कालियनदास दर्यानानी चॅरीटेबल ट्रस्ट मुंबई यांचेकडुन दानपत्रादवारे प्राप्त झालेल्या गट नं-२९३ मधील क्षेत्र ७ हेक्टर ३२ आर या जागेपैकी ०५**

**एकर जागा सदर कॅन्सर रुग्णालयासाठी निश्चित करणेत यावी, टाटा ट्रस्ट, मुंबई हे २५ कोटी पर्यंत खर्च करण्यास तयार असल्याने कॅन्सर हॉस्पिटलची इमारत संस्थानमार्फत बांधुन देण्यात यावी. हॉस्पिटलसाठी आवश्यक असणारी सर्व मशिनरी, मनुष्यबळ व तांत्रिक बाबी टाटा ट्रस्ट, मुंबई यांनी पुरवाव्यात. शासनाच्या मान्यतेनंतर सामंजस्य करारनाम्याचा मसुदा तयार करुन तो समितीसमोर सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

**विषय नं. २५** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवसथा,शिर्डी यांचेमार्फत (M.B.B.S.) वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणेस व त्यासाठीच्या अनुषंगिक खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद - कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

मा.व्यवस्थापन समिती ठराव क्र.- नवीन प्रस्ताव.

प्रास्ताविक –समाजातील तळागाळातील गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळावी या उदेशाने श्री साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन १९६४ साली श्री साईनाथ रुग्णालय सुरु करण्यात आलेले आहे. सदर रुग्णालयात एकुण ३०० बेड अंर्तरुग्ण विभागात कार्यरत आहेत. या रुग्णालयात रुग्णांच्या सेवेसाठी उत्तम पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. येथे येणा-या प्रत्येक रुग्णास मोफत उपचार पुरविले जात असल्यामुळे गरीब व गरजू रुग्णांसाठी श्री साईनाथ रुग्णालय हे ५३ वर्षांपासून मोठे वरदान ठरले आहे. श्री साईनाथ रुग्णालयात सध्या ॲलोपॅथी, होमिओपॅथी व आयुर्वेदिक असे विविध उपचार पध्दतीने रुग्णांना उपचार घेण्याची सुविधा उपलब्ध आहे.

तसेच श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा सुपरस्पेशालिटी रुग्णालय (२५० बेड) हे देखील सन २००६ पासून कार्यरत आहे. सदर श्री साईबाबा रुग्णालयात कार्डीओलॉजी, कार्डीयाक सर्जरी, न्युरोसर्जरी हे विभाग कार्यरत आहेत.

श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयातील ओपीडी, आयपीडी व शस्त्रक्रिया/प्रोसिजर्स यांची माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | श्री साईनाथ रुग्णालय सन २०१७ | श्री साईबाबा रुग्णालय सन २०१७ |
|---|---|---|
| ओपीडी | ३,१४,८१२ | १,६२,९२७ |
| आयपीडी | १३,५६० | १२९५८ |
| शस्त्रक्रिया / प्रोसिजर्स | ९,१८६ | १०,०६४ |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीचे मा.उपाध्यक्ष श्री चंद्रशेखर कदम यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविलेल्या दि.२७/०६/२०१८ रोजीचे पत्रात " सध्या संस्थानची श्री साईबाबा व श्री साईनाथ अशी दोन रुग्णालये कार्यरत आहेत. यात अनेक डॉक्टर्स व पॅरामेडीकल स्टाफ कार्यरत आहे. परंतु अनेक विभागात डॉक्टर व पॅरामेडीकल स्टाफची कमतरता आहे. त्याकरिता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थामार्फत विविध वैद्यकीय महाविद्यालये व अनुषंगिक इतर शैक्षणिक उपक्रम सुरु केल्यास रुग्णांना सेवा देण्यास मदत होईल. संस्थानची स्वतःची महाविद्यालये सुरु झा ाल्यास महाविद्यालयात शिकणा-या विद्यार्थ्यांचा संस्थानच्या हॉस्पिटलमधील रुग्णांकरिता याचा लाभ होईल व साईबाबांचा रुग्णसेवेचा संदेश जगभर पोहोचणेस मदत होईल", असे कळविलेले आहे. सदर पत्रावर मा.उपजिल्हाधिकारी निकम सा ो. यांनी त्वरीत प्रस्ताव सादर करा, असे निर्देश दिलेले आहेत.

संस्थानचे रुग्णालयात गरीब व गरजू रुग्णांना उपचारांचा व शस्त्रक्रियांचा वेळोवेळी लाभ व्हावा याकरिता संस्थान प्रशासन कायमच प्रयत्नशील आहे. उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयात असणारी बाहयरुग्णांची संख्या व अंर्तरुग्ण विभागात होणा-या शस्त्रक्रियांचा विचार करता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचेमार्फत वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणेचा निर्णय घेणेत आला. याअनुषंगाने पहिल्या टप्प्यात प्रतिवर्षी १०० विद्यार्थीसंख्या असणारे वैद्यकीय महाविद्यालय (M.B.B.S.) सुरु करता येईल.

सद्यस्थितीला अस्तित्वात असणारे श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालये यांच्या आधारे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणेस मदत होईल.

**विभागाचा अभिप्राय**:- तरी श्री साईबाबा संस्थानमध्ये नव्याने वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणेकामी खालीलप्रमाणे गोष्टींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१). **आवश्यक जागा-** वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणेकामी लागणारी जागा भारतीय आर्युविज्ञान परिषद ,दिल्ली यांचे नियमाप्रमाणे एकुण किमान सलग २० एकर जागा उपलब्ध असणे आवश्यक आहे. मा.व्यवस्थापन समितीच्या ३०/०६/२०१८ रोजीचा विषय क्र.१ व निर्णय क्र. ४१५/१८ नूसार कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचेकडून मौजे रुई,,ता. राहाता येथील गट नं.२९३ मधील क्षेत्र ७ हेक्टर ३२ आर दानपत्राद्वारे संस्थानला प्राप्त झालेले आहे. तसेच श्री लखीचंद कचरदास भंडारी व इतर यांची मौजे रुई ता.राहाता येथील जमीन गट नं. २८८/अ, २८८/ब, २८८/क व गट २९४ पैकी एकुण क्षेत्र १०.३२ हेक्टर क्षेत्र यलो झा◌ोनमध्ये असून तेथील संस्थान मालकीच्या लगत आहे. सदरहु क्षेत्र संस्थानसाठी कायम खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे.

मौजे रुई, ता.राहाता येथील राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचेकडून दानपत्राद्वारे प्राप्त झालेल्या गट नं. २९३ मधील क्षेत्र ७ हेक्टर ३२ आर व श्री लखीचंद कचरदास भंडारी व इतर यांची मौजे रुई ता.राहाता येथील जमीन गट नं. २८८/अ, २८८/ब, २८८/क व गट २९४ पैकी एकुण क्षेत्र १०.३२ हेक्टर क्षेत्र या जागेमध्ये साईबाबा व साईनाथ रुग्णालय तसेच प्रस्तावित मेडीकल कॉलेज, नर्सिंग कॉलेज, कॅन्सर हॉस्पिटलकरिता एकत्रित वैद्यकीय संकुल उभारावे व तसेच त्यासाठी आर्किटेक्टची नियुक्ती करणेबाबत निविदा प्रक्रिया सुरु करणेत यावी असे ठरले.

याअनुषंगाने वैद्यकीय महाविद्यालयाची प्रशासकीय व शैक्षणिक कामाकरिता आवश्यक त्या इमारतीचे बांधकाम करता येईल.

२). **विविध मान्यता** – नव्याने वैद्यकीय महाविद्यालय (M.B.B.S.) सुरु करणेकामी आवश्यक त्या मान्यता

१.विधी व न्याय विभाग.

२.भारतीय आर्युविज्ञान परिषद , दिल्ली

३.महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

४.महाराष्ट्र शासन वैद्यकीय संचनालय, मुंबई

सदर परिषदांना प्रस्ताव सादर करुन योग्य त्या पुर्तता झा◌ालेस वैद्यकीय महाविद्यालय सुरु करता येईल.

३). **मनुष्यबळ-** मेडीकल काउन्सिल ऑफ इंडीया यांचे नियमाप्रमाणे नव्याने वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणेकामी आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध होणे गरजेचे आहे. (सोबत मेडीकल काउन्सिल ऑफ इंडीया च्या प्रमाणे मनुष्यबळाचा आकृतीबंध व नियमावली सादर केलेली आहे).सदर मनुष्यबळ व त्यासाठीच्या खर्चास विधी व न्याय विभागाची मान्यता आवश्यक राहील. अंदाजित ५०० तांत्रिक (डॉक्टर व पॅरामेडीकल) मनुष्यबळ संख्या अपेक्षित आहे.

४). **रुग्णालय-** M.B.B.S. प्रथम वर्ष १०० विद्यार्थी संख्येसाठी सुरु करणेकामी कमीत कमी ३०० बेड रुग्णालय उपलब्ध असणे आवश्यक आहे. तसेच द्वितीय व तृतीय वर्षासाठी एकुण ४७८ बेड उपलब्ध असणे आवश्यक आहे. सदर बेडसंख्या श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयात उपलब्ध आहे. (सद्यस्थितीला एकुण ५५० बेडसंख्या दोन्ही रुग्णालयात उपलब्ध आहे.

५).**होस्टेल सुविधा** – मुलांचे होस्टेल व मुलींचे होस्टेल एकुण १०० विद्यार्थ्यांच्या मुले व मुली यांचेकरिता स्वतंत्र निवास व्यवस्था उपलब्ध असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीला अशा पध्दतीची निवासव्यवस्था संस्थानकडे उपलब्ध नाही, परंतु नव्याने बांधकाम होणा-या नियोजित वैद्यकीय संकुलामध्ये अशा प्रकारच्या होस्टेलची स्वतंत्र व्यवस्था करता येईल.

६).**आर्थिक तरतुद** –

१. नवीन कोर्स चालू करणेकामी लागणारी अर्ज फी - (To be paid to MUHS, Nashik)- ४०,०००,००/- (४० लाख)
२. बॅंक गॅरंटी / सिक्युरीटी डिपॉझिट -५०,००,०००/- लाख (५० लाख)
३. विद्यापीठ संलग्नतेसाठी आवश्यक फी –३, ००,०००/- किंवा एकुण शैक्षणिक फीच्या १ % पैकी जी रक्कम जास्त असेल ती (प्रतिवर्षी ).
४. विद्यापीठ कायम संलग्नतेसाठी आवश्यक फी -६,००,०००/- (एकदाच)
५. मनुष्यबळासाठी -१०,००,०००/- (दहा कोटी) प्रथम वर्ष व वेळोवेळी यामध्ये ३० % वाढ अंदाजे .

६. होस्टेल मेंटेनन्स -२,०००,०००/- (दोन कोटी) (प्रतिवर्षी ) अंदाजे.
७. प्रशासन खर्च-८,००,०००,०० (आठ कोटी) - प्रतिवर्षी अंदाजे
८. बांधकाम (प्रशासकीय इमारत, कॉलेज इमारत, होस्टेल , स्टाफ क्वार्टर्स् इ.) साठी लागणारा खर्च बांधकाम

विभागाकडून निश्चित करणेत येईल. याकरिता रु.२०० कोटी अंदाजित खर्च व जमीन खरेदीसाठी रु.१५ कोटी खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे प्रथम महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभागाची वैद्यकीय महाविदयालयास व आकृतीबंधास मान्यता घ्यावी.त्यानंतर नव्याने महाविदयालय सुरु करण्यासाठी आवश्यक त्या उर्वरित मान्यता घेणेस व त्यासाठी आवश्यक शुल्क भरावे, असे मत आहे.

**प्रस्ताव : उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने पुढील मुद्दयांवर निर्णय होणेस विनंती.**

१) वैद्यकीय महाविदयालयासाठी जागा निश्चीती करणे.
२) वैद्यकीय महाविदयालय सुरु करणेसाठी शासनाची मान्यता मिळविण्यासाठी प्रथम विधी व न्याय विभागास प्रस्ताव सादर करणे.
३) विधी व न्याय विभागाची मान्यता मिळाल्यानंतर भारतीय आयुर्विज्ञान परिषद दिल्ली , महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विदयापीठ नाशिक, व वैद्यकीय संचालनालय,मुंबई यांचे कडे नवीन महाविदयालयासाठी अर्ज करणे व त्यासाठी आवश्यक विहित शुल्क भरणे.
४) नवीन महाविदयालय मंजुर झालेनंतर भारतीय आयुर्विज्ञानच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे आकृतीबंध निश्चीत करुन त्याप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणे.

संदर्भीय प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४८५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत (M.B.B.S.) वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणेसाठी संस्थानला मौजे रुई, ता.राहाता येथील राधा कालियनदास दर्यानानी चॅरीटेबल ट्रस्ट मुंबई यांचेकडुन दानपत्राद्वारे प्राप्त झालेल्या गट नं-२९३ मधील क्षेत्र ७ हेक्टर ३२ आर मधील जागा निश्चीत करणेत यावी**

**वैद्यकीय महाविदयालय सुरु करणेसाठी शासनाची मान्यता मिळविण्यासाठी प्रथम विधी व न्याय विभागास प्रस्ताव सादर करणेत यावा.**

**विधी व न्याय विभागाची मान्यता मिळाल्यानंतर भारतीय आयुर्विज्ञान परिषद दिल्ली , महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विदयापीठ नाशिक, व वैद्यकीय संचालनालय,मुंबई यांचे कडे नवीन महाविदयालयासाठी अर्ज करणेस व त्यासाठी आवश्यक विहित शुल्क भरणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-प्र.वैद्यकीय अधिक्षीका,श्री साईनाथ रुग्णालय/वैद्यकीय संचालक)**

---

विषय नं. २६ **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवसथा,शिर्डी यांचेमार्फत नव्याने नर्सिंग कॉलेज (B.Sc. Nursing) सुरु करणेस व त्यासाठीच्या अनुषंगिक खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद - कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

मा.व्यवस्थापन समिती ठराव क्र.- नवीन प्रस्ताव.

प्रास्ताविक –समाजातील तळागाळातील गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळावी या उदेशाने श्री साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन १९६४ साली श्री साईनाथ रुग्णालय सुरु करण्यात आलेले आहे. सदर रुग्णालयात एकुण ३०० बेड अंर्तरुग्ण विभागात कार्यरत आहेत. या रुग्णालयात रुग्णांच्या सेवेसाठी उत्तम पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. येथे येणा-या प्रत्येक रुग्णास मोफत उपचार पुरविले जात असल्यामुळे गरीब व गरजू रुग्णांसाठी श्री साईनाथ रुग्णालय हे ५३ वर्षांपासून मोठे वरदान ठरले आहे. श्री साईनाथ रुग्णालयात सध्या ॲलोपॅथी, होमिओपॅथी व आयुर्वेदिक असे विविध उपचार पध्दतीने रुग्णांना उपचार घेण्याची सुविधा उपलब्ध आहे.

तसेच श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा सुपरस्पेशालिटी रुग्णालय (२५० बेड) हे देखील सन २००६ पासून कार्यरत आहे. सदर श्री साईबाबा रुग्णालयात कार्डीओलॉजी, कार्डीयाक सर्जरी, न्युरोसर्जरी हे विभाग कार्यरत आहेत.

श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयातील ओपीडी, आयपीडी व शस्त्रक्रिया / प्रोसिजर्स यांची माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | श्री साईनाथ रुग्णालय<br>सन २०१७ | श्री साईबाबा रुग्णालय<br>सन २०१७ |
|---|---|---|
| ओपीडी | ३,१४,८१२ | १,६२,९२७ |
| आयपीडी | १३,५६० | १२९५८ |
| शस्त्रक्रिया / प्रोसिजर्स | ९,१८६ | १०,०६४ |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीचे मा.उपाध्यक्ष श्री चंद्रशेखर कदम यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविलेल्या दि.२७/०६/२०१८ रोजीचे पत्रात " सध्या संस्थानची श्री साईबाबा व श्री साईनाथ अशी दोन रुग्णालये कार्यरत आहेत. यात अनेक डॉक्टर्स व पॅरामेडीकल स्टाफ कार्यरत आहे. परंतु अनेक विभागात डॉक्टर व पॅरामेडीकल स्टाफची कमतरता आहे. त्याकरिता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थामार्फत विविध वैद्यकीय महाविद्यालये व अनुषंगिक इतर शैक्षणिक उपक्रम सुरु केल्यास रुग्णांना सेवा देण्यास मदत होईल. संस्थानची स्वतःची महाविद्यालये सुरु झाल्यास महाविद्यालयात शिकणा-या विद्यार्थ्यांचा संस्थानच्या हॉस्पिटलमधील रुग्णांकरिता याचा लाभ होईल व साईबाबांचा रुग्णसेवेचा संदेश जगभर पोहोचणेस मदत होईल", असे कळविलेले आहे. सदर पत्रावर मा.उपजिल्हाधिकारी निकम सा ो. यांनी त्वरीत प्रस्ताव सादर करा, असे निर्देश दिलेले आहेत.

संस्थानचे रुग्णालयात गरीब व गरजू रुग्णांना उपचारांचा व शस्त्रक्रियांचा वेळोवेळी लाभ व्हावा याकरिता संस्थान प्रशासन कायमच प्रयत्नशील आहे. उपरोक्तप्रमाणे श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयात असणारी बाहयरुग्णांची संख्या व अंतर्रुग्ण विभागात होणा-या शस्त्रक्रियांचा विचार करता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचेमार्फत नर्सिंग कॉलेज सुरु करणेचा निर्णय घेणेत आला. याअनुषंगाने पहिल्या टप्प्यात प्रतिवर्षी १०० विद्यार्थीसंख्या असणारे नर्सिंग कॉलेज सुरु करता येईल.

सद्यस्थितीला अस्तित्वात असणारे श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालये यांच्या आधारे नर्सिंग कॉलेज सुरु करता येईल.

विभागाचा अभिप्राय: तरी श्री साईबाबा संस्थानमध्ये नव्याने नर्सिंग कॉलेज सुरु करणेकामी खालीलप्रमाणे गोष्टींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१) आवश्यक जागा- नर्सिंग कॉलेज सुरु करणेकामी लागणारी जागा भारतीय आर्युविज्ञान परिषद , दिल्ली यांचे नियमाप्रमाणे सलग २ एकर जागा उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्याअनुषागंगाने मा.व्यवस्थापन समितीच्या ३०/०६/२०१८ रोजीचा विषय क्र.१ व निर्णय क्र. ४१५/१८ नूसार कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचेकडून मौजे रुई,,ता. राहाता येथील गट नं.२९३ मधील क्षेत्र ७ हेक्टर ३२ आर दानपत्राद्वारे संस्थानला प्राप्त झालेले आहे.

तसेच श्री लखीचंद कचरदास भंडारी व इतर यांची मौजे रुई ता.राहाता येथील जमीन गट नं. २८८/अ, २८८/ब, २८८/क व गट २९४ पैकी एकुण क्षेत्र १०.३२ हेक्टर क्षेत्र यलो झा ोनमध्ये असून तेथील संस्थान मालकीच्या लगत आहे. सदरहु क्षेत्र संस्थानसाठी कायम खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे.

मौजे रुई, ता.राहाता येथील राधा कालियनदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्ट, मुंबई यांचेकडून दानपत्राद्वारे प्राप्त झालेल्या गट नं. २९३ मधील क्षेत्र ७ हेक्टर ३२ आर व श्री लखीचंद कचरदास भंडारी व इतर यांची मौजे रुई ता.राहाता येथील जमीन गट नं. २८८/अ, २८८/ब, २८८/क व गट २९४ पैकी एकुण क्षेत्र १०.३२ हेक्टर क्षेत्र या जागेमध्ये साईबाबा व साईनाथ रुग्णालय तसेच प्रस्तावित मेडीकल कॉलेज, नर्सिंग कॉलेज, कॅन्सर हॉस्पिटलकरिता एकत्रित वैद्यकीय संकुल उभारावे व तसेच त्यासाठी आर्किटेक्टची नियुक्ती करणेबाबत निविदा प्रक्रिया सुरु करणेत यावी असे ठरले.

याअनुषंगाने वैद्यकीय महाविद्यालयाची प्रशासकीय व शैक्षणिक कामाकरिता आवश्यक त्या इमारतीचे बांधकाम करता येईल.

२). <u>विविध मान्यता</u> –नव्याने नर्सिंग कॉलेज सुरु करणेकामी आवश्यक त्या मान्यता

१.विधी व न्याय विभाग.

२.महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ ,नाशिक.

३.महाराष्ट्र शासन वैद्यकीय संचनालय, मुंबई

४.महाराष्ट्र परिचारिका परिषद, मुंबई व इंडियन नर्सिंग काऊन्सिल ,दिल्ली.

सदर परिषदांना प्रस्ताव सादर करुन योग्य त्या पुर्तता झालेस कॉलेज सुरु करता येईल.

३). मनुष्यबळ- इंडीयन नर्सिंग काउन्सिल (INC) यांचे नियमाप्रमाणे नव्याने नर्सिंग कॉलेज सुरु करणेकामी आवश्यक ते मनुष्यबळ उपलब्ध होणे गरजेचे आहे. (सोबत इंडियन नर्सिंग काऊन्सिल ॲक्ट,१९४७ च्या प्रमाणे मनुष्यबळाचा आकृतीबंध व नियमावली सादर केलेली आहे). सदर मनुष्यबळ व त्यासाठीच्या खर्चास विधी व न्याय विभागाची मान्यता आवश्यक राहील. अंदाजित २०० तांत्रिक (डॉक्टर व पॅरामेडीकल) मनुष्यबळ संख्या अपेक्षित आहे.

४). रुग्णालय- नर्सिंग कॉलेज सुरु करणेकामी कमीत कमी १०० बेड असणारे रुग्णालय उपलब्ध असणे आवश्यक आहे. सदर बेडसंख्या संस्थानच्या श्री साईनाथ व श्री साईबाबा रुग्णालयात उपलब्ध आहे.(सद्यस्थितीला एकुण ५५० बेडसंख्या दोन्ही रुग्णालयात उपलब्ध आहे. )

५). होस्टेल सुविधा – मुलांचे होस्टेल व मुलींचे होस्टेल - एकुण १०० विद्यार्थ्यांच्या मुले व मुली यांचेकरिता स्वतंत्र निवास व्यवस्था उपलब्ध असणे आवश्यक आहे. सद्यस्थितीला अशा पध्दतीची निवासव्यवस्था संस्थानकडे उपलब्ध नाही, परंतु नव्याने बांधकाम होणा-या नियोजित वैद्यकीय संकुलामध्ये अशा प्रकारच्या होस्टेलची स्वतंत्र व्यवस्था करता येईल.

६). आर्थिक तरतुद –

१. नवीन कोर्स चालू करणेकामी लागणारी अर्ज फी- (To be paid to MUHS, Nashik)- १५,००,०००/-

२. बॅंक गॅरंटी / सिक्युरीटी डिपॉझिट -१०,००,०००/-

३. विद्यापीठ संलग्नतेसाठी आवश्यक फी –२, ००,०००/- किंवा एकुण शैक्षणिक फीच्या १ % पैकी जी रक्कम जास्त असेल ती (प्रतिवर्षी ).

४. विद्यापीठ कायम संलग्नतेसाठी आवश्यक फी -४,००,०००/- (एकदाच)

५. मनुष्यबळासाठी -२,००,०००,००/- प्रथम वर्ष व वेळोवेळी यामध्ये ३० % वाढ अंदाजे .

६. होस्टेल मेंटेनन्स -१,००,०००,००/- (प्रतिवर्षी ) अंदाजे.

७. प्रशासन खर्च-२,००,०००,००/- (प्रतिवर्षी) अंदाजे

८. बांधकाम (प्रशासकीय इमारत, कॉलेज इमारत, होस्टेल , स्टाफ क्वार्टर्स् इ.) साठी लागणारा खर्च बांधकाम विभागाकडून निश्चित करणेत येईल. याकरिता अंदाजे रु.१०० कोटी खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे प्रथम महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभागाची नर्सिंग कॉलेज व आकृतीबंधास मान्यता घ्यावी.त्यानंतर नव्याने महाविदयालय सुरु करण्यासाठी आवश्यक त्या उर्वरित मान्यता घेणेस व त्यासाठी आवश्यक शुल्क भरावे, असे मत आहे.

प्रस्ताव :उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने पुढील मुद्दयांवर निर्णय होणेस विनंती.

१) नर्सिंग कॉलेज साठी जागा निश्चीती करणे.

२) नर्सिंग कॉलेज सुरु करणेसाठी शासनाची मान्यता मिळविण्यासाठी प्रथम विधी व न्याय विभागास प्रस्ताव सादर करणे.

३) विधी व न्याय विभागाची मान्यता मिळाल्यानंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विदयापीठ नाशिक,व महाराष्ट्र शासन वैद्यकीय संचनालय, मुंबई महाराष्ट्र परिचारिका परिषद, मुंबई व इंडियन नर्सिंग काऊन्सिल,दिल्ली यांचे कडे नवीन महाविदयालयासाठी अर्ज करणे व त्यासाठी आवश्यक विहित शुल्क भरणे.

४) नवीन महाविदयालय मंजुर झालेनंतर इंडियन नर्सिंग काऊन्सिल,दिल्ली मार्गदर्शक सूचनांप्रमाणे आकृतीबंध निश्चीत करुन त्याप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करुन घेणे.

संदर्भीय प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४८६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत नर्सिंग कॉलेज सुरु करणेसाठी संस्थानला मौजे रुई, ता.राहाता येथील राधा कालियनदास दर्यानानी चॅरीटेबल ट्रस्ट मुंबई यांचेकडुन दानपत्रादवारे प्राप्त झालेल्या गट नं-२९३ मधील क्षेत्र ७ हेक्टर ३२ आर मधील जागा निश्चीत करणेत यावी. नर्सिंग कॉलेज सुरु करणेसाठी शासनाची मान्यता मिळविण्यासाठी प्रथम विधी व न्याय विभागास प्रस्ताव सादर करणेत यावा. विधी व न्याय विभागाची मान्यता मिळाल्यानंतर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विदयापीठ नाशिक,व महाराष्ट्र शासन वैद्यकीय**

**संचनालय, मुंबई महाराष्ट्र परिचारिका परिषद, मुंबई व इंडियन नर्सिंग काऊन्सिल,दिल्ली यांचे कडे नवीन महाविदयालयासाठी अर्ज करणेस व त्यासाठी आवश्यक विहित शुल्क भरणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्र.वैद्यकीय अधिक्षीका,श्री साईनाथ रुग्णालय /वैद्यकीय संचालक)**

---

**विषय नं. २७** **श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयात कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात ११ महिने कालावधीसाठी कार्यरत परिचारीका, परिचारक यांनी औघोगीक न्यायालय,अहमदनगर येथे संस्थान विरुध्द कोर्ट केस दाखल केलेबाबत अवलोकनार्थ सादर.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयात खालील परिचारक / परिचारीकांना ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने नेमणूका करणेत आलेल्या आहेत. सदर परिचारक/परिचारीका यांनी मा मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे खालीलप्रमाणे रिट पिटीशन दाखल केलेले आहेत.

| अ नं | परिचारक / परिचारीकांचे नाव | हजर तारीख | ११ महिने मुदवाढ संपुष्टात येत असल्याची तारीख | रिट पिटीशन क्र | मागणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | कु प्राजक्ता दिपक जाधव | १८/०४/२०१७ | १७/०३/२०१८ | ६४२१/२०१६ | A] Call for record and proceedings.<br>B] Issue a writ of mandamus or any other appropriate writ, order or direction thereby directing the Respondent to pay the salary and arrears for the post of Staff Nurse meeting dated 20.11.2014 by the Managing Committee of Respondent No.1 within a stipulated period and for that purpose issue necessary writ, order of direction.<br>C] Issue a writ of mandamus or any other appropriate writ, order or directions thereby directing the Respondents to consider and decide the representation dated 17.05.2015 given by the petitioner for payment of salary and arrears of salary for the post of Staff Nurse (Annexed at Exhibit-F) within a stipulated period and for that purpose issue necessary writ, order or directions.<br>D] pending hearing and final disposal of present writ petition, issue an injuction in the nature of directions thereby directing the Respondents to pay the salary to the petitioner in accordance with Decision No.1016 taken in meeting dated 20.11.2014 by the Managing Committee of Respondent No.1 and for that purpose issue necessary writ, order of directions.<br>E] Grant ad-interim relief in terms of prayer clause-(D)<br>F] Pass any and other just and equitable order in the interest of justice in favour of the petitioner. |
| २ | कु कविता योसेफ पंडीत | १७/०७/२०१७ | १६/०६/२०१८ | ६४२२/२०१६ | |
| ३ | श्रीमती रूथ जॉन लोंढे(श्रीवास्तव) | ०७/०५/२०१७ | ०६/०४/२०१८ | ६४२३/२०१६ | |
| ४ | कु प्रतिमा रामचंद्र कोळगे | १६/०२/२०१७ | १५/०१/२०१८ | ६४२४/२०१६ | |
| ५ | श्रीमती आशा दत्तात्रय कावळे | १४/०२/२०१७ | १३/०१/२०१८ | ६४२५/२०१६ | |
| ६ | श्रीमती वैशाली भगवान महागडे | १७/०१/२०१७ | १६/१२/२०१७ | ६४२६/२०१६ | |
| ७ | कु मनिषा स्टिफन आवारे | १५/०१/२०१७ | १४/१२/२०१७ | ६४२७/२०१६ | |
| ८ | श्री राहुल प्रकाश आहोळ | २५/०२/२०१७ | २४/०१/२०१८ | ६४२८/२०१६ | |
| ९ | श्रीमती कावेरी सुदाम म्हस्के | २७/०४/२०१७ | २६/०३/२०१८ | ६४२९/२०१६ | |
| १० | श्रीमती कांचन विनायक शिंदे | ------ | ------- | ६४३०/२०१६ | |
| ११ | श्री आशिष शरद सुर्यवंशी | २१/०१/२०१७ | २०/१२/२०१७ | ६४३१/२०१६ | |

उपरोक्त अ नं १० श्रीमती कांचन विनायक शिंदे ह्या कामावरून गैरहजर असल्याने त्यांना दि. १८/१/२०१७ नंतर पुन्हा नेमणूक आदेश दिलेला नाही.

उपरोक्त परिचारीकांचा ११ महिने नेमणूक कालावधी त्यांचे नावासमोर दर्शविलेप्रमाणे संपुष्टात येत असल्याने प्रस्ताव मा व्यवस्थापन समिती **दि. ०८/१२/२०१७** रोजीचे सभेत सादर करणेत आला होता. त्यावर **निर्णय क्र १०४९** नुसार, याकरीता व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मा. श्री चंद्रशेखर कदम यांचे अध्यक्षतेखाली समिती सदस्य मा. श्री भाऊसाहेब वाकचौरे व मा श्री प्रताप भोसले यांची समिती तयार करणेत आली. या समितीने प्रस्तावित परिचारक/ परिचारीकांना मुदतवाढ देणे योग्य होईल का, याची शहानिशा करून त्याचा अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा, असे ठरले.

दि. १६/०१/२०१८ रोजी मा उच्च न्यायालयाने उपरोक्त दाखल केलेल्या रिट पिटीशनमध्ये खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

P.C.:-

1. learned counsel for the petitioners, in view of subsequent developments / events taken place, on instructions, prays for withdrawal of the writ petitions. The writ petitions are dismissed as withdrawn.

दि. ०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र १०४९ नुसार, गठीत केलेल्या समितीकडून, व्यवस्थापन समितीसमोर सादर करावयाचा एकत्रित अहवाल व्यवस्थापन समितीसमोर सादर झालेला नसल्याने प्रस्तावातील नमुद परिचारक / परिचारीकांना बाह्ययंत्रणेद्वारे घेऊन प्रतिमहा रू. १५,४००/- एकत्रित वेतन देणेबाबतचा प्रस्ताव **दि. ०२/०२/२०१८** रोजीचे मा व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आला होता त्यावर **निर्णय क्र १२८** नुसार, प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

तदनंतर, मा व्यवस्थापन समिती **दि. ०७/०३/२०१८** रोजीचे सभेतील **निर्णय क्र १३९** नुसार, मा व्यवस्थापन समिती दि. ०२/०२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र १२८, यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

प्रस्तावित ११ परिचारक / परिचारीकांना सध्या रू.१५,४००/- मात्र प्रतिमहा एकत्रितवेतनावर बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक देण्यात यावी. त्याचबरोबर सदरहू परिचारक / परिचारीका यांना पुर्वीप्रमाणे ११ महिने कालावधीसाठी नेमणूक देणेकामी शासनाचे मार्गदर्शन घेण्यासाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.

तदनंतर, मा व्यवस्थापन समिती **दि. ०४/०४/२०१८** रोजीचे सभेतील **निर्णय क्र २२५** नुसार,श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ११-११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या ११ परिचारक / परिचारीका यांना दि. ०२/०२/२०१८ रोजीचे व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र १२८ अन्वये बाह्ययंत्रणेद्वारे नेमणूक देणेबाबत ठरलेले आहे. परंतु आता, ज्या शासन निर्णयाचे अनुषंगाने निर्णय क्र १२८ घेण्यात आला, त्या शासन निर्णयास स्थगिती मिळालेली आहे. त्यामुळे सदरहू परिचारक / परिचारीका यांना पुर्वीप्रमाणेच ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

सदर निर्णयानुसार, संबंधीत परिचारीका / परिचारक यांचेकडून बंधपत्र घेऊन नेमणूक आदेश दिलेले आहेत. उपरोक्तपैकी एक परिचारीका कु आशुमती संपत सदाफुले कामावर हजर झाले नसुन उर्वरीत सर्व १० परिचारक / परिचारीका कामावर हजर झालेल्या असुन सध्या रूग्णालयात कार्यरत आहेत.

उपरोक्त १० परिचारीका यांनी औद्योगिक न्यायालय,अहमदनगर येथे संस्थान विरूध्द तक्रार (युएलपी) क्र. ४१/२०१८ ते तक्रार (युएलपी) क्र. ५०/२०१८ अशा दहा कोर्ट केस दाखल केली आहे.

**सदर कोर्ट केसमध्ये त्यांनी खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.**

मा.न्यायालयास तक्रारदारातर्फे नम्र प्रार्थना की,

**अ)** जाब देणार यांनी तक्रादाराबाबत तक्रारीत नमुद केलेल्या अनुचीत कामगार प्रथांचा अवलंब केल्याचे जाहीर करुन त्या बेकायदेशीर अयोग्य असुन त्या रद्द करण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

**ब)** तक्रारदारास समान कामास समान मोबदला तत्वाने प्रथम नेमणूकीपासुन दिलेले वेतन व देय वेतन व फायदे फरकासहीत अदा करण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

**क)** तक्रारदारास प्रथम नेमणुकीपासुन किंवा २४० दिवस सेवेपासुन किंवा योग्य त्या काळापासुन परिचारीका म्हणून कायम करुन सर्व फायदे फरकासहीत अदा करण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

**ड)** तक्रारदारास सध्याचे नेमणुकपत्र देताना घेण्यात आलेला करार हा बेकायदेशीर असल्याचे जाहीर करावे.

**इ)** सोबतच्या अंतरीम आदेश अर्जातील बाबी कायम व्हाव्यात.

**ई)** इतर योग्य ते न्यायोचित आदेश तक्रारदाराच्या बाजुने व्हावेत.

**तसेच त्यांनी अंतरीम आदेशास्तव अर्ज सादर केला असुन त्यात त्यांनी खालीलप्रमाणे मागणी केलेली आहे.**

**अ)** तक्रारीच्या सुनावणीच्या काळात तक्रारदारास सेवेतून कमी न करण्याविषयक आदेश, सेवेत ठेवण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

**ब)** तक्रारदारास समान कामास समान मोबदला तत्वाने कायम परिचारिका प्रमाणे मुळ वेतन, ग्रेड पे आणि इतर वेतन देण्याचे आदेश जाब देणार यांना व्हावेत.

**क)** तक्रारीचे कामकाज तक्रारीचे स्वरुप पाहाता त्वरीत पुर्ण करण्याविषयक आदेश व्हावेत.

**ड)** इतर योग्य ते न्यायोचित आदेश तक्रारदाराच्या बाजुने व्हावेत.

**यावर मा. औद्योगिक न्यायालय, अ.नगर यांनी दि. १८/०६/२०१८ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.**

Perused the applications for dispensing with the notice Under Rule 115 and other papers. Heard Mr. Modgekar Advocate. The Complainants are stated to be in the employment for years and were services are likely to be terminated. Issue show cause notice returnable on 22-06-2018. Till then only the services of the complaints was not be terminated except by following due process of law.

तरी या सर्व १० केस सबंधीत संस्थानला कोर्ट नोटीस प्राप्त झालेली असुन या कोर्ट केसचे कामकाजाकरीता संस्थानचे वतीने ॲड अशोक पाटील, अहमदनगर यांची नेमणूक केलेली आहे. पुढील सुनावणीची तारीख दि. ०९/०७/२०१८ नेमण्यात आलेली आहे.

अवलोकनार्थ सादर.

निर्णय क्र.४८७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयात कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात ११ महिने कालावधीसाठी कार्यरत परिचारीका, परिचारक यांनी औघोगीक न्यायालय,अहमदनगर येथे संस्थान विरुध्द दाखल केलेल्या कोर्ट केस बाबतच्या सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

विषय नं. २८ **दि. १ एप्रिल,२०१७ ते दि.३१ मार्च,२०१८ अखेर कालावधीत दिलेले अनुदान रक्कम व रुग्ण संख्या यांची नोंद घेणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनिय २००४ मधील तरतुद :-** कलम १७ (१) व १७ (२) (ण ) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र:-** दि.२४/०७/२०११ रोजीची मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.१४, निर्णय क्र.५८१.

**प्रास्तविक:-** उपरोक्त विषयाकिंत संदर्भान्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी. यांचे मार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय,उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे वैद्यकीय आर्थिक अनुदान देण्यात येते. त्यासाठी संस्थान व्यवस्थापनाने स्वतंत्र नियमावली तयार केलेली आहे. यास शासनाची मान्यता आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत वैद्यकीय आर्थिक अनुदान हे केवळ, भारतातील सरकारी जिल्हा परिषद वा म्युनिसिपल रुग्णालय, सार्वजनिक धर्मदाय न्यासाने चालविलेले रुग्णालय, सार्वजनिक लिमिटेड कंपनी (Public Limited Company) यांनी चालविलेले अगर सहकारी संस्था (Co Operative Society) यांनी चालविलेले रुग्णालय यातील उपचार / शस्त्रक्रियेवरील खर्चा पोटी खर्चाच्या १५% अगर रुपये २५,०००/- पैकी जी कमी पुर्णाकिंत रक्कम असेल तेवढी रक्कम, पॅनलवरील ८३ रुग्णालयांना रुग्णाचे नावे नियमावलीतील आठ आजारांकरीता देण्यात येते. त्यास अनुसरुन सन दि.१ एप्रिल-२०१७ ते दि.३१ मार्च २०१८ अखेर कालावधीत दिलेले वैद्यकिय आर्थिक अनुदान लाभार्थी रुग्ण संख्या व रक्कम खालील प्रमाणे आहे.

| अं.नं. | महिना | लाभार्थी रुग्ण संख्या | अनुदान वाटपाची रक्कम | मंजुर बजेट |
|---|---|---|---|---|
| १ | ०१ एप्रिल -२०१७ | ४२ | १०,२४,०००/- | १५,००,००,०००/- |
| २ | मे -२०१७ | २२ | ०४,८४,०००/- | |
| ३ | जुन - २०१७ | २४ | ०५,६८,४५६/- | |
| ४ | जुलै -२०१७ | १८ | ०४,१७,५००/- | |
| ५ | ऑगस्ट -२०१७ | ४७ | ११,४७,८४६/- | |
| ६ | सप्टेंबर -२०१७ | ४१ | ०९,६७,५००/- | |
| ७ | ऑक्टोंबर -२०१७ | २७ | ०६,४९,५००/- | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | नोव्हेंबर -२०१७ | ३३ | ०८,१०,०००/- | |
| ९ | डिसेंबर -२०१७ | ३५ | ०८,३९,५००/- | |
| १० | जानेवारी -२०१८ | ४७ | १०,९५,०००/- | |
| ११ | फेब्रुवारी -२०१८ | ४० | ०९,८४,५००/- | |
| १२ | ३१ मार्च -२०१८ | ५४ | १२,९५,५००/- | |
| **एकुण** | | **४३०** | **१,०२,८३,३०२/-** | |

दि.१ एप्रिल-२०१७ ते दि.३१ मार्च २०१८ अखेर ४३० रुग्णाना रक्कम रु.१,०२,८३,३०२/- वैद्यकिय आर्थिक अनुदान देणेत आलेले आहे.

त्या बाबतचा रुग्णालयनिहाय तपशिल पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | रुग्णालयाचे नाव | रुग्ण संख्या | अनुदान रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| ०१) | आनंद ऋषीजी हार्टकेअर,अहमदनगर. | ०७ | १,७२,५००/- |
| ०२) | आनंद ऋषीजी हॉस्पीटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर , अहमदनगर. | ०१ | २२,५००/- |
| ०३) | आश्विनी सहकारी रुग्णालय आणि संशोधन केंद्र नियमित, सोलापुर. | ७७ | १९,२१,३०२/- |
| ०४) | बाई जेराबाई वाडिया हॉस्पीटल फॉर चिल्ड्रन, मुंबई. | ०२ | ५०,०००/- |
| ०५) | बालाजी हॉस्पीटल ॲण्ड डायग्नोस्टिक सेंटर, मुंबई. | ०५ | १,२५,०००/- |
| ०६) | बॉम्बे हॉस्पीटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर, मुंबई. | ०२ | ५०,०००/- |
| ०७) | कार्डिनल ग्रेसिएस मेमोरिअल ट्रस्ट , वसई. | १६ | ४,००,०००/- |
| ०८) | डिन बी वाय एल नायर चॅरिटेबल हॉस्पिटल, मुंबई. | १३ | ३,२५,०००/- |
| ०९) | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर, पुणे. | ०९ | २,२२,५००/- |
| १०) | डॉ.बालाभाई नानावटी हॉस्पिटल,मुंबई. | ०१ | २५,०००/- |
| ११) | डॉ.हेडगेवार रुग्णालय, औरंगाबाद. | ०१ | २५,०००/- |
| १२) | ग्रॅन्ट मेडिकल फौंडेशन रुबी हॉल क्लिनिक, पुणे. | ०५ | १,२५,०००/- |
| १३) | हॉली स्पिरीट हॉस्पिटल, मुंबई. | ०२ | ५०,०००/- |
| १४) | इनलॅक्स ॲन्ड बुधराणी हॉस्पिटल, पुणे. | ०४ | ९४,५००/- |
| १५) | जसलोक हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर, मुंबई . | १० | २,५०,०००/- |
| १६) | जहॉगीर हॉस्पिटल , पुणे. | ०७ | १,७५,०००/- |
| १७) | के एल ई एस हॉस्पिटल ॲन्ड मेडिकल रिसर्च सेंटर, बेळगांव, कर्नाटक. | ०२ | २८,७५०/- |
| १८) | कमलनयन बजाज हॉस्पिटल, औरंगाबाद. | ०४ | १,००,०००/- |
| १९) | किंग एडवर्ड मेमोरिअल हॉस्पिटल ( के ई एम ), पुणे. | १७ | ४,२५,०००/- |
| २०) | कोंकण मित्र मंडळ मेडिकल ट्रस्ट, सह्याद्री स्पेशालीटी हॉस्पिटल, पुणे. | ०३ | ७५,०००/- |
| २१) | कृष्णा हॉस्पिटल ॲन्ड मेडिकल रिसर्च सेंटर, कराड. | ०२ | ५०,०००/- |
| २२) | लीलावती हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर, मुंबई. | ०२ | ५०,०००/- |
| २३) | महात्मा गांधी मिशन न्यु बॉम्बे हॉस्पिटल, नवी मुंबई. | ०२ | ५०,०००/- |
| २४) | महात्मा गांधी मिशन हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च इन्स्टिट्युट, औरंगाबाद. | ०७ | १,७५,०००/- |
| २५) | मुलजीभाई पटेल युरोलॉजिकल हॉस्पिटल, नदियाड, गुजरात. | २९ | ७,२५,०००/- |
| २६) | एन एम वाडीया इन्स्टिट्युट ऑफ कार्डिओलॉजी, पुणे. | ०१ | २५,०००/- |
| २७) | नर्गिस दत्त मेमोरिअल कॅन्सर हॉस्पिटल, बार्शी. | ०६ | १,२०,५००/- |
| २८) | पी डी हिंदुजा नॅशनल हॉस्पिटल ॲन्ड मेडिकल रिसर्च सेंटर, मुंबई. | ११ | २,७०,०००/- |
| २९) | प्रवरा रुरल हॉस्पिटल, लोणी बु. | ०१ | २५,०००/- |
| ३०) | आर टी भोईटे स्मृती आरोग्य प्रतिष्ठाण गिरीराज हॉस्पिटल, पुणे . | ०१ | २५,०००/- |
| ३१) | शेठ नंदलाल धुत हॉस्पिटल, औरंगाबाद. | ०१ | २५,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२) | श्री सिध्देश्वर कॅन्सर हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर, सोलापूर. | ३६ | ७,०८,०००/- |
| ३३) | श्री मार्कण्डेय सोलापूर सहकारी रुग्णालय, सोलापूर. | ०४ | १,००,०००/- |
| ३४) | श्री सिध्दीविनायक गणपती कॅन्सर हॉस्पिटल, मिरज. | १९ | ४,६१,२५०/- |
| ३५) | शुश्रुशा सिटीझन्स को-ऑप हॉस्पिटल, मुंबई. | ०४ | १,००,०००/- |
| ३६) | शुश्रुत मेडिकल केअर ॲन्ड रिसर्च सोसायटी हार्डीकर हॉस्पिटल, पुणे. | १९ | ४,६५,५००/- |
| ३७) | टाटा मेमोरिअल हॉस्पिटल, मुंबई. | ०१ | २५,०००/- |
| ३८) | वसंतराव आर नगरकर मेडिकल फौंडेशन, नाशिक. | ९३ | २१,५१,५००/- |
| ३९) | विवेकानंद मेडिकल फौंडेशन विवेकानंद हॉस्पिटल, पुणे. | ०१ | १९,५००/- |
| ४०) | वानलेस हॉस्पिटल, मिरज. | ०२ | ५०,०००/- |
| | **एकुण -** | **४३०** | **१,०२,८३,३०२/-** |

**प्रस्ताव:-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी. यांचे मार्फत गरीब व गरजु रुग्णांना त्यांचे वैद्यकिय, उपचाराकरीता रुग्ण उपचार घेत असलेल्या रुग्णालयाचे नावे, सन- ०१ एप्रिल २०१७ ते ३१ मार्च २०१८ अखेर देण्यात आलेल्या, वैद्यकीय आर्थिक अनुदानाची नोंद घेणेसाठीचा प्रस्ताव, मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर.

निर्णय क्र.४८८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि. १ एप्रिल,२०१७ ते दि.३१ मार्च,२०१८ या कालावधीत ४३० रुग्णांना देण्यात आलेल्या एकुण रक्कम रु. १,०२,८३,३०२/- मात्र वैद्यकीय आर्थिक अनुदान रकमेची नोंद घेण्यात आली.**

**तसेच नाशिक, सोलापुर, पुणे येथील आणखी काही रुग्णालयांचा संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान योजनेमध्ये समावेश करणेत यावा,असे ठरले. समिती सदस्यांनी देखील या योजनेसाठी रुग्णालयाची नावे सुचवावीत, असे ठरले. (कार्यवाही- प्र.वैद्यकीय अधिक्षीका,श्री साईनाथ रुग्णालय/वैद्यकीय संचालक)**

---

विषय नं. २९ **श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये मे २०१८ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेल्या रु.८०,५६,६१४/- सवलतीस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त् करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

जनसंपर्क अधिकारी/सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे **मे २०१८** मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **१५,१४९** व १,१०७ आयपीडी रुग्णांपैकी ३,८७८ ओपीडी व ५८६ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.७५,०६,२१४/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **३८८** रुग्णाना रक्कम **रु.५,५०,४००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे–

(अ) **श्री साईबाबा हॉस्पिटल**

| | रुग्णांची गटवारी | लाभार्थी | एकुण बिल रक्कम | बिलापोटी | बिलात दिलेली |
|---|---|---|---|---|---|

| अ.नं. | | संख्या | | मिळालेली रक्कम | सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १२६ | ९,७५,११२/- | - | ९,७५,११२/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २७७ | २२,३१,८११/- | १०,३०,८७९/- | १२,००,९३२/- |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ८ | ३२,३०६/- | १,०००/- | ३१,३०६/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ७८९ | ४९,०८,३६६/- | ३०,५४,२८३/- | १८,५४,०८३/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २९३ | १,५८,७६,६५१/- | १,४१,२४,२५०/- | १७,५२,४०१/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,९७१ | १६,९२,३८०/- | - | १६,९२,३८०/- |
| | एकुण | ४,४६४ | २,५७,१६,६२६/- | १,८२,१०,४१२/- | ७५,०६,२१४/- |

(ब) **श्री साईनाथ रक्तपेढी**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४६ | ५९,८००/- | - | ५९,८००/- |
| २ | हिमोफिलीया | ० | - | - | - |
| ३ | सिकल सेल अॅनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ७ | ४,८००/- | - | ४,८००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ४७ | ४,७००/- | - | ४,७००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | १४६ | २,९६,५००/- | - | २,९६,५००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ७ | ११,४००/- | - | ११,४००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ४ | ५,२००/- | - | ५,२००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १३१ | १,६८,०००/- | - | १,६८,०००/- |
| | एकुण | ३८८ | ५,५०,४००/- | - | ५,५०,४००/- |
| | एकुण अ+ब | ४,८५२ | २,६२,६७,०२६/- | १,८२,१०,४१२/- | ८०,५६,६१४/- |

उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये **मे२०१८** मध्ये वैद्यकिय बिलात विहित पध्दतीने देण्यात आलेल्या **रु.८०,५६,६१४/-** सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.४८९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे मे २०१८ मध्ये वैद्यकिय बिलात विहित पध्दतीने देण्यात आलेल्या रक्कम रु.८०,५६,६१४/- मात्र सवलतीस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **दिनांक १९.०७.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

**निर्णय क्र.४९०** दिनांक १९.०७.२०१८ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१ शिर्डी येथील अहमदनगर-मनमाड महामार्ग व चौकांचे सुशोभिकरण करणेकामी लॅन्डस्केपिंग प्रकल्प सल्लासेवा पुरविणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराबाबत.**

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नांव | शिर्डी येथील अहमदनगर - मनमाड महामार्ग व चौकांचे सुशोभिकरण करणेकामी लॅन्डस्केपिंग प्रकल्प सल्लासेवा पूरविणे. |
| २) | प्रशासकिय मान्यता | मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १४/११/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९७९. |
| ३) | अंदाजपत्रकीय रक्कम. | रु.३,२५,२९,८२५/-(प्रकल्प खर्च) |
| ४) | प्रस्तावित कामाबाबत माहिती. | शिर्डी शहरातील अहमदनगर-मनमाड रस्त्याचे लक्ष्मीनगर वसाहत ते साईआश्रम या एकूण २१०० मी. भागातील सुमारे १३०० मी. लांबीतील फुटपाथ व त्यालगतचे ६० मि. मी. व ८० मि. मी. जाडीचे सर्व पेव्हींग ब्लॉक्स काढणे, नविन पेव्हींग ब्लॉक्स बसविणे, डिव्हायडर दुरुस्ती व रंगकाम, डिव्हायडरचे दोन्ही बाजूस रेलिंग बसविणे, झेब्रा क्रॉसिंगचे रंगकाम व ८ चौक सुशोभिकरण कामाबाबत रु.३,२५,२९,८२५/- खर्चाचे प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजीचे सभेत निर्णयक्र.९७९ अन्वये याकामी सल्लागाराची नेमणूक करून कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा. बां. विभाग), अहमदनगर यांची रस्ता विकसीत करणेसाठी ना-हरकत/परवानगी घेवून संस्थानकडून निधी उपलब्ध करून संस्थानमार्फत सदरहु काम करणेस मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार उपरोक्त कामे करणेसाठी लॅंडस्केपिंग सल्लागार नेमणेकामी दुस-यांदा जाहिरात प्रसिद्ध करून दि.१८/०५/२०१८ ते २९/०५/२०१८ या कालावधीत प्रस्ताव मागविणेत आले आहेत. |
| ५) | निविदा तपशिल | दुस-यांदा ई-प्रस्ताव मागणी सूचना वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करुन दि.१८/०५/२०१८ ते २९/०५/२०१८ या कालावधीत ई-प्रस्ताव मागविणेत आले आहेत. |
| अ) | निविदा कालावधी | दि.१८/०५/२०१८ ते २९/०५/२०१८ |
| ब) | तांत्रीक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ | दिनांक १४/०६/२०१८ रोजी स. ११ वाजता |
| क) | निविदा प्रक्रीयेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या | ०५ |
| ड) | सर्व निविदा धारकांनी संकेतस्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय? | होय |
| इ) | सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (ईएमडी) जमा केली आहे काय? | लागू नाही. |
| ई) | निविदेची अंदाजपत्रकीय किंमत | रु.३,२५,२९,८२५/-(प्रकल्प खर्च) |
| ६) | तांत्रीकदृष्ट्या पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यीक देकारांचा तपशिल. | (see table below) |
| ७) | निम्नतम निविदा धारकाचा तपशिल | |
| अ) | ठेकेदाराचे नांव | Archohm Consults Pvt. Ltd., Noida |
| ब) | निविदा रक्कम(Quoted fees) | 3.0% |
| क) | निविदा टक्केवारी कमी / अधिक | - |
| ८) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधिल तरतुदीनुसार निविदा स्विकारण्याचे | मा. व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी |

| Sr. No. | Name of the bidder | Quoted fees Rate % |
|---|---|---|
| 1 | Madav Consultants (India) Pvt. Ltd., Vile Parle(E), Mumbai | 7.50 |
| 2 | Engarch, Kolhapur | 4.5 |
| 3 | Archohm Consults Pvt. Ltd., Noida | 3.0 |

| | |
|---|---|
| अधिकार. | |

वरीलप्रमाणे प्राप्त दरामध्ये Archohm Consults Pvt. Ltd., Noidaयांनी देऊ केलेली 3.0% मात्र या निम्नतम दराबाबत त्यांचेशी चर्चा वाटाघाटी होऊन, मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी निणर्यार्थ सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक Archohm Consults Pvt. Ltd., Noida यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी चर्चेअंती 2.85 % दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे इतर बांधकाम प्रकल्पात १ ते १.५ % प्रकल्प सल्लागार फी दिली जाते. त्या तुलनेत अहमदनगर-मनमाड महामार्ग व चौकांचे सुशोभिकरण करणेकामी लॅन्डस्केपिंग प्रकल्प सल्लासेवा पुरविणेकामी प्राप्त झालेले निम्नतम दर हे खुपच जास्त असल्याचे उपसमिती सदस्यांचे मत झाले त्यामुळे सदरहु प्रकरणी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, अशी उपसमितीची शिफारस होती.**

**सदर उपसमितीची शिफारस मान्य करतांना खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.**

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक Archohm Consults Pvt. Ltd., Noida यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी चर्चेअंती 2.85% दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे इतर प्रकल्प हे बांधकाम प्रकल्प आहेत. प्रस्तुत अहमदनगर-मनमाड महामार्ग व चौकांचे सुशोभिकरण करण्याचे काम हे लॅन्डस्केप डिझायनींग व ब्युटीफीकिशचे आहे. त्यामुळे यासाठी निम्नतम निविदाधारक Archohm Consults Pvt. Ltd., Noida यांनी चर्चेअंती देऊ केलेले 2.85% अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**०२ मंदिर विभागाकरीता रानशेणी गोवरी खरेदीकामी प्राप्त ई-निविदेतील न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे मंदिर विभागाकरीता रानशेणी गोवरी खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | मंदिर विभागाकरीता रानशेणी गोवरी खरेदी |
| ०२ | मागणी | रानशेणी गोवरी खरेदी |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | १८.०५.२०१८ ते २२.०६.२०१८ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | संस्थानकडे उपलब्ध असलेले पुर्वीचे पुरवठाधारकांना दुरध्वनीव्दारे |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – १८.०५.२०१८<br>टेक्निकल बीड – २७.०६.२०१८<br>कमर्शियल बीड – २९.०६.२०१८ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०२ (दोन) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०२ (दोन) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविण्यात आले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ? | पात्र ०२ निविदाधारकांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |
| १२ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल – ---- | |
| १३ | सध्याची शिल्लक स्थिती | ---- |
| १४ | मागील खरेदी दर | रुपये ५.१० प्रती किलो |
| १५ | मागील पुरवठादार | श्री. रविंद्र विजय देवरे |
| १६ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | |

| अ.नं | खरेदीचा तपशिल | मे. रविंद्र विजय देवरे | मे. विजय धोंडु गवळी |
|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | दर प्रती किलो | दर प्रती किलो |
| | १ | रानशेणी गोवरी | ५.४९ | ५.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – मागील खरेदी सन २०१७-२०१८ | | | | |
| | अ.नं | खरेदीचा तपशिल | परिमाण | मागील दर रुपये प्रती किलो | |
| | १ | रानशेणी गोवरी | १,५०,००० किलो | रु. ५.१०/ किलो | |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | | वरील तक्त्यात नमुद केले आहे | | |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | | मे. विजय धोंडु गवळी, मोरशेवाडी, धुळे | | |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर - करण्यात आला आहे का ? | | होय | | |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी | | |
| २२ | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी/जास्त | |
| | रु. ५.१० | रु. ५.०० | १० पैसे | २ % ने कमी | |
| २३ | विभागाने निश्चित केलेले अंदाजित दर रु. ६.०० प्रती किलो | | | | |

२४. संक्षिप्त टीप –

संस्थानचे मंदिर विभागाकरीता रानशेणी गोवरी खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन याकामी दोन वेळेस मुदतवाढ देण्यात आली होती. यामध्ये मे. विजय धोंडु गवळी, मोरशेवाडी, धुळे यांचे रु. ५.००/- प्रती किलो न्युनतम दर प्राप्त आहेत. सदर रानशेणी गोवरी खरेदीकामी एकुण खर्च रु. १०,००,०००/- अपेक्षित आहे.

तरी न्युनतम निविदाधारक मे.विजय धोंडु गवळी, मोरशेवाडी, धुळे यांचेशी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.उप समितीचे सभेत सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर विभागाकरीता रानशेणी गोवरी खरेदीकामी निम्नतम निविदाधारक मे. विजय धोंडु गवळी, मोरशेवाडी, धुळे यांचे रक्कम रु.५/- मात्र प्रती किलो निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही-प्र.अधिक्षक,खरेदी विभाग)**

---

**०३ पाणीपुरवठा विभागाकरीता ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस खरेदीकामी प्राप्त ई-निविदेतील न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे पाणीपुरवठा विभागाकरीता ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरिन गॅस खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | पाणीपुरवठा विभागाकरीता ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरिन गॅस खरेदी |
| ०२ | मागणी | ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरिन गॅस खरेदी |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | १५.०६.२०१८ ते ०३.०७.२०१८ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट तसेच संस्थानकडे उपलब्ध असलेले पुर्वीचे पुरवठाधारकांना |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | पुर्वीचे पुरवठाधारकांना ई-मेल व्दारे |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – १५.०६.२०१८<br>टेक्निकल बीड – ०९.०७.२०१८<br>कमर्शियल बीड – १६.०७.२०१८ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०६ (सहा) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०६ (सहा) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविण्यात आले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ? | पात्र ०६ निविदाधारकांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | निविदेत नमुने मागविलेले नाहीत. |
| १२ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल – ---- | |
| १३ | सध्याची शिल्लक स्थिती | ---- |
| १४ | मागील खरेदी दर | ब्लिचींग पावडर- रुपये १४,७६०/- प्रती टन<br>फेरीक ॲलम- रुपये ६,४००/- प्रती टन<br>क्लोरिन गॅस - रुपये ३,०००/- प्रती सिलेंडर |
| १५ | मागील पुरवठादार | १.मे. विक्रम केमिकल्स, सिन्नर - ब्लिचींग पावडर व फेरीक ॲलमसाठी<br>२. मे. जी.एस. कमर्शिअल, मुंबई- क्लोरिन गॅससाठी |

१६ निविदाकारांनी सादर केलेले दर –

| अ.नं | निविदाकारांचे नाव | खरेदीचा तपशिल | | |
|---|---|---|---|---|
| | | ब्लिचींग पावडर दर रुपये प्रती टन | फेरीक ॲलम दर रुपये प्रतीटन | क्लोरिन गॅसदर रुपये प्रती सिलेंडर |
| १ | **मे. अलमायटी केमिकल्स, नासिक** | २७४४० | ६९९९ | १५००० |
| २ | **मे. शिवम एंटरप्रायजेस, उस्मानाबाद** | ३०९५० | ९५०० | ४००० |
| ३ | मे. जी एस कमर्शियल, मुंबई | २८७०० | ७५०० | ५९०० |
| ४ | मे. यश केमिकल्स, धुळे | २७९६० | ७२०० | २०००० |
| ५ | मे. के. एस. एंटरप्रायजेस, औरंगाबाद | २७६१२ | ७२०० | --- |
| ६ | मे. श्री गणेश एंटरप्रायजेस, नासिक | ४३००० | ३३००० | १०५०० |

१७ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – मागील खरेदी सन २०१७-२०१८

| अ.नं | खरेदीचा तपशिल | परिमाण | मागील दर रुपये प्रती किलो |
|---|---|---|---|
| १ | ब्लिचींग पावडर | ३५ टन | १४,७६०/- |
| २ | फेरीक ॲलम | ६० टन | ६,४००/- |
| ३ | क्लोरिन गॅस | ४० सिलेंडर | ३,०००/- |

| | | |
|---|---|---|
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील तक्त्यात अ. नं. १६ मध्ये नमुद केले आहे |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | १.मे. अलमायटी केमिकल्स, नासिक - ब्लिचींग पावडर व फेरीक ॲलमसाठी<br>२.मे. शिवम एंटरप्रायजेस, उस्मानाबाद -क्लोरिन गॅससाठी |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर - करण्यात आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |

२२

| मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|
| --- | --- | ---- | ------ |

२३ विभागाने निश्चित केलेले अंदाजित दर रु. प्रती टन/ सिलेंडर

| अ.नं | खरेदीचा तपशिल | परिमाण | दर रुपये प्रती टन |
|---|---|---|---|
| १ | ब्लिचींग पावडर | ३५ टन | २८,०००/- |
| २ | फेरीक ॲलम | ५५ टन | ८,०००/- |
| ३ | क्लोरिन गॅस | ४५ सिलेंडर | ४,५००/- |

२४. संक्षिप्त टीप –

संस्थानचे पाणीपुरवठा विभागाकरीता ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरिन गॅस खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. यामध्ये मे. अलमायटी केमिकल्स, नासिक यांचे ब्लिचींग पावडर व फेरीक ॲलमसाठी आणि मे.शिवम एंटरप्रायजेस, उस्मानाबाद यांचे क्लोरिन गॅससाठी वरील तक्त्यात दर्शविले प्रमाणे न्युनतम दर प्राप्त आहेत. सदर ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरिन गॅस खरेदीकामी एकुण खर्च रु. १५,२५,३४५/- अपेक्षित आहे.

२५. प्रस्ताव:-

तरी न्युनतम निविदाधारक मे.अलमायटी केमिकल्स, नासिक आणि मे. शिवम एंटरप्रायजेस, उस्मानाबाद यांचेशी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. उपसमितीचे सभेत शिफारशीसाठी सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, पाणीपुरवठा विभागाकरीता ब्लिचींग पावडर, फेरीक ॲलम व क्लोरीन गॅस खरेदीकामी पुढील तक्तयात नमुद केल्याप्रमाणे न्युनतम दर स्विकारणेत येऊन, संबधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | खरेदीचा तपशिल | ई-निविदेतील निम्नतम दर |
|---|---|---|---|
| १ | मे. अलमायटी केमिकल्स, नासिक | ब्लिचींग पावडर | रु. २७,४४०/- प्रती टन |
| २ | | फेरीक ॲलम | रु.६,९९९/- प्रती टन |
| ३ | मे.शिवम एंटरप्रायजेस, उस्मानाबाद | क्लोरीन गॅस | रु.४,०००/- प्रती सिलेंडर |

**(कार्यवाही-प्र.अधिक्षक,खरेदी विभाग)**

---

**०४ साखर खरेदीची सन २०१८-१९ या वर्षाचे फेर ई-निविदा प्रक्रियेतील जुलै ते सप्टेंबर-२०१८ या पाहिल्या टप्प्याचे कालावधीतील न्युनतम दरधारकाशी चर्चा वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेस मान्यता मिळणेबाबत व ऑक्टोबर ते डिसेंबर-२०१८ व जानेवारी ते मार्च-२०१९ या टप्प्यातील न्युनतम दरधारकाशी चर्चा वाटाघाटी करुन शिफारस करणेबाबत.**

संस्थानचे प्रसादालय विभागाकरीता साखर खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | साखर |
| ०२ | मागणी | १५४५० क्विंटल |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | २२.०५.२०१८ ते ३०.०६.२०१८ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट, ई-मेल व पुरवठाधारकांना दुरध्वनीव्दारे. |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | संस्थानकडे उपलब्ध असलेल्या ११ ई-मेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – २२.०५.२०१८<br>टेक्निकल बीड – ०९.०७.२०१८<br>कमर्शियल बीड – १६.०७.२०१८ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०२ (दोन) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०२ (दोन) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | होय |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का. | होय. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का. | -- |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | |

(A) Requirement of Sugar for the Period of July-2018 to September-2018

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | jaihind kirana stores | | Ramnath Jagannath and company | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Amount | Rate | Amount |
| 1.00 | Sugar (Sakhar) - M-30 | 5150.00 | Quintal | 3535.00 | 18205250.00 | 3509.00 | 18071350.00 |

(B) Requirement of Sugar for the Period of October-2018 to December-2018

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | jaihind kirana stores | Ramnath Jagannath and company |
|---|---|---|---|---|---|

| | | | | Rate | Amount | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.00 | Sugar (Sakhar) - M-30 | 5150.00 | Quintal | 3333.00 | 17164950.00 | 3479.00 | 17916850.00 |

C) Requirement of Sugar for the Period of January-2019 to March-2019

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | jaihind kirana stores | | Ramnath Jagannath and company | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Amount | Rate | Amount |
| 1.00 | Sugar (Sakhar) - M-30 | 5150.00 | Quintal | 3378.00 | 17396700.00 | 3449.00 | 17762350.00 |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर –

माहे- जुलै -२०१७ ते सप्टेंबर-२०१७

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | परिमाण | दर प्रती क्विंटल रु. |
|---|---|---|---|
| १ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | ३२२७.१८ | ४,१९०.०० |

माहे- ऑक्टोबर-२०१७ ते डिसेंबर-२०१७

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | परिमाण | दर प्रती क्विंटल रु. |
|---|---|---|---|
| १ | मे.रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशिक | ३२६५.०० | ३,५७९.०० |

माहे- जानेवारी-२०१८ ते मार्च-२०१८

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | परिमाण | दर प्रती क्विंटल रु. |
|---|---|---|---|
| १ | मे.रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी,नाशिक | ३५०७.०० | ३,५७९.०० |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल –

माहे- जुलै -२०१७ ते सप्टेंबर-२०१७

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | परिमाण | दर प्रती क्विंटल रु. |
|---|---|---|---|
| १ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | ३२२७.१८ | ४,१९०.०० |

माहे- ऑक्टोबर-२०१७ ते डिसेंबर-२०१७

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | परिमाण | दर प्रती क्विंटल रु. |
|---|---|---|---|
| १ | मे.रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशिक | ३२६५.०० | ३,५७९.०० |

माहे- जानेवारी-२०१८ ते मार्च-२०१८

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव | परिमाण | दर प्रती क्विंटल रु. |
|---|---|---|---|
| १ | मे.रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी,नाशिक | ३५०७.०० | ३,५७९.०० |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | - |
| १६ | मागील खरेदी दर | वरील अ.नं.१३ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| १७ | मागील पुरवठादार | वरील अ.नं.१३ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं.१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | मे. रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशिक (जुलै ते सप्टेंबर-२०१८) व मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक-(ऑक्टोबर ते डिसेंबर-२०१८ व जानेवारी ते मार्च-२०१९) |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय. |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशील - | |

| २३ | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|---|
| | रु. -- | रु. -- | रु. -- | -- |

| | |
|---|---|
| २४ | साखर खरेदीसाठी विभागाने निश्चित केलेला अंदाजे दर प्रती क्विंटल रू.४,१९०/- |

२५. संक्षिप्त टीप –

सन २०१८-१९ करीता किराणामाल व इतर अनुषंगिक साहित्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. यामध्ये साखर खरेदीसाठी ३ महिन्याचे ४ टप्प्यांमध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. यामध्ये साखरेसाठी खालीलप्रमाणे दर प्राप्त होते.

| अ.नं | कालावधी | मागणी क्विंटलमध्ये | प्राप्त दर प्रती क्विंटल | वाटाघाटीनंतरचे दर प्रती क्विंटल |
|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल ते जुन-२०१८ | ५,१५० | ३,२८२/- | ३,२७५/- |
| २ | जुलै ते सप्टेंबर-२०१८ | ५,१५० | ३,३२८/- | ३,३२०/- |
| ३ | ऑक्टोबर ते डिसेंबर-२०१८ | ५,१५० | ३,१३१/- | ३,१२५/- |
| ४ | जानेवारी ते मार्च-२०१९ | ५,१५० | ३,१७८/- | ३,१७०/- |

मा.व्यवस्थापन समितीचे दि०२.०५.२०१८ चे सभेतील निर्णय क्रं.२८८/१ ला अनुसरून मा.उपसमितीचे दि.११.०४.२०१८ रोजी झालेल्या सभेत साखरेसाठी वरील प्राप्त झालेले दर खुप जास्त आहेत. प्रतयक्षात पुढील कालावधीत साखरेचे दर कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे साखरेचे बाबतीत केवळ पहिल्या ३ महिन्यांचे दर मान्य करून त्यासाठी पुरवठा आदेश देण्यात यावे व दरम्यानचे काळात पुढील कालावधीसाठी फेर ई-निविदा प्रक्रिया राबवावी असे ठरले होते.

वरील निर्णयास अनुसरून भांडार विभागाचे मागणीप्रमाणे, जुलै ते सप्टेबर-२०१८, ऑक्टोबर ते डिसेंबर-२०१८ व जानेवारी ते मार्च-२०१९ या कालावधीकरीता प्रती तिमाही करीता ५१५० क्विंटल प्रमाणे ३ टप्प्यांमध्ये एकुण १५४५० क्विंटल साखर खरेदीसाठी ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

साखर ई-निविदेसाठी दिनांक २२.०५.२०१८ ते १२.०६.२०१८ हा ऑनलाईन कालावधी होता. परंतु मुदतीअखेर फक्त दोनच ई-निविदा प्राप्त असल्याने सुधारीत खरेदी नियमावलीनुसार पहिली मुदतवाढ दिनांक २१.०६.२०१८ अखेर देण्यात आली होती. या मुदतीअखेरही दोन निविदा प्राप्त झाल्याने खरेदी नियमावलीनुसार दुसरी व अंतिम मुदतवाढ दिनांक ३०.०६.२०१८ अखेर देण्यात आली होती. दोन मुदतवाढी दिल्यानंतरही दोनच निविदा प्राप्त असल्याने खरेदी नियमावलीतील ४.४.३.१ तरतुदीनुसार सदर दोन निविदांचे तांत्रिक बीड व कमर्शिअल बीड उघडण्यात आले आहे. ई-निविदेमध्ये साखरेचे नमुने मागविण्यात आले होते परंतु दोनच निविदा प्राप्त झाल्यामुळे नमुने निवड करता आली नाही.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.०६.२०१८ चे सभेतील निर्णय क्रं.४४३ अन्वये सदर साखर खरेदीची फेर ई-निविदा प्रक्रिया पुर्ण करून मा.स्थानिक उप समितीचे मान्यतेने माहे जुलै ते सप्टेबर-२०१८ या कालावधीसाठी पुरवठा आदेश देण्याचा निर्णय झालेला आहे.

**प्रस्ताव**-जुलै ते सप्टेंबर-२०१८ या टप्प्यांतील कालावधीसाठी न्युनतम निविदाधारक मे.रामनाथ जगन्नाथ ॲण्ड कंपनी, नाशिक यांचेशी प्रती क्विंटल रू.३,५०९/- न्युनतम दराबाबत चर्चा वाटाघाटी होऊन पुरवठा आदेश देण्याबाबत निर्णय होणेस आणि ऑक्टोबर ते डिसेंबर-२०१८ या कालावधीसाठी प्रती क्विंटल रू.३,३३३/- व जानेवारी ते मार्च-२०१९ या कालावधीसाठी प्रती क्विंटल रू.३,३७८/- दोन टप्प्यांसाठी मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांनी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन या दोन टप्प्यांबाबतचे साखर खरेदीकामी शिफारस करणेसाठी सदरचा विषय मा.उपसमितीचे सभेत सादर करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील माहे ऑक्टोबर ते डिसेंबर-२०१८ व माहे जानेवारी ते मार्च-२०१९ या कालावधीसाठीचे निम्नतम निविदाधारक मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे प्रसादालय विभागाकरीता जुलै ते सप्टेंबर-२०१८, ऑक्टोबर ते डिसेंबर-२०१८ व जानेवारी ते मार्च-२०१९ कालावधीसाठी साखर खरेदीकामी पुढील तक्तयात नमुद केल्याप्रमाणे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नाव** | **कालावधी** | **ई-निविदेतील निम्नतम दर** |
|---|---|---|---|

| | | | प्रती क्विंटल |
|---|---|---|---|
| १ | मे.रामनाथ जगन्नाथ ॲन्ड कंपनी, नाशिक | जुलै ते सप्टेंबर-२०१८ | रु.३,५०९/- |
| २ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | आक्टोबर ते डिसेंबर-२०१८ | रु.३,३३३/- |
| ३ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक | जानेवारी ते मार्च-२०१९ | रु.३,३७८/- |

**(कार्यवाही-प्र.अधिक्षक,खरेदी विभाग)**

---

०५ **श्री साईआश्रम येथील टेंन्साईल फेब्रीक शेडमध्ये लोखंडी स्टेज स्ट्रक्चर तयार करणेसाठी प्राप्त ई-निविदेतील निम्नतम दरधारकाशी वाटाघाटी करणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| ०१ | कामाचे नांव | **साई आश्रम भक्तनिवास येथील टेन्साईल फॅब्रीक शेडमध्ये लोखंडी स्ट्रक्चर स्टेज तयार करणे** |
| ०२ | प्रशासकीय मान्यता | मेकॅनिकल विभागाकडील दिनांक २३ मे, २०१८ रोजीची मंजुर टिपणी |
| ०३ | अंदाजे खर्च | ४,९१,३१०/- |
| ०४ | प्रस्तावाची थोडक्यात माहिती. | श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७ - २०१८ चे अनुषंगाने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाकरीता साईआश्रम भक्तनिवास येथे टेन्साईल फॅब्रिक शेड उभारणीचे काम पुर्ण झाले असुन सदर शेड मध्ये ४० x ३० फूट साईजचे लोखंडी स्ट्रक्चर स्टेज तयार करावे लागणार आहे. |
| ०५ | ई-निविदा तपशिल - | महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ई-निविदा जाहीरात अपलोड करण्यात आली होती. तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करून ई-निविदा प्रसिध्द करून ई-निविदा मागविणेत आली होती. ई-निविदा भरण्याची मुदत दिनांक २२/०६/२०१८ ते दिनांक ३०/०६/२०१८ अखेर हाती. सदर ई-निविदा प्रक्रियेत एक निविदा आल्याने दिनांक ०२/०७/२०१८ ते ०९/०७/२०१८ अखेर मुदत वाढ देणेत आली होती. |
| | I. कामाची मुदत | ३० दिवस |
| | II. तांत्रिक निविदा उघडण्याची दिनांक व वेळा | दिनांक १६/०७/२०१८ सकाळी ११ :०० वाजता |
| | III. प्राप्त ई-निविदा | ०४ |
| | IV. प्राप्त ई-निविदाधारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन जमा केले आहेत का ? | होय जमा केले आहे. |
| | V. सर्व निविदाधारकांनी EMD भरलेले कागदपत्रे जमा केले आहेत का ? | होय |
| ०६ | I. मागील वर्षाकरीता निम्नत्तम दर रूपये | - |
| | II. मागील निम्नत्तम दरधारक | - |

ई-निविदा प्रक्रियातील तांत्रिक दृष्टया पात्र निविदाधारकांनी दिलेल्या दराचा तपशील.

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव | ई-निविदेतील प्राप्त दर रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मे. अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद | 4,76,295/- | L1 |
| २. | मे. पी. एस. टेंभुर्णीकर, औरंगाबाद | 5,44,010/- | L2 |
| ३. | मे. सुपर फॅब्रीकेशन, साकुरी | 5,89,871/- | L3 |
| ४. | मे. डी. डी. कन्स्ट्रक्शन, पुणे | 5,98,670/- | L4 |

उपरोक्त तपशिलानुसार,

साईआश्रम भक्तनिवास येथील फॅब्रिक शेडमध्ये लोखंडी स्ट्रक्चर स्टेज तयार करणेकामी मे. अपुर्वा अंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांचे दर रक्कम रूपये - ४,७६,२९५/- (अक्षरी रक्कम रूपये - चार लाख शहात्तर हजार दोनशे पंचान्नव) मात्र निम्नत्तम असुन त्यांचेशी प्राप्त दराबाबत चर्चा / वाटाघाटी करून पुढील कार्यवाही करणेकरीता प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेपुढे सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियतील निम्नतम दरधारक मे.अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता चर्चेअंती त्यांनी रक्कम रु.४,७१,०००/- मात्र दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईआश्रम येथील टेंन्साईल फेब्रीक शेडमध्ये लोखंडी स्टेज स्ट्रक्चर तयार करणेसाठी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रकियेतील निम्नतम निविदाधारक मे. अपुर्वा इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांनी चर्चेअंती देऊ केलेले रक्कम रू. ४,७१,०००/-मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली..**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभागप्रमुख)**

---

०६ **श्री साईबाबा रुग्णालयाकरीता सन २०१७-१८ या वर्षाकरीता खरेदी करावयाचे Oxygenator (Adult & Semi Adult) खरेदीकामी चर्चा/वाटाघाटी करुन पुरवठा आदेश देणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नाव | श्री साईबाबा रुग्णालयाकरीता सन २०१७-१८ या वर्षाकरीता खरेदी करावयाचे Oxygenator (Adult & Semi Adult) खरेदीबाबत |
| २) | प्रशासकीय मान्यता | दि.०२/०२/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१०१ |
| ३) | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.१,९६,८२,२५०/- |
| ४) | प्रस्तावित कामाबाबत माहिती | श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे सन २०१७-१८ या वार्षिक औषधे खरेदीकामी दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.५ अन्वये विहित पध्दतीने खरेदीस मान्यता मिळालेली होती. त्यानुसार तीन वेळेस वर्तमान पत्रात जाहिरात देऊन विहित पध्दतीने ऑनलाईन ई-निविदा मागवून निम्नत्तम दराने पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देण्यात आलेले आहेत, परंतु त्यामध्ये Oxygenator (Adult & Semi Adult) या आयटमकरीता तांत्रिक अडचणींमुळे पुरवठा आदेश देण्यात आलेला नाही, त्यामुळे त्याकरीता दि.०२/०२/२०१८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.१०१ नुसार फेर निविदा मागविण्यास मान्यता घेण्यात आलेली आहे. |
| ५) | निविदा तपशिल | दि.१३/०२/२०१८ रोजीचे मंजुर टिपणीन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.२६/०३/२०१८ ते दि.१२/०४/२०१८ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या, त्यास अनुसरुन तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत, परंतु सदरचे खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी जास्तीत जास्त ई-निविदा प्राप्त होण्यासाठी सदर ई-निविदेस शासन निर्णय क्र.- भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उदयोग- ४ दि.०१ डिसेंबर २०१६– प्रकरणे चार मधील मुद्दा क्र.४.४.३.१ मधील – निविदा कालावधीस मुदतवाढ अन्वये दि.१९/०४/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यास अनुसरुन चार ऑनलाईन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. |
| अ) | निविदा कालावधी | २५ दिवस |
| ब) | तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक | दि.०५/०५/२०१८ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या आहेत. |
| क) | निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या | ०४ |
| ड) | सर्व निविदाधारकांनी संकेत स्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय ? | होय, जमा केले आहेत. |
| इ) | सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (EMD) जमा | होय, जमा केली आहे. |

<table>
<tr><td></td><td>केली आहे काय ?</td><td></td></tr>
<tr><td>ई)</td><td>मागील वार्षिक मंजुर दर रु.</td><td>Adult - रु.९६००/-(Terumo & Sorin)<br>Semi Adult – रु.१२७००/-(Sorin) &रु.१२९५०/-(Terumo)</td></tr>
<tr><td>६)</td><td colspan="2">तांत्रिक दृष्ट्या पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यिक देकराचा तपशिल –</td></tr>
</table>

| Sr. No | Description of Work / Item(s) | No. of Qty | B L Lifesciences Pvt Ltd | | Sarv Healthcare Pvt. Ltd. | | SVR Medical Technologies Pvt Ltd | | Seva Medical Equipments Pvt.Ltd. | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount |
| 1.00 | OXYGENATOR ADULT | 1000 | 12320 | 12320000 | 12500 | 12500000 | 14000 | 14000000 | 11400 | 11400000 |
| 2.00 | OXYGENATOR PEADIATRIC (SEMI ADULT) WEIGHT GROUP UPTO (20 TO 40KG.) D-905 | 500 | 12880 | 6440000 | 14100 | 7050000 | 16500 | 8250000 | 0.00 | 0.00 |

७) निम्नतम निविदाधारकांचा तपशिल -

| Sr. No. | Name of Supplier | Name of Item(s) | No. of Qty. | Rate per in Rs. | Total Amount in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Seva Medical Equipments Pvt.Ltd. | Oxygenator Adult | 1000 | 11400.00 | 11400000.00 |
| 2 | B L Lifesciences Pvt Ltd | Oxygenator Peadiatric (Semi Adult) Weight Group Upto (20 To 40kg.) D-905 | 500 | 12880.00 | 6440000.00 |
| | | | | Total Amt.in Rs. | 17840000.00 |

निविदा टक्केवारी कमी / अधिक - १०.३२% कमी

| | | |
|---|---|---|
| ८) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार- | मा.व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी |

तथापि तुलनात्मक तक्त्यातील निविदाधारक M/s.SVR Medical Technologies Pvt. Ltd., यांनी दि.११/०५/२०१८ रोजीचे ई-मेलव्दारे त्यांनी देऊ केलेले Oxygenator हे Coating असल्याबाबत कळविलेले आहे, त्यामुळे उवरीत तीनही निविदाधारकांना दि.११/०५/२०१८ रोजीचे ई-मेल अन्वये Oxygenator च्या Technical Specification बाबत विचारणा करण्यात आली होती.

त्यास अनुसरुन M/s.B L Lifesciences Pvt. Ltd., यांनी दि.११/०५/२०१८ रोजीचे ई-मेल अन्वये त्यांनी निविदेमध्ये देऊ केलेले Oxygenator हे Heparin Coating असलेबाबत कळविले आहे, तसेच M/s.Sarv Healthcare Pvt. Ltd., यांनी दि.११/०५/२०१८ रोजीचे ई-मेल अन्वये त्यांनी निविदेमध्ये देऊ केलेले Oxygenator हे Physio Coating असलेबाबत कळविले आहे, तर M/s.Seva Medical Equipments Pvt.Ltd. यांनी देखील दि.११/०५/२०१८ रोजीचे ई-मेल अन्वये त्यांनी निविदेमध्ये देऊ केलेले Oxygenator हे Heparin Coating असलेबाबत कळविले आहे. तसेच M/s.Seva Medical Equipments Pvt. Ltd., Pune यांनी दिलेल्या Nipro कंपनीच्या Oxygenator संदर्भात वापरणारे डॉक्टर यांना काही अडचणी असल्यामुळे सदर कंपनीला त्यासंदर्भात कळविण्यात आलेले होते, त्यानुसार दि.२२/०५/२०१८ रोजी सदर कंपनीचे प्रतिनिधी येऊन साईबाबा हॉसिपटलचे Perfusionist श्री.नदीम यांना भेटून गेले असून त्याबाबत सदर कंपनीने उपस्थित शंकाचे निरसन केलेबाबत पत्रदेखील दिलेले आहे. तसेच Oxygenator चा वापर करणारे Perfusionist श्री.नदीम व श्री.म्हस्के यांनी देखील वैद्यकिय संचालक यांना Nipro कंपनीचे Oxygenator वापरण्यास हरकत नसलेबाबत सांगितले आहे.

| अ. नं. | कलाकाराचे नांव | ठिकाण | संपर्क | कार्यक्रम | कलाकार संख्या | मानधन रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | अजय मोरे | ठाणे | ९८१९८७२३६४ | साई स्वरानंद | १८ | १४,०००/- |
| ०२ | विनित कुमार शर्मा | चंदीगड | ९०२३०७०३८२ | श्री साईबाबांचाजीवनावर लाईट अॅन्ड साऊंड शो | ५० | ५०,०००/- |
| ०३ | दिलीप शडंगी | छत्तीसगड | ७३५४४५४४४४ | हिंदी साईभजन | २५ | ३०,०००/- |
| ०४ | अनंत पांचाळ | मुंबई | ९९३०१२६३२७ | हिंदी साईभजन | १५ | ३०,०००/- |
| ०५ | प्रा. चंदन पराजंपे | मुंबई | ९५८८४३०९५० | शब्द सुरांच्या हिंदोळयावर – भक्तीगित, भावगीत | १५ | ३०,०००/- |
| ०६ | सच्चिदानंद आप्पा | मुंबई | ९८२०१४८६७८ | साईभजन संध्या | १० | -- |

**विभागाचा अभिप्राय:-** श्री साईसच्चरित पारायण सोहळा २०१७ मध्ये आयोजित केलेल्या कलाकार कार्यक्रमासाठी रक्कम रु.१,५६,०००/- इतके मानधन आदा करण्यात आलेले आहे. श्री साईबाबा समाधी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने यावर्षी महापारायण सोहळा साजरा करण्याचा मानस असल्याने कलाकार मानधनासाठी यावर्षी रक्कम रु.१० लाख मात्र इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

श्री साईसच्चरित पारायण सोहळा आयोजित करणेसाठी जागेच्या निश्चितीबाबत मा.व्यवस्थापन समितीसमोर पुनः प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. त्यामुळे श्री साईसच्चरित पारायण सोहळ्याची जागा

अजुनपर्यंत निश्चित झालेली नाही. तथापि अखंड हरिनाम सप्ताह व श्री साईसच्चरित पारायण सोहळा या दोन्ही कार्यक्रमांचा कालावधी एकच आहे. अखंड हरिनाम सप्ताहात दररोज सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत प्रवचन, कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित केलेले असतात. त्यामुळे साईसच्चरित पारायणाचे ठिकाणी उपरोक्त प्रस्तावात नमुद ०४ ते ०६ या वेळेत आयोजित करावयाच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी भक्तांची फारशी गर्दी होणार नाही, त्यामुळे ०४ ते ०६ यावेळेत कार्यक्रम आयोजीत करावे किंवा कसे याबाबत विचार व्हावा परंतु रात्री ७.३० ते ९.३० या वेळेत उपरोक्त पत्रात नमुद केलेल्या कार्यक्रमांचे आयोजन करणेस हरकत नाही असे मत आहे.

**प्रस्ताव** – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी ग्रामस्थ व नाट्यरसिक संच यांचे संयुक्त विद्यमाने गेली २३ वर्षे श्री साईसच्चरित पारायण सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे. श्री साईबाबा समाधी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने यावर्षी महापारायण सोहळा साजरा करण्याचा मानस असल्याने शिर्डी ग्रामस्थ व नाट्यरसिक संच यांनी दि.२५.०६.२०१८ चे स्थानिक उपसमितीचे सभेत ठरलेप्रमाणे उपरोक्तप्रमाणे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत सुचित केले आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०.०६.२०१८ रोजीचे सभेत श्री साईसच्चरित पारायण सोहळ्यात आयोजित करावयाच्या कलाकार कार्यक्रमासाठी मानधन म्हणून रक्कम रु.१० लाख मात्र इतक्या तरतुदीस मान्यता दिलेली आहे.

तरी याकामी खालील बाबींवर विचार विनिमय होवून धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे.

१) शिर्डी ग्रामस्थ (अखंड हरिनाम समिती व नाटय रसिक संच,शिर्डी ) यांनी उपरोक्त प्रस्तावनेत नमुद केलेल्या कलाकारांचे कार्यक्रम आयोजित करणेबाबत.

२) उपरोक्त नमुद कार्यक्रमासाठी रक्कम रु. ७,८२,०००/- मात्र इतके मानधन आदा करणेबाबत.

३) अखंड हरिनाम सप्ताहात दररोज सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत प्रवचन,कीर्तन यासारखे धार्मिक कार्यक्रम आयोजित केलेले असतात त्यामुळे साईचरित्र पारायणाचे ठिकाणी दुपारी ४.०० ते ६.०० यावेळेत धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे ठिकाणी भक्तांची फारशी गर्दी होणार नाही त्यामुळे दुपारी ४.०० ते ६.०० यावेळेत कार्यक्रमाचे आयोजन करावे किंवा कसे याबाबत निर्णय घेणे.

४) साईचरित्र पारायणाचे ठिकाणी रात्री ७.३० ते ९.३० या वेळेत उपरोक्त नमुद कार्यक्रमाचे आयोजन करणेबाबत.

तरी उपरोक्त बाबींवर निर्णय होणेस सविनय सादर.

**निर्णय क्र.४९२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईसच्चरित पारायण कालावधीत ग्रामस्थांनी सुचविलेले कार्यक्रम निश्चित करणेस व मानधन ठरविणेकामी ग्रामस्थ व नाटय रसिक संच यांचेशी चर्चा करुन स्थानिक उपसमितीने निर्णय घ्यावा, असे ठरले.** **(कार्यवाही- शताब्दी कक्ष प्रमुख)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात किडणी स्टोन शिबीर आयोजन व त्याकामी लागणाऱ्या अनुषंगीक खर्चास एकुण रक्कम रु.१०,००,०००/- मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद – कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

व्यवस्थापन समिती ठराव क्र.– मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २०/०८/२०१७ रोजीचे निर्णय क्र. ६८२ परिशिष्ट - अ

प्रास्ताविक- महासंत श्री साईबाबा यांनी मंगळवार दि.१५ ऑक्टोबर १९१८ या दिवशी विजयादशमीच्या मुहुर्तावर देहसमाप्ती करुन अनंताकडे प्रयाण केले. श्री साईबाबांच्या महानिर्वाणास दि.१८ ऑक्टोबर,२०१८ रोजी १०० वर्ष पूर्ण होत आहेत. साईनाथांचा भक्तगण आज भारतासह संपूर्ण जगभरात विपुल संख्येने पसरलेला आहे. त्यांच्यादवारे साईतत्वज्ञान आणि शिकवणीचा प्रसार तमाम विश्वात होत आहे. म्हणुनच श्री साईनाथांची शंभरावी पुण्यतिथी केवळ तीन दिवसांचा उत्सव म्हणुन साजरी न करता शंभराव्या पुण्यतिथी अगोदरचे संपुर्ण वर्ष श्री साईसमाधी शताब्दी वर्ष म्हणुन साजरे करण्याचा निर्णय श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या व्यवस्थापन समितीने घेतला आहे. दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ हे वर्ष म्हणजे साईसमाधी शताब्दी वर्ष असुन हे संपुर्ण वर्ष उत्साही वातावरणात साजरे करण्याचा संकल्प संस्थानने घेतला आहे. हा उत्सव फक्त संस्थानपुरता मर्यादित नसुन जगभरातल्या समस्त साईभक्तांचा उत्सव आहे. प्रत्येक साईभक्ताच्या उपास्य दैवताच्या स्मरणाची ही महापर्वणी आहे. आपण सर्व

साईच्या १०० व्या पुण्यतिथीचे साक्षीदारच नव्हे तर ती साजरी करणारे त्यांचे अनुयायी आहेत. हे आपणा सर्वांचे महदभाग्य आहे.

श्री साईबाबा यांच्या महासमाधीस सन २०१८ मध्ये १०० वर्षे पुर्ण होत असल्याने श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षे दि.०१ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीमध्ये वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन संपुर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहुन श्री साईबाबा महासमाधीशताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल.या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे.

तसेच संदर्भ क्र. ०१ नुसार मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १०/०१/२०१० रोजी विषय नं. ३३ निर्णय क्र. ३३ श्री साईनाथ रुग्णालयात दर तीन महिन्यातुन एकदा किडणी स्टोण शिबीराचे आयोजन करणेस व याकामी येणा-या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

अशा प्रकारचे शिबीराचे आयोजन यापुर्वी डॉ. केतन शुक्ला, अहमदाबाद यांचे योगदानातुन श्री साईनाथ रुग्णालयात वेळोवेळी करणेत आलेले आहे. प्रत्येक शिबीरात अंदाजे ५० रुग्णांवर मोफत उपचार व शस्त्रक्रिया करणेत येतात. आता पुढील शिबीरासाठी १०० रुग्णांची नाव नोंदणी झालेली आहे.

या शिबीरात (Percutanecous Nephrolithotomy) (P.C.N.L) मोठे स्टोन असलेल्या रुग्णांवर स्कोपीने शस्त्रक्रिया मोफत करणेत येतात. तसेच छोटया १ ते १$^{१/२}$ से.मी. आकाराच्या स्टोनवर (Sound Waves) च्या (Lithotripsy) साह्याने उपचार केले जातात. यासाठी डॉ. केतन शुक्ला हे रुग्णांना त्यांच्या रुग्णालयात प्रत्येक Lithotripsy साठी रु. १०,०००/- इतका आकार ते रुग्णांकडुन घेतात. परंतु संस्थानकडुन बेसीक खर्च म्हणुन रु.२,५००/- प्रति रुग्ण याप्रमाणे खर्च आकारला जात आहे व त्याप्रमाणे Lithotripsy चे उपचारावरील होणारा एकुण खर्च किडणी स्टोन फाऊंडेशन, अहमदाबाद यांना करावा लागेल.

अशा प्रकारचे उपचारासाठी रुग्णांना खाजगी रुग्णालयात ३०ते ४० हजार रुपये प्रत्येकी सर्व खर्च येतो. त्यामुळे सदर खर्च गरीब रुग्णांना पेलवणार नसल्याने ते उपचारापासुन वंचित राहतात. अशा रुग्णांवर श्री साईनाथ रुग्णालयात या शिबीरात मोफत उपचार केले जातात.

शिबीरानिमीत्त वेगवेगळया विभागांनी खालील दर्शविलेल्या कामांची पुर्तता करावी लागेल.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार अनुमान- मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १०/०१/२०१० रोजी विषय नं. ३३ निर्णय क्र.३ मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ३०/११/२०१६ रोजी विषय नं. ३७ निर्णय क्र. ८८०

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- किडणीस्टोन शिबीराच्या अनुषंगाने खालील विभागांमार्फत कार्यवाही होणे तसेच येणा-या सर्व खर्चास मान्यता मिळणे आवश्यक आहे.

| अ.नं. | विभाग | विभागांमार्फत करावयाचे कामाचा तपशिल | विभागांमार्फत येणारा खर्च रक्कम |
|---|---|---|---|
| १ | कॅटीन विभाग | १) चार दिवसांकरीता अंदाजे १०० रुग्णांना दैनंदिन रुग्णालयातील रुग्णांप्रमाणे दोन वेळेच्या चहाची व्यवस्था मोफत करण्यात यावी.<br>२) चार दिवसांकरीता डॉ. केतन शुक्ला व १५ सहकारी व इतर रुग्णालय स्टाफ असे एकुण ५० व्यक्तींकरीता आवश्यक त्यावेळेला चहा, कॉफी, बिस्कीट, मिनीरल वॉटर मोफत व्यवस्था करण्यात यावी | ५,०००/- |
| २ | श्री साईप्रसादालय | १) चार दिवसांकरीता अंदाजे १०० रुग्णांना दैनंदिन रुग्णालयातील रुग्णांप्रमाणे दोन वेळेची जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात यावी.<br>२) चार दिवसांकरीता डॉ. केतन शुक्ला व १५ सहकारी व इतर रुग्णालय स्टाफ असे एकुण १०० व्यक्तींकरीता विनामुल्य नाष्टा पुरविण्यात यावी.<br>३) चार दिवसांकरीता डॉक्टर्स, तंत्रज्ञ व इतरांची दोन वेळेची जेवणाची व्यवस्था व्हि.आय.पी. कक्षातमध्ये मोफत करण्यात यावी. | २०,०००/- |
| ३ | साईप्रसाद निवासस्थान | चार दिवसांकरीता अहमदाबाद येथुन आलेल्या डॉ. केतन शुक्ला व इतर सहकारी डॉक्टर यांचे करीता ०३ व्हि.आय.पी. ए.सी. रुमची मोफत व्यवस्था साईनिवास अतिथीगृहात करण्यात यावी. | २०,०००/- |
| ४ | व्दारावती भक्तनिवास | चार दिवसांकरीता किडणीस्टोन शिबीराकामी येणा-या अंदाजे १०-१५ सहकारी टेक्नीशियन यांचेकरीता ०५ व्हि.आय.पी. ए.सी. रुमची | २०,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मोफत व्यवस्था करण्यात यावी. | |
| ५ | जनसंपर्क विभाग | १) शिबीरासाठी आलेल्या मान्यवरांची दर्शन / आरतीची व्यवस्था मोफत करण्यात यावी.<br>२) शिबीर संपन्न झालेनंतर आपले विभागाकडुन सविस्तर बातमी प्रसिद्ध करणेत यावी. | ५,०००/- |
| ६ | विद्युत विभाग | किडणी स्टोण शिबीराकामी आवश्यकतेनुसार योग्य ठिकाणी मागणी प्रमाणे विद्युत जोडणी व सामुग्रीची व्यवस्था करण्यात यावी लागेल. | - |
| ७ | वाहन विभाग | १)डॉ. केतन शुक्ला व त्यांचे सहकारी यांच्या करीता शिबीर कालावधीत जेवणासाठी, रुमवर आणणे व सोडविणेकामी वातानुकुलीत गाडीची मोफत व्यवस्था करण्यात यावी.<br>२)डॉ. केतन शुक्ला यांना मुंबई, पुणे, औरंगाबाद येथुन आणण्यासाठी व परत सोडण्यासाठी वातानुकुलीत गाडीची मोफत व्यवस्था करण्यात यावी. | ५,०००/- |
| ८ | संरक्षण विभाग | १)शिबीरात आलेल्या मान्यवर डॉक्टर्स व तंत्रज्ञ यांना दर्शन आरतीची व्यवस्था मोफत करण्यात यावी.<br>२)दोन शिफ्टमध्ये दोन अतिरिक्त सुरक्षारक्षक शिबीर काळात पुरविण्यात यावी. | १५,०००/- |
| ९ | वित्त विभाग,<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | शिबीराकामी आलेल्या खर्चाची बीले संबंधितांना वेळेवर अदा करण्यात यावी. | - |
| १० | मेडीकल स्टोअर,<br>श्री साईबाबा हॉस्पीटल | शिबीराकामी लागणारे मेडिसिन व साहीत्य शिबीरपुर्व तातडीने खरेदी करुण पुरविण्यात यावी. | ८,००,०००/- |
| ११ | बि.व्हि.जी. इंडीया लि. | शिबीर स्थळी स्वच्छता राखण्यात यावी लागेल तसेच स्वतंत्र दोन कर्मचा-यांची नेमणुक करण्यात यावी. | १०,०००/- |
| १२ | श्री साईनाथ रुग्णालय | किरकोळ खर्चास मान्यता देण्यात यावी. (फ्लेक्स बोर्ड, रांगोळी) तसेच डॉ. केतन शुक्ला व त्यांचे इतर सहकारी एकुण १० लोकांसाठी दोन्ही वेळेच्या जेवणाची व्यवस्था बाहेरील हॉटेलमध्ये करणेकामी. | १,००,०००/- |
| | | **एकुण खर्च रक्कम** | **१०,००,०००/-** |

प्रस्ताव – उपरोक्त प्रमाणे नमुद केलेल्या एकुण रक्कम रुपये १०,००,०००/- पैकी संदर्भ क्र. ०२ अन्वये मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ३०/११/२०१६ रोजी विषय नं. ३७ निर्णय क्र. ८८० शिबीराकामी औषधे व इतर आवश्यक खर्चासाठी रु. ५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदर शिबीरासाठी दर वेळेस किमान ५० रुग्णांची प्रतिक्षा यादी असते. परंतु रुग्णांचा ओघ लक्षात घेता सदर शिबीरासाठी दुप्ट रुग्ण संख्या (१०० रुग्णांची) प्रतिक्षा यादी तयार झाली असुन, अंदाजे खर्च ही दुप्पटीनी वाढविण्याची गरज आहे. तरी सदर शिबीरासाठी रक्कम रु. १०,००,०००/- अंदाजे खर्च आपेक्षित आहे.

तरी सदर शिबीर घेण्यासाठी संदर्भ क्र. ०३ अन्वये डॉ. राम नाईक, जनरल सर्जन, श्री साईनाथ रुग्णालय व डॉ. केतन शुक्ला यांचेतील फोनवरील चर्चेनुसार सदर शिबीर ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात दि.२९/०८/२०१८ ते दि.०५/०९/२०१८ अखेर घेण्यात येणार आहे.

डॉ. केतन शुक्ला यांच्याकडुन सदर शिबीरात केल्या जाणा-या Lithotripsy उपचाराचे प्रत्येक रुग्णासाठी रु. २,५००/- याप्रमाणे होणारे बील "गुजरात किडणी स्टोन फाऊंडेशन, अहमदाबाद" यांना अदा करणेस व शिबीराकामी होणा-या मेडिसीन खर्चास व इतर अनुशंगीक प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष येणा-या अंदाजे रु. १०,००,०००/- खर्चास मान्यता असावी. तसेच उपरोक्त विभागांकडुन विभागाअंतर्गत कामे करुन मिळणेस मान्यता असावी.

सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ व मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.४९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन,** डॉ. केतन शुक्ला यांच्याकडुन सदर शिबीरात केल्या जाणा-या Lithotripsy उपचाराचे प्रत्येक रुग्णासाठी रु. २,५००/- याप्रमाणे होणारे बील "गुजरात किडणी स्टोन फाऊंडेशन, अहमदाबाद" यांना अदा करणेस व शिबीराकामी होणा-या मेडिसीन खर्चास व इतर अनुशंगीक प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष येणा-या अंदाजे रु. १०,००,०००/- खर्चास तसेच उपरोक्त विभागांकडुन विभागाअंतर्गत कामे करुन घेणेस मान्यता देण्यात आली.

**(कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षीका,श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये परफ्युजनिस्ट पदावर बाहययंत्रणेव्दारे एक कुशल कर्मचाऱ्यांची सेवा उपलब्ध करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद– कलम १३ (४) नुसार समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमन्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यां व्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही.

आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी" तसेच अट शर्त अ.नं. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. – मा व्यवस्थापन समिती दि. २५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६०२.

उपरोक्त प्रस्तावातील विभागाचा अभिप्राय विचारात घेता, संस्थानला कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत दि. ०२/०७/२०१७ पासून पुढे ११ महिने कालावाधीसाठी अथवा सदर पदावर स्थायी उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत ॲड हॉक बेसिस पध्दतीने प्रत्येकी एकत्रित रू. ३१,७००/- मात्र मासिक मानधन देण्यात येऊन नेमणूक करणेत यावी, असे ठरले.

प्रस्तावना- मा व्यवस्थापन समिती दि. २५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६०२नुसार, उपरोक्त प्रस्तावातील विभागाचा अभिप्राय विचारात घेता, संस्थानला कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या ठेकेदारामार्फत दि. ०२/०७/२०१७ पासून पुढे ११ महिने कालावाधीसाठी अथवा सदर पदावर स्थायी उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत ॲड हॉक बेसिस पध्दतीने प्रत्येकी एकत्रित रू. ३१,७००/- मात्र मासिक मानधन देण्यात येऊन नेमणूक करणेत यावी, असे ठरले. सदर निर्णयानुसार कामगार विभाग जा.नं.एसएसएस/वशी७ए/२३९८/२०१७ दि. १३/०९/२०१७ अन्वये ०२ कुशल कंत्राटी कर्मचारी ठेकेदारामार्फत पुरविणेत येत आहेत सध्या दोन्ही कुशल कर्मचारी काम सोडून गेलेले आहेत.

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील परफ्युजनिस्ट पदांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| पदनाम | मा डीन बी जे मेडीकल कॉलेज पुणे यांनी प्रस्तावीत केलेली पात्रता | मंजुर पदसंख्या | स्थायी |
|---|---|---|---|
| परफ्युजनिस्ट | 1) Age not more than 38 for open & 43 for Reserved category.<br>2) BPMT / B.Sc. with Diploma/ Cert. Course in Perfusion Technology/ from any Government recognized University.<br>3) Experience minimum of 5 years in Perfusion Technology. 4) MS-CIT | ०४ | ०२<br>(नदीम, म्हस्के) |

**मागणी -** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये फक्त दोन स्थायी परफ्युजनिस्ट कार्यरत असल्याने तात्पुरत्या स्वरूपात बाह्ययंत्रणेमार्फत (आऊटसोर्सिंगने) परफ्युजनिस्ट पदावर उपरोक्त पात्रतेनुसार जाहिरातीद्वारे स्थायी

पदावर परफ्युजनिस्ट मिळेपर्यंत अथवा पुढील आदेश होइपावेतो एक कुशल कंत्राटी कर्मचा-यांचे सेवेची आवश्यकता आहे.

**संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –**

| | |
|---|---|
| बेसिक | ९३०० |
| ग्रेड पे | ४४०० |
| डीए १३९ % (माहे मे २०१८) | १९०४३ |
| एकूण वेतन | ३२७४३ |

दरमहा एकत्रित वेतन रू. ३२७४३/-.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत– श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये परफ्युजनिस्टची एकुण चार स्थायी पदे मंजूर असून त्यापैकी दोन पदे भरलेली आहेत. उर्वरित दोन स्थायी पदे भरेपर्यंत किंवा पुढील आदेश होईपर्यंत उपरोक्त नमुद पात्रतेनुसार एक कुशल कंत्राटी कर्मचा-याची तात्पुरत्या स्वरूपात बाह्ययंत्रणेद्वारे सेवा घेता येईल व त्यास दरमहा रू. ३२,७४३/- एकत्रित वेतन देता येईल.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.४९४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये परफ्युजनिस्ट पदावर पात्रतेनुसार एक कुशल कंत्राटी कर्मचारी दरमहा रु.३२,७४३/-मात्र एकत्रित वेतनावर बाहययंत्रणेव्दारे घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०६ **माहे मार्च २०१८ जमा-खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

प्रस्ताव- लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडुन खर्च होणा-या रकमांचा एकत्रित जमा खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे मार्च-२०१८ या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा- खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे–

| **महिना** | **जमा** | **खर्च** |
|---|---|---|
| मार्च - २०१८ | ६७,४०,०९,८८९/- | ४७,६१,६८,५४१/- |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे मार्च २०१८ या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर.

निर्णय क्र.४९५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मार्च २०१८ जमा-खर्च तक्त्यामधील रकमांचे अवलोकन करण्यात येऊन, त्याची नोंद घेण्यात आली.** **(कार्यवाही- लेखाशाखा विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०७ **श्री साईबाबा हॉस्पिटल येथील जुने ए.सी.प्लांट बायबॅक करुन नविन सेंट्रल ए.सी.प्लांट उभारणी करणेकामी येणाऱ्या खर्चास तसेच याकामी ई-निविदा बोलविणेस मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम 2004 मधील तरतूद : (1) कलम 14(2)(घ) - भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे (2) कलम 17(2)(झ) - सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करणे.

प्रस्ताविक: श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या श्री साईबाबा हॉस्पीटल हे सन 2006 सालापासून कार्यान्वित आहे. या ठिकाणी विविध ऑपरेशन थिएटर्स तसेच रिकव्हरी वॉर्ड यामध्ये एकूण 13 सेंट्रल ए.सी.

प्लांट श्री साईबाबा हॉस्पीटल विभागामार्फतच बसविण्यात आलेले आहेत. या सर्व प्लांटची दुरुस्ती व देखभाल मेकॅनिकल विभागामार्फत करण्यात येते.

सन 2006 पासून सदरचे सर्व ए.सी. प्लांट अहोरात्र कार्यान्वित आहेत. तसेच सदर प्लांटला स्टॅंडबाय युनिटची व्यवस्था नाही. सदर A.C. प्लांट नामांकित कंपनीचे नाहीत. त्यामुळे त्याचे स्पेअर सध्या बाजारात मिळत नाही. शिवाय गेली 12 वर्षे सदर प्लांट जुने आहेत. तसेच अहोरात्र कार्यान्वित असल्याने त्यांचे सध्या वारंवार मेन्टेनन्स करावे लागत आहे. सदर प्लांटची कार्यक्षमता कमी झालेली असलेने रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून सर्व प्लांट बायबॅक करुन आणि उपलब्धनवीन डक्टसह सिलींग डक्ट डिफ्युझर बसवून नामांकित कंपनीचे (स्टॅंडबायसह) ए.सी. प्लांट बसविणे गरजेचे आहे. सध्या वापरात असलेल्या सेंट्रल ए.सी. प्लांटची दिनांक 31/03/2018 अखेर घसारा वजा जाता किमंत खालीलप्रमाणे.

| Sr. No. | Dead Stock No. | Description | Nos | Total Capacity | Purchase Date | Purchase Cost | Cost after Depreciation up to 31-03-2018 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | MCH/0347 | Central A.C. System Unit | 08 | 82 | 20/06/2006 | 60,20,065.00 | 1,90,693.70 |
| 2. | MCH/0348 | False Ceilling of 24 Guage | - | - | 20/06/2006 | 10,13,670.00 | 32,109.37 |
| 3. | MCH/0349 | Central A.C. System Ahu Unit | 01 | 08 | 20/06/2006 | 19,42,280.00 | 61,524.35 |
| 4. | MCH/0463 | Instalation Of Central A.C. for O.T. | 01 | 06 | 17/06/2009 | 18,09,929.00 | 1,35,897.95 |
| 5. | MCH/0466 | Inst.& Comm. Of Aircondition Work in Nero | 02 | 12 | 25/09/2009 | 36,70,511.00 | 2,75,599.17 |
| | | | Total : | 108 | -- | 1,44,56,455/- | 695824.54 |

उपरोक्त प्रमाणे सध्या वापरात असलेल्या 12 नग सेंट्रल प्लॅन्ट ए.सी. ची दिनांक 31 मार्च, 2018 अखेर एकत्रित घसारा वजा जाता रक्कम रूपये 6,95,824/- इतकी आहे.

**मागणी** : श्री साईबाबा हॉस्पीटल येथील जुने सेंट्रल प्लॅन्ट ए.सी. बायबॅक करुन, त्यांचे बदली नविन सेंट्रल ए.सी.प्लॅन्ट बसवावे लागणार आहे. जेणेकरुन सदर ठिकाणचे ए.सी. सुस्थितीत कार्यरत राहतील. श्री साईबाबा हॉस्पीटल मध्ये खालील ठिकाणी नवीन सेंट्रल ए.सी. बसवावे लागणार आहे.

| Sr. No. | place | capacity |
|---|---|---|
| 1. | General O.T. 1 | 11 Ton |
| 2. | General O.T. 2 | 11 Ton |
| 3. | Radiology Department | 20 Ton |
| 4. | Ortho Operation Theatre | 11 Ton |
| 5. | Neuro Operation Theatre. 1 | 11 Ton |
| 6. | Neuro Operation Theatre. 2 | 11 Ton |
| 7. | Neuro Recovery and Passage | 22.5 Ton |
| 8. | C.V.T.S. Operation Theatre 2 | 11 Ton |
| 9. | I.C.C.U Ward | 22 Ton |
| 10. | G.I.C.U Ward | 22 Ton |
| 11. | C.V.T.S. Operation Theatre 1 | 11 Ton |

| | | |
|---|---|---|
| 12. | C.V.T.S. Passage | 11 Ton |
| 13. | CRU 1 Ward | 22.5 Ton |
| | **Total** | 199.5 Ton |

उपरोक्तप्रमाणे एकूण 199.5 क्षमतचे 13 नग नवीन सेंट्रल ए.सी. प्लांन्ट बसवावे लागणार आहेत. तसेच सी.व्ही.टी.एस. ऑपरेशन थिएटर नं. 1 व 2 हे दोन थिएटर मॉडयुलर ओ. टी. बनविणे आहे. याकामी येणा-या खर्चाचा अंदाज करीता तत्सम प्रकारचे कामे करणा-या कॉन्टॅक्ट्र यांचेकडून दरपत्रके मागविण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत :

| तपशील | नग | क्षमता | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|
| Supply, Installation, Testing & Commissioning Central A.C. Unit at various Operation Theater of Shri Saibaba Hospital with Ducting & Electrical | 13 | 199.5 | 3,74,52,339/- |

उपरोक्त प्रमाणे १३ नग नवीन सेंट्रल ए.सी. प्लॅन्ट बसविणे व CVTS 1 व 2 या OT मॉडयूलर ओ.टी. तयार करणे याकामी प्राप्त इंस्टीमेट दर रक्कम रुपये - **3,74,52,339/-** मात्रचे दरात 20 % दर कमी करुन अंदाजे रुपये 2,99,61,871/- मात्र (अक्षरी रक्कम रुपये - दोन कोटी, नव्व्यान्नव लाख, एकसष्ठ हजार आठशे एक्काहत्तर) खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च मेकॅनिकल विभागाचे सन 2018 - 2019 या वर्षातील "मशीनरी खरेदी खर्च" या शिर्षातील अंदाजपत्रकात करता येईल. तसेच या मशीनरी खरेदीची कार्यवाही ई निविदा प्रक्रियाद्वारे करता येईल.

आवश्यक मान्यता : प्रशासकीय, शासन

विभागाचा स्पष्ट अभिप्राय : श्री साईबाबा हॉस्पीटल येथील सध्या वापरात असलेले सेंट्रल ए.सी.प्लॅन्ट जुने असून त्यांचा वापर अधिक झालेने त्यांची कार्यक्षमता कमी झालेली आहे. तसेच त्यांची वारंवार दुरूस्ती करावी लागते. त्यामुळे सदरचे सेंट्रल ए.सी.प्लॅन्ट बायबॅक देऊन नवीन सेंट्रल ए.सी प्लॅन्ट बसविणे आवश्यक आहे. तसेच CVTS 1 व 2 या OT मॉडयुलर करणे आवश्यक आहे.

संस्थान अधिनियम 2004 मधील कलम 17(4) मध्ये "विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित केलेले, पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहिर, दागिने व इतर मौलयवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज, समितीकडून विकण्यात येणार नाही, तारण म्हणून ठेवण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही " असे नमूद आहे.

उपरोक्तप्रमाणे बायबॅक करावयाच्या सेंट्रल ए.सी. प्लॅन्टची घसारा किंमत ही रक्कम रुपये 50,000/- पेक्षा जास्त असल्याने बायबॅक करणेकामी मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची पुर्व मान्यता घ्यावी लागणार आहे.

त्यामुळे उपरोक्त प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीची मान्यता झालेनंतर श्री साईबाबा हॉस्पीटल येथील सध्याचे वापरातील सेंट्रल ए.सी.बायबॅक करुन नविन सेंट्रल ए.सी. बसविणेकरीता विधि व न्याय विभागकडे मान्यतेसाठी सादर करता येईल. व दरम्यानचे कालावधीत नवीन सेंट्रल ए.सी. प्लॅन्ट बसविणेकामी महाराष्ट्र शासनाचे www//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर जाहीरात नोटीस अपलोड करुन ई-निविदा मागविता येतील..

प्रस्ताव- तरी श्री साईबाबा हॉस्पीटल येथील जुने 12 नग सेंट्रल ए.सी. प्लॅन्ट बायबॅक करणेकामी मान्यते करीता प्रस्ताव मा. विधि व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडे पाठविणेस व आवश्यक नवीन 13 नग सेंट्रल ए.सी. प्लॅन्ट बसविणेकामी महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर निविदा प्रसिद्ध करुन ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये 2,99,61,871/- (अक्षरी रक्कम रुपये - दोन कोटी, नव्व्यान्नव लाख, एकसष्ठ हजार आठशे एक्काहत्तर) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४९६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल येथील जुने १२ नग सेंट्रल ए.सी.प्लॅन्ट बायबॅक करणेस मान्यतेसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास तसेच आवश्यक १३ नग सेंट्रल ए.सी. प्लॅन्ट बसविणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२,९९,६१,८७१/-मात्र खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मेकॅनिकल विभाग प्रमुख)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०८ **संस्थानचे मंदिर परिसरातील शांतीनिवास इमारतीचे दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावरील प्रशासकीय कार्यालय पॅसेज व जिन्यामध्ये सध्या असलेले कोटा फ्लोरींग काढून त्या ठिकाणी ग्रेनाईड फ्लोरींग करणेसाठी येणाऱ्या रु.१३,०१,११८/- मात्रचे खर्चास व ई-निविदा मागविणेस मान्यता देणे.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद-** अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम (१) मध्ये " भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्याची तरतुद आहे. तसेच अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये " मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे " या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः–** मंदिर परीसर पुनर्विकास व नुतनीकरणाचे काम सन-२००० मध्ये पूर्ण झालेले आहे. सदरचे कामात शांतीनिवास इमारतीचे पहिल्या व दुस-या मजल्याचे पॅसेज तसेच जिन्याला कोटा फ्लोरींग बसविण्यात आलेली आहे. हे काम पुर्ण होऊन १९ वर्षांचा कालावधी झालेला असल्याने सदरहू कोटा फ्लोरींगची सततच्या वापराने झीज होऊन ती खराब झालेली आहे. शांतिनिवास इमारतीचे दुस-या व तिस-या मजल्यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा.उपकार्यकारी अधिकारी यांची व इतर विभागांची प्रशासकिय कार्यालये आहेत. सदरचे कार्यालयात मान्यवर व्यक्ती व देणगीदार साईभक्त येत असतात. त्याकरीता शांतीनिवास इमारतीचे दुस-या व तिस-या मजल्यावरील पॅसेज व जिन्याचे फ्लोरींगला सध्या असलेली कोटा फरशी काढून त्या ठिकाणी ग्रेनाईट बसविल्यास प्रशासकिय कार्यालयाकडे जाणारा जीना व पॅसेज सुशोभित व आकर्षक होईल.

**विभागाचा अभिप्राय–** सध्या श्री साईप्रसादालय डायनिंग हॉल, मेन किचन व बुंदी किचन या ठिकाणी ग्रेनाईट बसविणेचे काम प्रगतीपथावर आहे. सदर कामाचे मंजूर निविदा दराने खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | परिमाण | एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पॅसेज व जिन्यामधील जुनी कोटा फरशी काढणे. | ३४० | चौ.मी. | १००.०० | ३४,०००.०० |
| ०२ | तोडफोडीतून निघालेले मटेरीयलची वाहतूक करणे. | ४५ | घ.मी. | २७०.०० | १२,१५०.०० |
| ०३ | पॅसेजमध्ये ग्रेनाईट फ्लोरींग करणे. | ३४० | चौ.मी. | २७३०.०० | ९,२८,२००.०० |
| ०४ | पॅसेज व जिन्याकरीता ग्रेनाईट स्कर्टींग करणे. | ४७ | चौ.मी. | २७३०.०० | १,२८,३१०.०० |
| ०५ | जिन्याचे टप्प्याकरीता ग्रेनाईट बसविणे. | ५० | चौ.मी. | २७३०.०० | १,३६,५००.०० |
| | | | | **एकूण रु.** | **१२,३९,१६०.००** |
| | | | | **+ ५% contingencies -** | **६१,९५८.००** |
| | | | | **एकूण अपेक्षित खर्च -** | **१३,०१,११८.००** |

तरी उपरोक्त विषयांकीत कामासाठी वरील तक्त्यात नमूद केलेप्रमाणे रक्कम रु. १३,०१,११८/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरहू कामासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविण्यात याव्यात,असे मत आहे.

प्रस्ताव- तरी मंदिर परीसरातील शांतीनिवास इमारतीमधील दुस-या व तिस-या मजल्यावरील प्रशासकिय कार्यालयाचा जीना व पॅसेजला असलेले जुने कोटा फ्लोरींग काढून त्याऐवजी नव्याने ग्रेनाईट फ्लोरींग बसविणेकामी उपरोक्त दर्शविलेप्रमाणे रक्कम रु.१३,०१,११८/- मात्र इतक्या अपेक्षित खर्चास तसेच सदरहू कामासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेसाठी मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४९७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे मंदिर परिसरातील शांतीनिवास इमारतीचे दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावरील प्रशासकीय कार्यालय पॅसेज व जिन्यामध्ये सध्या असलेले कोटा फ्लोरींग काढून त्या ठिकाणी ग्रेनाईड फ्लोरींग करणेकामी विहीती पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.१३,०१,११८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**मा. व्यवस्थापन समितीचे दि. २६/०७/२०१८ रोजीचे सभेतील निर्णयाची कामापुरती नक्कल**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकामाचे ई-निविदेतील वाणिज्यीक देकार (Commercial Bids) उघडून निम्नतम दरधारकाशी वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-**

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नाव | श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकाम करणे. |
| २) | प्रशासकिय मान्यता | मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/१२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१०६६. |
| ३) | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.११२.६७ कोटी. |
| ४) | राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता | मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांची दि.१६/०२/२०१८ रोजी रु.११२.४१ कोटीचे खर्चास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. |
| ५) | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची बांधकाम परवानगी | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची दि.२९/११/२०१७ रोजी बांधकाम परवानगी प्राप्त झाली आहे. |
| ६) | प्रस्तावित कामाबाबत माहिती | **तळमजला** - नियोजित दर्शनरांग इमारतीमध्ये ०३ भव्य प्रवेश हॉल आहेत, त्यामध्ये भक्तांना मोबाईल व चप्पल लॉकर्स, बायोमेट्रीक पास काउंटर - ५०, पेड पास काउंटर – १५, लाडू काउंटर - १०, उदी व कापडकोठी काउंटर - ०९, बुक स्टॉल, डोनेशन ऑफिस, चहा कॉफी काउंटर, सिक्यूरीटी चेक एकाच ठिकाणी - ४०, लेडीज व जेन्टस टॉयलेट व्यवस्था इ.<br>**पहिला व दुसरा मजला** - भक्तांकरीता बसण्यासाठी १५०० क्षमतेचे एकूण १२ हॉल आहेत, त्यामध्ये चहा कॉफी काउंटर, विदयुतीकरण व्यवस्था जनरेटर बॅकअपसह, वायुविजन व्यवस्था, उदवाहक / लिफ्ट व्यवस्था - १०, लेडीज व जेन्टस टॉयलेट व्यवस्था, आर ओ प्रक्रियेद्वारे शुध्द पिण्याचे पाण्याची व्यवस्था, फायर फायटींग व्यवस्था इ.<br>याव्यतीरिक्त या प्रकल्पात सांडपाणी प्रक्रिया संयंत्र, संपूर्ण इंटेरीअर वर्क, सायनेजेस, अंतर्गत रस्ते, स्ट्रीट लाईट, इलेक्ट्रीकल सबस्टेशन, लॅण्डस्केपींग, रेनवॉटर हार्वेस्टींग, संरक्षण भिंत इत्यादी सुविधांचा समावेश करणेत आला आहे. |
| ७) | निविदा तपशील | दि.१५/०३/२०१८ रोजी (प्रथम वेळेस) जाहिरात प्रसिध्द करणेत आली. सदरहू जाहिरातीनुसार ई-निविदा कालावधी दि.१५/०३/२०१८ ते दि.१७/०४/२०१८ अखेर होता. दि.१०/०४/२०१८ रोजीचे निविदापूर्व बैठकीमध्ये ठरलेप्रमाणे ई-निविदा सादर करणेसाठी दि.२५/०४/२०१८ अखेर सायं.०५:०० वाजेपर्यंत मूदतवाढ देणेत आली होती. त्यानंतर सदरहू प्रकल्प मोठया स्वरुपाचा असल्याने टाटा प्रोजेक्टस, सिकंदराबाद, मे. श्रीनाथ कंन्स्ट्रक्शन, नाशिक, कॅपॅसाईट इन्फ्राप्रोजेक्ट लि. मुंबई व जे.एम.सी प्रोजेक्टस लि. मुंबई यांनी निविदा सादर करणेसाठी मूदतवाढीची मागणी केली होती. दि.२०/०४/२०१८ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये याकामी दि.१०/०५/२०१८ अखेर सायं.०५.०० वाजेपर्यंत मूदतवाढ देणेत आली.<br>उपरोक्त विहीत कालावधीत खालील ०३ ठेकेदार यांनी ई-निविदा सादर केल्या होत्या.<br>१. भानू कंन्स्ट्रक्शन, मुंबई.<br>२. कॅपॅसाईट इन्फ्राप्रोजेक्ट लि. मुंबई.<br>३. हर्ष कन्ट्रक्शन, नाशिक.<br>उपरोक्त निविदांचा तांत्रिक लिफाफा दि.१५/०५/२०१८ रोजी उघडणेत आला. त्यानुसार सदरहू तांत्रिक छाननी अहवालानुसार फक्त कॅपॅसाईट इन्फ्राप्रोजेक्ट लि., मुंबई हे एकच ठेकेदार पात्र झालेले होते. सबब, किमान पात्रता निकषांमध्ये किरकोळ स्वरुपांचे बदल करुन नव्याने ई-निविदा मागविण्याचे ठरले. |
| | | दि.२५/०५/२०१८ रोजी पुन्हा नव्याने ई-निविदा मागविणेसाठी जाहिरात प्रसिध्द करणेत आली. सदरहू जाहिरातीनुसार ई-निविदा कालावधी दि.२५/०५/२०१८ ते दि.२७/०६/२०१८ अखेर होता. स्पर्धात्मक दर प्राप्त होणेसाठी उपरोक्त कालावधी दि.३०/०६/२०१८ अखेर सायं. ०५:०० वाजेपर्यंत वाढविणेत आला. उपरोक्त विहीत कालावधीमध्ये केवळ ०२ ई- निविदा प्राप्त झालेल्या होत्या. |

सदर प्रकल्प मोठया स्वरुपाचा असल्याने स्पर्धात्मक दर तसेच किमान ०३ ई-निविदा प्राप्त होणेकामी उपरोक्तकामी दि.०६/०७/२०१८ अखेर सायं. ०५:०० वाजेपर्यंत मूदतवाढ देणेत आली. उपरोक्त विहीत केलेल्या वाढीव मुदतीत खालील ०४ ठेकेदारांकडून ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१. भानू कंन्स्ट्रक्शन, मुंबई.

२. जेनेरिक इंजिनिअरींग कंन्स्ट्रक्शन अॅन्ड प्रोजेक्टस लि.मुंबई.

३. न्याती इंजिनिअर्स अॅन्ड कन्स्टंटस, पुणे.

४. हर्ष कंन्स्ट्रक्शन प्रा. लि., नाशिक.

उपरोक्त ई-निविदेतील तांत्रिक लिफाफे दि.०९/०७/२०१८ रोजीचे खरेदी समितीमध्ये उघडणेत आलेले आहेत. सदर तांत्रिक निविदेतील कागदपत्रांची छाननी संस्थानचे या प्रकल्पाचे सल्लागार आर्किटेक्ट श्री. उदय काप्रे यांनी केली असून, दि.१४/०७/२०१८ रोजीचे पत्राव्दारे छाननी अहवाल सादर केला असून तो खालीलप्रमाणे आहे.

"This has reference to above subject and the Technical Bid opened on 9th July 2018 at Shirdi.

1) After opening of the technical bids of 4 bidders, they were evaluated and following were found:

a) Bidder M/s.Bhanu Constrcutions qualified for price bid opening.

b) Bidder M/s.Harsh Constructions Pvt Ltd. did not qualify for price bid opening due to shortage in bidding capacity as per stipulated formula in the tender. The bidding capacity projected was Rs.8.97 Cr. which is below contract stipulated amount of Rs.83 Cr.

c) Documents were deficient for M/s.Nyati Engineers & Consultants and M/s.Generic Constructions & Projects Ltd.

2) Accordingly, the necessary clarifications for deficient documents were sought from the two bidders namely, M/s.Nyati Engineers & Consultants and M/s Generic Constructions & Projects Ltd. The same were submitted instantly by the two bidders. Based on the evaluation of the documents received, following are found:

i. M/s. Nyati Engineers & Consultants qualified for the instant tender for price bid opening.

ii. M/s. Generic Constructions and Projects Ltd. did not qualify for price bid opening due to shortage in annual average turnover for the three tender stipulated financial years FY2014-15, FY2015-16 & FY2016-17 which is projected as Rs.56.874 Cr which is below contract stipulated amount of Rs.83 Cr as per the tender conditions.

3) Now our observations are as follows:

As brought out above, the Sansthan is left with two qualified responsive bids and the question comes whether only two qualifying bidders' financial bids can be opened or not? To address this question, the following can be seen: The PWD, Government of Maharashtra, Circular No. Sankirna-2017/ C.R.121 (Part-II) / Building-2 dated 19.09.2017, on page 3 clause 3 states as follows:

| | | |
|---|---|---|
| | | Quote "<br>3.1 Acceptance of Tenders:<br>3.1.1 The guidelines for acceptance of single tender were issued vide GR dated 12/04/2017. Now revised guidelines for the acceptance of a single tender are as below: The condition of receipt of minimum 3 technically qualified bids in the first call cannot be relaxed as it is as per requirements of CVC. However, for works of emergency and urgent nature, if 2 technically qualified bids are received in the first call, then the same can be processed with the permission of the Chief Engineer. The Chief Engineer while permitting the opening of 2 bids shall keep the reasons in writing on record. If only single bid is received in the first call then it shall be out rightly rejected & second call shall be made with short tender notice of 8 working days. The publicity of such urgent works shall be made directly to the concerned papers as allowed by DGIPR at the time of 1st call.<br>3.1.1 If only single technically qualified bid is received again on second call, the tender shall be processed as per usual procedure. There is no need to recall the tender in such cases.<br>" Unquote<br>a) This project was tendered first time, on 15th March 2018 to be submitted by 17th April 2018. On the request of the bidders the submission date was extended by more than three weeks to 10th May 2018. Only three bids were received (inspite of the extended time) out of which only a single bid was Qualified technically. Remaining two bids were disqualified. The tender was cancelled because it was the first call tender, and with only one qualified bidder, it could not be processed further.<br>b) In order to increase participation in the bidding process the clause relating to the executed PT Slab areas was modified and the qualifying requirements were reduced, and the tender was floated a second time on 25th May 2018 with date of submission as 27th June 2018.<br>c) Therefore, this was a "second call" this time for the same tender.<br>d) This time again the submission date was extended first, by 3 days upto 30th June 2018 and, second time, by a week to 6th July 2018, each time to facilitate participation from the bidders. Only four bids have been received and after the evaluation only two bids have qualified technically.<br>e) As per the above PWD clauses above, the Chief Engineer has the authority to permit the opening of the two technically qualified bids. The Sansthan does not have a Chief Engineers post, and therefore all decisions of the Sansthan are taken by the Santhan Board Members. Further, the tender also states on page 17 at clause 5 and at clause 7 "Opening of E-Tender" that the Sansthan has the right to take any decision which is final and binding.<br>f) As per the above PWD, and the tendered clauses, and, looking at the urgent & emergency nature of the project the Sansthan through its Board can open the financial bids of the two responsive technical bids, even if we consider this second call tender as a fresh tender and not a re-tender (though it qualifies as a re-tender).<br>4. As brought out above, accordingly we recommend that: |

| | | |
|---|---|---|
| | | iv. Based on 1 (b) above, M/s.Harsh Constructions Pvt Ltd.'s bid be termed as non responsive (not qualified) for opening of price bid.<br>v. Based on 2 (ii) above, M/s.Generic Construction & Projects Limited's bid be termed as non responsive (not qualified) for opening of price bid.<br>**and**<br>vi Based on 1 (a), 2 (i) & 3 above the financial bids of M/s.Bhanu Constrcutions and M/s.Nyati Engineers and Consultants be termed as responsive (qualified) and their price bids be opened.<br>The above is submitted for your perusal and suitable instructions for further necessary action." |
| अ) | निविदा कालावधी | दि.२५/०५/२०१८ ते दि.०६/०७/२०१८. |
| ब) | तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ | दि.०९/०७/२०१८ सकाळी ११.०० वाजता. |
| क) | निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या | ०४ ठेकेदार. |
| ड) | तांत्रिक निविदेत पात्र ठेकेदार संख्या | ०२ ठेकेदार. |
| इ) | सर्व निविदाधारकांनी संकेत स्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय? | होय. |
| ई) | सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (ईएमडी) जमा केली आहेत काय? | होय. |
| उ) | अंदाजपत्रकीय मंजूर रक्कम | रू.११२.४१ कोटी. |
| ८) | संस्थानचे या प्रकल्पाचे सल्लागार आर्किटेक्ट यांचे शिफारशीप्रमाणे ठेकेदारांच्या तांत्रिक पात्रते विषयीचा तपशिलः | |

| **अ.नं.** | **ठेकेदारचे नाव** | **शेरा** |
|---|---|---|
| १. | भानू कंन्स्ट्रक्शन, मुंबई. | **पात्र.** |
| २. | जेनेरिक इंजिनिअरींग कन्ट्रक्शन अॅन्ड प्रोजेक्टस् लि., मुंबई. | तांत्रिक पूर्व पात्रता अट क्र.०५ ची पूर्तता करत नसल्याने – **अपात्र.** |
| ३. | न्याती इंजिनिअर्स अॅन्ड कन्स्टंटस, पुणे. | **पात्र.** |
| ४. | हर्ष कंन्ट्रक्शन प्रा. लि, नाशिक. | तांत्रिक पूर्व पात्रता अट क्र.०८ ची पूर्तता करत नसल्याने – **अपात्र.** |

**प्रस्ताव-** उपरोक्त श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग प्रकल्पाचे बांधकाम जुने प्रसादालय परिसरात करण्यात येणार आहे. त्यासाठी सदर ठिकाणी असणा-या साईप्रसाद ०१ व ०२ या इमारती डिसेंबर-२०१७ मध्ये पाडण्यात आलेल्या आहेत. सदर ठिकाणी संस्थानमार्फत साईभक्तांकरीता बायोमेट्रीक पास काउंटर्स, जनसंपर्क कार्यालय, पेड पास काउंटर्स, लाडू काउंटर्स, मोबाईल व चप्पल लॉकर्स, चौकशी व निवासस्थान कार्यालय इ. व्यवस्था कार्यरत होती. सदर इमारती पाडण्यात आल्यामुळे संस्थानला वर नमूद सर्व व्यवस्था तात्पुरत्या स्वरूपात इतरत्र हलवाव्या लागल्या आहेत. तसेच आता उत्सवांचे कालावधीत सदर ठिकाणी मंडप टाकून दर्शन रांगेची तात्पूरती व्यवस्था करण्यात येत आहे.

सदर प्रकल्पासाठी ई-निविदा मागविणेकरीता दि.१५/०३/२०१८ रोजी (प्रथम वेळेस) जाहिरात प्रसिध्द करणेत आली. सदरहू जाहिरातीनुसार ई-निविदा सादर करणेसाठी दि.१७/०४/२०१८ अखेर मूदत देणेत आली होती. त्यानंतर दि.२५/०४/२०१८ अखेर व दि.१०/०५/२०१८ अखेर अशी ०२ वेळेस मूदतवाढ देणेत आली. त्यावेळी वाढीव मूदतीअखेर ०३ ई-निविदा प्राप्त झाल्या होत्या. परंतु त्यापैकी एकच निविदा पात्र झाली होती.

त्यानंतर दि.२५/०५/२०१८ रोजी पुन्हा नव्याने ई-निविदा मागविणेसाठी जाहिरात प्रसिध्द करणेत आली. सदरहू जाहिरातीनुसार ई-निविदा सादर करणेसाठी दि.२७/०६/२०१८ अखेर मूदत देणेत आलेली होती.

स्पर्धात्मक दर प्राप्त होणेसाठी सदर कालावधी दि.३०/०६/२०१८ अखेर व त्यानंतर दि.०६/०७/२०१८ अखेर वाढविणेत आला. सदर वाढीव मूदतीत एकूण ०४ ठेकेदारांकडून ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. संस्थानचे या प्रकल्पाचे सल्लागार आर्किटेक्ट श्री. उदय काप्रे, पार्टनर, माथुर ॲन्ड काप्रे असोसिएटस, नवी दिल्ली यांनी त्यापैकी ०२ ठेकेदार पात्र होत असल्याचा अहवाल दिला आहे.

तरी याकामी पात्र होणारे ०२ ठेकेदार यांचे वाणिज्यिक देकार (Price Bids) उघडणेत यावे किंवा याकामी फेर निविदा मागविणेत याव्यात, यावर निर्णय होणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.४९८** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा करण्यात आली, संस्थानचे या प्रकल्पाचे सल्लागार आर्कीटेक्ट श्री.उदय कापरे यांचे यावेळी समक्ष अभिप्राय घेण्यात आले. उपरोक्त कामाची निवीदा प्रथम दि.१५.०३.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली असुन तिची मुदत दि.१७.०४.२०१७ पर्यंत होती. यास प्रथम दि.२५.०४.२०१८ व दुसऱ्यांदा दि.१०.०५.२०१८ अखेर मुदतवाढ देण्यात आली होती. या निविदा प्रक्रियेत एकच निविदाधारक पात्र झाल्याने दुसऱ्यांदा नव्याने दि.२५.०५.२०१८ रोजी फेर ई-निविदा प्रसिध्द केली होती. तीचा कालावधी दि.२७.०६.२०१८ अखेर होता. यास प्रथम दि.३०.०६.२०१८ अखेर व दुसऱ्यांदा दि.०६.०७.२०१८ अखेर मुदतवाढ देण्यात आली होती. या निविदा प्रक्रियेत चार निविदा प्राप्त झाल्या असून त्यापैकी दोन निविदाधारक तांत्रिक छाननीमध्ये पात्र ठरलेले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाचे दि.१२.०४.२०१७ रोजीचे शासन निर्णयातील कलम ३(१) नुसार एखादया कामाची तातडीची निकड लक्षात घेता ई- निविदा प्रक्रियेच्या पहिल्या मागणीमध्ये जरी दोन निविदा तांत्रिक छाननीमध्ये पात्र झाल्यास त्यांचे वाणिज्यीक देकार उघडण्याची तरतुद आहे. श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग प्रकल्पाचे बांधकाम जुने प्रसादालय परिसरात नियोजन असून त्या ठिकाणी असणाऱ्या साईप्रसाद १ व २ या इमारती डिसेंबर-२०१७ मध्ये संपुर्ण पाडण्यात आलेल्या आहेत. या इमारतीमध्ये साईभक्तांकरीता बायोमेट्रीक पास काउंटर्स, जनसंपर्क कार्यालय, पेड पास् काऊटर, लाडु काऊंटर्स, मोबाईल व चप्पल लॉकर्स, चौकशी व निवासस्थान कार्यालय इ.व्यवस्था कार्यरत होती. सदर इमारत पाडण्यात आल्यामुळे संस्थानला वर नमूद सर्व व्यवस्था तात्पुरत्या स्वरुपात इतरत्र हलवाव्या लागल्या आहेत. तसेच आता उत्सवांचे कालावधीत सदर ठिकाणी मंडप टाकून दर्शन रांगेची तात्पुरती व्यवस्था करण्यात येत आहे.**

**त्यामुळे नवीन दर्शन रांग प्रकल्पाचे बांधकाम हे तातडीने पुर्ण करणे गरजेचे असल्याने प्रस्तावात प्राप्त होणाऱ्या दोन ठेकेदाराचे वाणिज्यीक देकार उघडण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामध्ये भानु कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांचे रक्कम रु.१०९,६०,४९,८७५/- मात्र हे दर निम्नतम असुन ते आजचे सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी चर्चेअंती रक्कम रुपये १०९ कोटी मात्र दर देऊ केले.**

**प्रस्तुत प्रकरणी शासनाने रक्कम रु.११२,४०,९९,०५९/- मात्र इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली असुन प्राप्त झालेल्या निम्नतम निविदाधारक यांची वाटाघाटी नंतर देकार रक्कम रु.१०९ कोटी इतकी असुन प्रशासकीय मान्यतेपेक्षा ३% कमी आहे. त्यामुळे श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकामाकरीता निम्नतम निविदाधारक भानु कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांनी चर्चेअंती देऊ केलेले रक्कम रुपये १०९ कोटी मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन, त्यांना तातडीने कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरित पारायण सोहळा-२०१८ कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी निम्नतम निविदाधारक यांना कार्यादेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-**

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नाव | श्रावण महिन्यातील श्री साई सच्चरित पारायण सोहळा -२०१८ कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणे. |
| २) | प्रशासकिय मान्यता | मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४१ (०९). |
| ३) | अंदाजपत्रकीय रक्कम | रु. ३४,६६,५००/-. |
| ४) | प्रस्तावित कामाबाबत माहिती | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थे तर्फे सालाबाद प्रमाणे श्रावण मास निमित्त श्री साईचरित्र पारायण सोहळा आयोजित करणेत येत असतो. शताब्दी कक्षाचे दि.१५/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये शिर्डी ग्रामस्थांनी श्री |

| | | |
|---|---|---|
| | | साईबाबा समाधी शताब्दी वर्षाचे निमित्ताने योगीराज गंगागिरीजी महाराज अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन दि.१६ ते २३ ऑगस्ट, २०१८ या कालावधीत शिर्डी येथे आयोजित केलेला आहे. तसेच याच सुमारास संस्थानने श्री साईचरित्र पारायणाचे आयोजन करावे असे ग्रामस्थांनी विनंती केलेली आहे. यावर्षी श्री साईचरित्र पारायण सोहळयास सुमारे ११ ते १२ हजार पारायणार्थी बसणार असल्याची शक्यता आहे असे कळविले आहे. |
| ५) | निविदा तपशील | दि.११/०७/२०१८ रोजी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई-निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.१९/०७/२०१८ पर्यंत अंतिम मुदतीत १० ठेकदार यांनी ई-निवीदा सादर केलेल्या आहेत. |
| अ) | निविदा कालावधी | दि.११/०७/२०१८ ते दि.१९/०७/२०१८. |
| ब) | तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ | दि.२४/०७/२०१८ सकाळी ११.०० वाजता. |
| क) | निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या | १० ठेकेदार. |
| ड) | तांत्रिक निविदेत पात्र ठेकेदार संख्या | ०७ ठेकेदार. |
| इ) | सर्व निविदाधारकांनी संकेतस्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय? | होय. |
| ई) | सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम (ईएमडी) जमा केली आहेत काय? | होय. |
| उ) | निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम | रु.३४,६६,५००/- |
| ६) | तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यीक देकाराचा तपशिलः | |

| अ.नं. | ठेकेदारचे नांव | निविदा रक्कम (रू.) | शेरा |
|---|---|---|---|
| **१.** | **वायुनंदन मंडप डेकोरेटर्स, नेवासा.** | **२४,६१,०००/-** | **निम्नतम** |
| २. | मेहेत्रे डेकोरेटर्स, अहमदनगर. (श्री.चंद्रकांत मेहेत्रे) | २४,६१,५००/- | --- |
| ३. | बी. एस. कातुरे, पुणे. | ३४,७४,९००/- | --- |
| ४. | जाधव मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद. | ३९,९१,०००/- | --- |
| ५. | निकिता एस. बी. एस. को. ऑप सोसायटी लि., औरंगाबाद. | ४२,७०,०००/- | --- |
| ६. | काळे ॲण्ड सन्स, पुणे. | ४३,२४,०००/- | --- |
| ७. | लल्लुजी ॲण्ड सन्स, अहमदाबाद. | १,२४,४५,०००/- | --- |

| | | |
|---|---|---|
| ७) | निम्नतम निविदा धारकाचा तपशिल | |
| अ) | ठेकेदाराचे नांव | वायुनंदन मंडप डेकोरेटर्स, जेऊर हैबती, नेवासा. |
| ब) | निविदा रक्कम | रू.२४,६१,०००/-. |
| क) | निविदा टक्केवारी कमी / अधिक | २९.००६२ % कमी. |
| ८) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार | मा. व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी |

तरी श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरित पारायण सोहळा-२०१८ कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामी ठेकेदार वायुनंदन मंडप डेकोरेटर्स, जेऊर हैबती, नेवासा यांची रक्कम रु.२४,६१,०००/- मात्रची निविदा स्विकारुन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.४९९ **प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक वायुनंदन मंडप डेकोरेटर्स, जेऊर हैबती, नेवासा हे आजचे व्यवस्थापन समिती सभेपुढे चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दरकमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी रक्कम रु.२०,०००/-मात्र सवलत देऊ केली.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रावण महिन्यातील श्री साईसच्चरित पारायण सोहळा-२०१८ कार्यक्रमासाठी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी निम्नतम निविदाधारक वायुनंदन मंडप डेकोरेटर्स, जेऊर हैबती, नेवासा यांनी चर्चेअंती देऊ केलेले रक्कम रु.२४,४१,०००/-मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले. (कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)

---

आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

आयत्या वेळेचा
विषय नं.११ निर्णय क्र.५०० संस्थानच्या कोणकोणत्या कोर्टात किती केसेस चालू आहेत, प्रत्येक केस मध्ये वकील कोण आहेत याबाबतचा सविस्तर तपशील व्यवस्थापन समितीपुढे ठेवण्यात यावा. केसेसमध्ये काय कामकाज झाले याच्या सद्स्थितीसह अहवाल ठेवावा. (कार्यवाही-प्र.विधी अधिकारी,विधी विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१२ निर्णय क्र.५०१ प्रजापती ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय,शिर्डी यांनी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षानिमीत्त आयोजित योगिराज सद् गुरु श्री गंगागिरीजी महाराज यांच्या अखंड हरीनाम सप्ताहामध्ये ज्योर्तिलिंग व शिवलिंगाच्या देखाव्याचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी विविध ठिकाणाहून येणाऱ्या त्यांच्या सेवेकऱ्यांसाठी दि.१५ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट या कालावधीसाठी साई धर्मशाळा येथे निवासव्यवस्था व भोजनव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात यावी, असे ठरले.
(कार्यवाही-शताब्दी कक्ष प्रमुख/ प्र.अधिक्षक,साई धर्मशाळा)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१३ निर्णय क्र.५०२ वनवासी कल्याण आश्रम,महाराष्ट्र यांना दि.३०.०९.२०१८ ते दि.०२.१०.२०१८ असे ३ दिवस कालावधीसाठी निवासी संमेलन आयोजित करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु सदर संमेलनासाठी येणारे कार्यकर्ते व जनजाती प्रतिनिधी हे कार्यक्रमाचे १ ते २ दिवस आगोदर येणार असल्याने त्यांना दि.२७.०९.२०१८ ते दि.०२.१०.२०१८ याकालावधीकरीता निवासव्यवस्था व भोजन व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-कार्यकारी अभियंता,बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.१४ निर्णय क्र.५०३ मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ८.१२.२०१७ रोजीचे सभेतील आयत्या वेळेचा विषय नं.१९ निर्णय क्र.१०८१ अन्वये व्यवस्थापन समितीच्या कामकाजाचा वार्षिक कार्यअहवाल प्रसिध्द करण्यात यावा, असे ठरले असुन त्याकामी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर पुस्तकाचे विमोचन मा.उपराष्ट्रपती महोदयांचे हस्ते करावयाचे असल्याने सदर पुस्तकाची छपाई तातडीने करणे आवश्यक होते, त्यामुळे अमल ऑफसेट प्रॉडक्टस् (प्रा.) लि.नाशिक यांचे मार्फत ‘साई सेवेची वर्षपुर्ती’ असे शिर्षक असलेल्या पुस्तकांच्या १०१५ प्रती मा.अध्यक्ष महोदय यांनी तातडीने छपाई करुन घेण्यात आलेल्या आहेत. सदरची छपाई तातडीची असल्याने त्यासाठी विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करणे शक्य झाले नाही. सदर पुस्तकाचे वितरण मा.उपराष्ट्रपती यांचे कार्यक्रमात तसेच अन्य कार्यक्रमात मान्यवरांना करण्यात आलेले आहे.

तरी सदर ‘साई सेवेची वर्षपुर्ती’ या पुस्तकाचे छपाई कामाची रक्कम रु.२,८०,७९०/-मात्र अमल ऑफसेट प्रॉडक्टस् (प्रा.) लि.नाशिक यांना अदा करणेस मान्यता देण्यात आली.
(कार्यवाही-प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१५ निर्णय क्र.५०४ सत्यनारायण पुजा हॉलचे वरील हॉलमध्ये ध्यान मंडप उभारणेकामी अनुषंगीक बाबी व येणाऱ्या अंदाजे खर्चासह सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेपुढे सादर करणेत यावा.

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१६ निर्णय क्र.५०५ महाराष्ट्र तलवारबाजी असोशिएशन व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने व अहमदनगर जिल्हा तलवारबाजी असोशिएशनच्या वतीने १२ वर्षातील मुलामुलींच्या राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धा दि.०३ ऑगस्ट ते ६ ऑगस्ट २०१८ रोजी शिर्डी येथे आयोजित करणेस मान्यता देण्यात आली. सदर तलवारबाजी स्पर्धेसाठी संपुर्ण भारतातुन ३०० खेळाडू, पंच व मार्गदर्शन १०० असे एकूण ४०० जणांची निवासव्यवस्था साईआश्रम २ येथील हॉलमध्ये निशुल्क व भोजनव्यवस्था श्री साई प्रसादालय येथे मोफत करण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, साईआश्रम धर्मशाळा, प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय)

---

वरील निर्णय क्र.४६१ ते ५०५ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर सायंकाळी ०६.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**